शनिवार
१४ डिसेंबर १९७४
एक रुपया

# माणूस

## तेजस्वी चळवळीची ओजस्वी प्रस्तावना

प्रा. मुकुंद कृष्ण इनामदार, शिरूर

□ ३० नोव्हेंबर ७४ च्या ' माणूस ' साप्ताहिकातील प्रभाकर पाध्ये यांचा ' जयप्रकाशांच्या चळवळीचा मानदंड ' हा लेख वाचला. हा लेख लिहिल्याबद्दल श्री. पाध्ये यांचे, प्रकाशित केल्याबद्दल आपले व वाचावयास मिळाल्याबद्दल स्वतःचे अभिनंदन करतो.

लोकनायक जयप्रकाशांच्या पक्षनिरपेक्ष आंदोलनाला प्रारंभ होऊन नुकताच काही काळ लोटला आहे. तथापी पढित बाह्य निरीक्षकांना आणि चळवळीत झोकून देणाऱ्या कार्यकर्त्यांना या आंदोलनाचा वेग, दिशा आणि भवितव्य याची कितपत स्पष्ट कल्पना आहे, ही शंकाच आहे. ' कुठेतरी दूर काहीतरी बरे चालले आहे ' एवढीच सुशिक्षित जिज्ञासूंची भावना असावी. प्रभाकर पाध्ये यांनी ज्या सुस्पष्ट रेघांनी आंदोलनाचे चित्र रेखाटले आहे, त्यावरून एकूण परिस्थितीचा अन्वयार्थ लावणे अगदी सुलभ झाले आहे.

जयप्रकाशांच्या रूपाने स्फुरलेली विद्युत्, लोकशाहीच्या शुद्धीकरणाची त्यांना सापडलेली कळ आणि प्रस्थापिताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या श्रीमती इंदिरा गांधी यांची तरल राजकीय संज्ञा या क्रियाशील गतिमान घटकांचे केलेले विश्लेषण केवळ मूलगामी आहे. इंदिराजींनी केलेले जयप्रकाशजींचे चारित्र्यहनन, पुरस्कर्त्यांमध्ये फूट पाडण्याचा केलेला अश्लाघ्य प्रयत्न, अणुस्फोटाचा मिरविलेला बडेजाव, सिक्कीम प्रकरणाचे लावलेले मधाचे बोट, मिसाचे दाखविलेले आमिष–असे एकामागून एक या चळवळीवर सोडलेले बाण जयप्रकाशांचो अभिजात कवचकुंडले भेदू शकले नाही. ' पुरलेल्या इतिहासकुपी 'बाहेरही जयप्रकाश इतिहास कसा घडवीत आहेत, हे पाध्ये यांनी मार्मिकपणे निदर्शनास आणले आहे.

जयप्रकाशांच्या आंदोलनामागे 'सामाजिक असंतोषा 'चा वैश्वदेव पेटविण्याचे उद्योगपर्व कसे दडले आहे, हे स्पष्ट करून जणु हा ' जय नावाचा इतिहास ' कसा घडविला जात आहे हे नेमक्या भाषेत त्यांनी शब्दांकित केले आहे. पाध्ये यांची political intuition, धगधगता अभिनिवेश आणि बिनतोड सिद्धांतन यातून एक master–piece या लेखरूपाने जन्माला आलेला आहे. त्यांच्या वैचारिक लेखनकलेचे रसग्रहण करण्याचे हे स्थान नव्हे–परंतु एवढे खरे की जयप्रकाशांच्या तेजस्वी चळवळीच्या आगामी इतिहासाची ओजस्वी प्रस्तावनाच पाध्ये यांच्या लेखणीतून अवतरली आहे. यापुढे जयप्रकाशांच्याबरोबरच पाध्ये यांच्या विचारभाऱ्यावरही डोळे लागून आहेत.

३०।११।७४

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १४ डिसेंबर | अंक : एकूणतिसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किमत : एक रुपया |


# हिमालयाच्या अलीकडे आणि पलीकडे

## काही प्रतिक्रिया

▫ १९ ऑक्टोबरच्या अकातील 'हिमालयाच्या अलीकडे आणि पलीकडे' हा लेख वाचला. चिंतनीय वाटला. कोणत्याही तत्त्वज्ञानाचा स्वीकार केल्यावर ते तत्त्वज्ञान ज्या भूमीत रुजवायचे आहे त्या मातीचा गुण विचारात घेतला नाही की मग पराभव हा ठरलेलाच ! आपल्या देशाचा मूळ पिंड धार्मिक किंवा आधिभौतिक आहे ही वस्तुस्थिती ज्याला येथे काही घडवावयाचे आहे त्याला दृष्टीआड करता येणार नाही. राष्ट्रवाद हा त्या वृत्तीचा एक आविष्कार आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा सदैव राष्ट्रवादाची अवहेलना करीत आला. तसेच वर्गविग्रहाच्या ठोकळेबाज कल्पना घेऊन येथील मध्यमवर्गाची 'पेटीबुर्ज्वा' म्हणून गणना करण्यात या पक्षाने फार मोठी चूक केली. याबाबतची आपल्या लेखातील निदाने म्हणूनच बरोबर वाटतात. हा पक्ष भविष्यकाळात कोणती व केवढी गरुड(?)झेप घेईल याविषयी आज न बोलणेच सूज्ञपणाचे ठरेल. तरीपण या लेखाच्या निमित्ताने भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या एकूण तात्त्विक विचारसरणीविषयी थोडेसे माडणे अप्रस्तुत ठरणार नाही.

वास्तविक पहाता ज्या 'मार्क्स'च्या नावाने सारा कम्युनिस्ट पक्ष चालतो त्या 'मार्क्स'लाही स्वत.च्या विचाराचा Ism करणे पसत नव्हते. परतु स्वत.च्या राजकीय सोयीसाठी मार्क्सच्या विचारांना Ism चे स्वरूप देऊन मार्क्सवाद हा एक पथ बनवून त्याच्याच अनुयायानी त्याच्यावर अन्याय केला आहे. त्यामुळे त्याच्या शास्त्रीय विचाराना गतीमानता व विकासशीलता आणणे असभाव्य किंवा गुन्हा ठरवले गेले. 'दास कॅपिटल'ला एका धर्मग्रथाचे स्वरूप देऊन व द्वद्वात्मक भौतिकवादाला (Dialectical Materiasm) परमेश्वररूप समजून आज येथील सगळे साम्यवादी वागतात. धर्मवेडया लोकाचा हट्ट–जो आपला विचार मानीत नाही तो शत्रू–त्याच्यात पुरेपूर आहे आणि म्हणूनच मार्क्सवाद (भारतात तरी निश्चितच) पराभवाच्या उबरठ्यावर उभा आहे.

जागतिक दृष्टचा विचार करता आज खरा कम्युनिस्ट कोण? रशियाच्या दृष्टीने चीन हा पथभ्रष्ट (Deviationist) आहे. चीनच्या दृष्टीने रशिया पथभ्रष्ट आहे या दोघाच्याही दृष्टीने युगोस्लाविया पथभ्रष्ट आहे या सर्व पथउपपथानी एकमेकाना जी विशेषणे लावली आहेत त्याचा अभ्यास केला तर सगळे कम्युनिस्ट देश पथभ्रष्टच आहेत की काय असे वाटते आणि म्हणून येथील थोडया फार असलेल्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांमध्ये चिरफळ्या पडल्या व त्याना अभिप्रेत असलेली 'क्रांती' त्यांच्यापासून अनंत योजने दूर गेली.

भारतातील काही विचारवतांमध्ये याविषयी चर्चा-मथन चालू आहे. श्री. के. दामोदरन् याच्या Indian Thoughts या पुस्तकात याचा मागोवा आढळतो. आपला लेख हे, या विचारमथनाची लाट सर्वत्र पसरते आहे याचेच एक उदाहरण आहे–आणि म्हणूनच स्वागतार्ह आहे.

शेवटचे पण महत्त्वाचे–या भूमीला कोणताच विचार वा तत्त्वज्ञान त्याज्य–अस्पर्श नाही. अगदी निरीश्वरवादापासून मूर्तिपूजकापर्यंत सर्व या देशात होते–आहेत पण परस्परसहिष्णुता हा त्या सर्वांत भाव होता. सध्याचा 'साम्यवाद' परस्परसहिष्णुता मानीत नाही–राष्ट्रवादाची उपेक्षा करतो–येथील जमिनीचा गुण उपेक्षितो अन् म्हणूनच या साम्यवादाचा पराजय येथे होत आहे. या देशाने साऱ्याना समजावून–सामावून घेतले. पण कोणाचीच अरेरावी चालू दिली नाही–येथे मुबईपर्यंत विजयी होणारे लोक किंवा तत्त्वज्ञान या भूमीत अरेरावी करू लागले की त्याच्या पराभवाची वेळ आलीच असे समजावे–असाच इतिहास घडत आला जग जिंकण्याची महत्त्वाकाक्षा बाळगणारा साम्यवाद त्याच मार्गाने जाणार का? तो तसा गेला तर बिलकुल आश्चर्य नाही–त्याच्या अनुयायानाच त्याचे बरे वाईट श्रेय आहे.

२४।१०।७४ — **सुहास बाक्रे, ठाणे**

▫ 'हिमालयाच्या अलीकडे आणि पलीकडे' हे आपल सपादकीय अनेक मुद्याना उठाव देऊन गेल आहे

भारतातील कम्युनिस्टाना ऐकवलेले चार परखड शब्द त्यांना निश्चितच झोबतील. ते झोबले तरच आपल्या लेखाचा उपयोग झाला अस मानता येईल. एक विशेष गोष्ट तुमच्या लेखात मला आढळली. ती म्हणजे कम्युनिस्टावर केलेली टीका सहृदय आहे. –त्यात या चळवळीला योग्य दिशा मिळावी, अधिक डोळसपणा

यावा हा हेतू आहे.

क्रातीच नेतृत्व कामगारवर्ग करील की शेतकरी करतील, मध्यमवर्ग त्यात कुठे असेल हे प्रश्न क्रातीच्या सदर्भात अप्रस्तुत नाहीत. ते खरेखुरे आणि महत्त्वाचे प्रश्न आहेत. पण हे प्रश्न खऱ्या अर्थाने लढ्याच्या विकासाच्या एका टप्प्यानतर महत्त्वाचे ठरतात. आणि दुसर म्हणजे 'ओव्हरऑल जनरलायझेशन' म्हणून या प्रश्नाना विशेष महत्त्व आहे. (त्या दृष्टीने त्याच्याइतकी अचूक थिअरी दुसरी नाही). पण लढ्याच्या प्राथमिक अवस्थेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा की गरीब जनता, मध्यमवर्ग, विद्यार्थी या सर्वांचेच प्रश्न सोडविण्यासाठी सतत लढत राहाणे आणि प्रत्येक लढ्याला सतत क्रातिकारी वळण देण्याचा प्रयत्न करणे (त्या लढ्यावर आपली पूर्वनियोजित मते न लादता--हे महत्त्वाच--जे भारतीय कम्युनिस्टाना जवळजवळ कधीच जमल नाही) हे क्रातिकारी वळण देण्यासाठीच कुशल नेतृत्व हवं. लेनिन, माओ याचे यश यात आहे की त्यानी प्रत्येक प्रश्नाला क्रातिकारी राजकारणाचं वळण दिल; प्रत्येक प्रश्न क्रातिकारी राजकारणाच्या समुद्रात कुशलपणे आणला. ह्या नेतृत्वाच्या जवळपास फिरकूही शकणार नेतृत्व भारतात नाही, ही वस्तुस्थिती आहे.

उजवा कम्युनिस्ट पक्ष विचाराने आणि कृतीने मोडीत आल्यासारखाच आहे. सर्व प्रकारच्या भोगळ कार्यक्रमाच्या मागे फिरत राहाणे आणि सोविएत रशिया आणि कॉंग्रेस याची पाठराखण करणे एवढेच हास्यास्पद कार्यक्रम त्याच्याकडे आहेत. तरुण मुलमुली या पक्षाकडे फिरकतील--फिरकावी अस कोणतच आशास्थान आव्हान--या पक्षाकडे नाही.

डाव्या कम्युनिस्ट पक्षाबद्दल थोड वेगळ आहे. पण त्याच्या कोणत्याच कार्यक्रमामध्ये जोर नाही की जो जनतेला आपल्यामागे आणील. त्यात कोणताच नवा विचार होताना दिसत नाही. महाराष्ट्रात तर हा पक्ष जवळपास दिसतच नाही.

नक्षलवादाच्या अतिरेकीपणाने आणि जनतेत पाया नसल्याने स्वत.च्याच पायावर दगड मारून घेतला आहे. परिणामी 'नक्षलवादी' ही डाव्याच्यातसुद्धा एक शिवीच बनली आहे.

कम्युनिझमचा भारतातील विकासही काही अंशी याला कारणीभूत आहे. सोविएत रशियातील नोकरशाही, चीनमधील व्यक्तीपूजा आणि साचेबदपणा, कम्युनिझममधील आतरराष्ट्रीयत्वाचा लोप, क्यूबा, व्हिएटनाम, रशिया-अमेरिका सबध, स्टॅलिन-ट्रॉट्स्की यांच्यातील मतभेदातील मूलभूत मुद्दे, भारतातील जातीव्यवस्था, आपल्या ग्रामीण अर्थरचनेची वैशिष्ट्ये, भारतातील भूमीहीन शेतमजुराचे व गरीब शेतकऱ्याचे प्रश्न या सर्व दोषाना, वैशिष्ट्याना आणि निकडीना विचारात घेणारा, त्यांच्याकडे स्वच्छ दृष्टीने पाहू शकणारा कम्युनिस्ट पक्ष भारतात अस्तित्वात नाही ही वस्तुस्थिती आहे. सोल्झेनित्सिन प्रश्नावर कम्युनिझमविरोधी लोकानी केलेली कोल्हेकुई जितकी कागावखोर आहे, तितकच अनेक डाव्यांनी या घटनेच केलेल विश्लेषण अप्रामाणिक आहे सोल्झेनित्सिन ही व्यक्ती म्हणून क्रातिकारी आहे की प्रतिक्रातिकारक आहे यापेक्षा रशियातील गेल्या काही दशकातील दमनयत्रणा कोणत्या प्रकारे कार्यरत आहे हे विशेष महत्त्वाचे आहे. आणि स्वत ला क्रातिकारक वगैरे म्हणवणाऱ्यानी याविषयी अपेक्षाभग करावा यासारख दु:खद काय असेल?

थोडक्यात म्हणजे मार्क्सवादासारख जिवत तत्त्वज्ञान या इथे (जास्त करून महाराष्ट्रात) हवाबद होऊन गेलं आहे.

जयप्रकाशी आदोलन, गुजराथची चळवळ यासारख्या चळवळी कितीही व्यापक आणि जोरदार झाल्या तरी त्याच्याजवळ मार्क्सवादाइतक मजबूत तत्त्वज्ञान आणि त्यातून येणारी सदैव पुढे पाहाण्याची दृष्टी नाही. त्यामुळे त्यांचा आवाका छोटा आहे. त्या चळवळीना स्वत ची अशी दृष्टी जोवर लाभत नाही तोपर्यंत त्या चळवळी पुढे गेल्या तरीसुद्धा त्या फॅसिझमला पायघड्यासारख्या उपयोगी पडतील ही भीती फारशी खोटी नाही. (अर्थात या घडीला त्याना फॅसिस्ट किंवा सी. आय. ए. च्या चळवळी म्हणणं बरोबर नव्हे) शिवाय आजचा त्यांचा पाया आणि पाठिबा पाहिला तर अस लक्षात येत की राजकारणात उजवे म्हणून 'गाजलेले' पक्षच या चळवळीबद्दल विशेष उत्साह दाखवीत आहेत. दुसर म्हणजे कामगार आणि शेतमजूर याना या चळवळीतून एक प्रकारे बाजूला टाकल जात आहे. विद्यार्थी नेतृत्वाचे व त्याच्या क्रातिकारकत्वाचे ढोल बडवले जात आहेत जमिनीचे फेरवाटप अथवा जमिनदारीवर आघात या दृष्टीने या चळवळीने बिलकूल पाऊल टाकलेल नाही (कदाचित जयप्रकाशजीना हिंसेची शक्यता वाटत असेल) थोडक्यात म्हणजे ही चौखूर उधळलेली चळवळ आहे. आणि त्यामुळे नव्या, जिवत आणि सर्वकष वगैरे क्रातीची तिच्याकडून अपेक्षा करण म्हणजे एकतर क्रातीचा अर्थ न उमगणं तरी आहे किंवा भाषणबाजी तरी आहे.

अर्थात कम्युनिस्ट पक्षासबधी आपण सदर लेखात केलेली विधाने खरीच आहेत. जयप्रकाशी आदोलनासबधीही इतक्याच स्पष्टपणे आपण काही लिहू शकाल तर एकूण जनतेच्या चळवळीना आपण नवी दिशा देऊ शकाल असा विश्वास वाटतो.

१९-१०-७४ एक मित्र

□ कॉ. डागे यांच्या अमृत–महोत्सवाच्या निमित्ताने लिहिलेला आपला 'हिमालयाच्या अलीकडे आणि पलीकडे' हा अग्रलेख वाचला. 'हिमालयाच्या पलीकडे' झालेल्या परिवर्तनाविषयी व हिमालयाच्या अलीकडील मरगळलेल्या भारताविषयी विचार करणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मनात धगधगणाऱ्या '...सर्व ठिणग्याचे (तेलगणचा लढा, नक्षलवादी उठाव इ.) ज्वालेत रूपातर का होऊ शकले नाही हा लाख मोलाचा प्रश्न आपण विचारला आहात! पण याबाबतची आपली कारण मीमासा व 'महान् नेतृत्वाचा अभाव याशिवाय दुसरे कारण या शोकातिकां मागे दिसत नाही. हे आपले उत्तर मात्र या महा जटिल प्रश्नाचे Over simplification वाटते. नेतृत्व राष्ट्राची व परिस्थितीची जडण घडण करते हे जरी खर असलं, तरी प्रथम परिस्थिती प्रत्यक्ष नेतृत्वाची उभारणी करते, जन्म देते हे विसरून चालणार नाही.

प्रत्येक देशाची माती, त्या मातीत घडलेली माणस व त्या माणसानी घडलेली सस्कृती–इतिहास अलग–अलग असतात. त्यामुळे 'चीनपेक्षा भारत वेगळा आहे, म्हणून इथे क्राती होऊ शकली नाही,

असं म्हणण गैर आहे. पण या म्हणण्याचा अर्थ वेगळाच आहे. त्या म्हणण्याचा खरा अर्थ आहे की इथली माती व मन अजून इतकी तापली नाहीत की ज्यातून क्रांतीचे धुमारे फुटतील ! माओने व त्याच्या साम्यवादी पक्षाने चीनमधील असतोषाच्या ठिणगीतून क्रांतीचा वन्ही चेतवला व क्रांतिनतरही समाज परिवर्तनाचे 'यज्ञ-कुड' धगधगत ठेवले याला कारण त्याचे कर्तृत्त्व-तपश्चर्या कारण आहे. पण इतर अनेक ऐतिहासिक घटना त्याना सहाय्यभूत झाल्या आहेत.

राष्ट्रवादी व साम्यवादी क्रांतिपूर्व चीनमधील परिस्थिती आणि स्वातत्र्यपूर्व व स्वातत्र्योत्तर भारतातील परिस्थिती यामध्ये फार फरक आहे ब्रिटिशानी आपल्याला पारतत्र्याच्या जू खाली भरडले, आपल्या नैसर्गिक साधन-सपत्तीची लूट केली. आपला स्वातत्र्य लढा चिरडण्याचा प्रयत्न केला या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी त्याचबरोबर त्यांनी स्वार्थाकरता का होईना, आपला खडप्राय देश कायदा-सुव्यवस्था व कारभार मर्यादित चौकटीत आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला, सस्थानिकावर वचक ठेवून जनसामान्याचे जीवन एका मर्यादे बाहेर असह्य होऊ दिले नाही, या गोष्टी नाकारण्यात अर्थ नाही. सहाजिकच स्वातत्र्याच्या चळवळीत देशाला साधारण जाग आली तरी सर्व साधारण माणूस आपापल्या ससारात रममाण राहिला. स्वातत्र्या-नतरच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची आच त्याला लागली नाही. 'स्वराज्य' आणि 'सुराज्य' यातील फरक त्याला समजला नाही.

चीनमधील परिस्थिती सर्वस्वी वेगळी होती. स्वत च्याच दुनियेत सुस्तावलेल्या आणि जीर्ण आचार-विचार याच्या आधारावर उभ्या राहिलेल्या चीनी साम्राज्याचा डोलारा, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस नव्या विचाराच्या व नव जोमाच्या सागरी सत्तानी मारलेल्या तडाख्यापुढे कोसळू लागला. बदलत्या जमान्याचा नूर ओळखून झटपट पावले टाकण्या ऐवजी जीर्ण प्रासादातील चिनी सम्राट-सम्राज्ञीनी प्रासादाची कवाडे आणखीनच घट्ट लावून घेऊन पडता डोलारा सावरण्याची केविलवाणी धडपड सुरू केली. पण आतून किडलेल्या व बाहेरून मोडकळीस आलेल्या या साम्राज्याची सागरी सत्तांच्या प्रत्येक लाटेबरोबर वाताहत होऊ लागली. मध्यवर्ती सत्ता कोलमडू लागल्या बरोबर सर्व दूर पसरलेल्या लष्करी अमलदारांनी स्वत.ची तुबडी भरण्यासाठी सामान्य जनाची कक्षरश. लाडगे तोड सुरु केली. आजवर जुलूम-जबरदस्ती होत होती, पण रबर तुटणार नाही याची दक्षता घेऊन ! पण लष्करी अमलदार स्वार्थाने आणि सत्तेने आधळे झाले होते. मनाची लाज तर सोडाच पण जनात जाब विचारणारी कोणतीही मध्यवर्ती सत्ता वा शक्ती उरली नव्हती. उरले होते मोकळे रान ! (या सदर्भात एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे मध्य-पश्चिम चीनची ज्या हुपेह, हुनान, सुधान इ० प्रातात या बेबद अमलदारानी जास्त धुमाकूळ घातला त्या भूमीतच चेन, माओ, चौ आणि चू तेह हे साम्यवादी वीराग्रणी जन्मास आले ! ) या अधाधुदीतच चुआनसारखा कपटी लष्करशहा सत्तेवर आला व त्याने पाश्चात्य विचारानी भारावलेल्या पण व्यवहाराची ओळख नसलेल्या प्रजासत्ताकवाद्याबरोबर लोकशाहीचा 'खेळ' आरभिला. चिनी इतिहास, परपरा, स्वभाव इ० चे भान ठेवता सरळ-सरळ आयात केलेल्या या लोकशाहीचा लवकरच खेळखडोबा झाला आणि लष्करी अमलदाराबरोबर लोकशाहीची वस्त्रे फेडणाऱ्या प्रजासत्ताकवाद्याचा तमाशा चिनी चनतेला भाजून काढू लागला. अशा या तापलेल्या आणि शतशः विदीर्ण झालेल्या भूमीत चेन आणि माओ यानी साम्यवादाचे रोपटे लावले आणि त्याला खतपाणी घालणाऱ्या घटना घडत गेल्या.

या अदाधुदीतून देशाला थोडे-फार सावरणाऱ्या 'नव नेपोलियनला'-चँग कै शेकला, साम्राज्यशाहीची स्वप्ने पडू लागली व स्वत.चे आसन बळकट करण्याकरता त्याने 'राष्ट्रीय आघाडीतील साम्य वाद्यावर शस्त्र उगारले. बेबंद अमलदारांना वठणीवर आणणारा चँग, राष्ट्रप्रेमाच्या लाटेवर आरूढ होऊन सर्व सत्ताधीश झाला, त्याच्या राष्ट्रवादाच्या घोषणेने जनता-विशेषतः विचारवताचा वर्ग त्याच्याकडे ओढला गेला, पण परकी सत्तांकडून होणारी मानहानी असहाय्यपणे बघणारा व जपानी मुलुखगिरीला टक्कर न देणारा हा वीर सिंहाचे कातडे पाघरलेले गाढव आहे हे कळण्यास लोकाना वेळ लागला नाही. हाल अपेष्टात जीवन गुजरणारा शेतकरी-श्रमजीवी वर्ग अगोदरच चँगपासून दुरावला होता. त्यातच साम्यवादी म्हणून वाटेल त्याला झोडपायला व 'साम्यवादी निर्मूलन' मोहिमात अमाप श्रम-शक्ती-पैसा उधळायला चँगने सुरुवात केली अशा या ऐतिहासिक क्षणी वैयक्तिक सुखदु ख, मानापमान इत्यादीच्या पलीकडे जाऊन साम्यवाद्यानी 'चिनी-चिन्याशी लढणार नाही.' अशी राष्ट्रप्रेमाने ओथबळलेली नाट्यमय घोषणा करून जपानविरुद्ध युद्ध पुकारले व सर्व थरातील चिनी जनतेच्या काळजाला हात घातला. चँग कै शेकला जपानशी लढणे भाग पाडले. विचारवताची मन जिंकलेल्या माओने जपानशी झालेल्या सगरात पद्धतशीरपणे ग्रामीण भागातील आपली पकड आणखी मजबूत केली व महायुद्धानतर चार वर्षातच चँगचे बुजगावणे पार समुद्रापलीकडे भिरकावून दिले !

आज भारतातील काही राज्ये अस्माना आणि सुलतानी निवडणुकीतून गांजून जाऊन पेटून उठली असली तरी सपूर्ण राष्ट्राला वा राष्ट्राच्या मोठ्या भागाला एकसाथ ढवळून काढील, बेचैन करील अशी घटना वा कालखड स्वातत्र्याचे माप ओलाडल्यानंतर आपल्या जीवनात आला नाही. अगदी १८५७ चे युद्ध, जालियनवाला बाग इ० मने पेटवून टाकणाऱ्या घटनापासून ते आजकालच्या गुजराथ-बिहारमधील चळवळी, त्या भूकपाच्या केंद्रबिंदूपासूनच्या भौगोलिक अतराच्या प्रमाणात थडावत गेल्या आहेत. भारताच्या प्रचड विस्तारावर, जाति-धर्म-भाषा-रूढि याने विदीर्ण झालेल्या भारतीय समाजावर टिळक, गाधी, नेहरू यानी मात केली खरी, पण त्याच्याकडील जादू स्वातत्र्याच्या मत्रातील होती. स्वराज्या करता सर्वस्व त्याग करून लढलेले आपले भाईबद-शिष्य-चेले 'सुराज्य'च्या दिशेला वाटचाल चालू होताच कसे दाही दिशाना पागले, स्वार्थाच्या तुबड्या भरू लागले, आपसात झोंबा-झोंबी करू लागले हे प्रत्यक्ष राष्ट्रपित्यालाच हताशपणे उघड्या डोळ्यानी पहावे लागले, डागे आणि त्याच्या पक्षाची काय बात !

क्षणभर ऐतिहासिक सदर्भ दूर ठेवून जरी विचार केला तरी कॉ. डाग्याकडून माओच्या नेतृत्त्वाची अपेक्षा करणे म्हणजे गोदा-

# ' मॉडेल्स ' आयात करण्याचे आपले वेड !

नर्मदेच्या प्रवाहात हो चांग हो, याग हो याचा अफाट विस्तार अपेक्षण्यासारखे आहे. केवळ एकाच हिमालयाच्या कुशीत जन्म घेऊन अंतिम समर्पणाकरता एकाच वेळी सुरवात केली म्हणून प्रत्येक नदी ज्याप्रमाणे महागंगेच्या पातळीला स्पर्शत नाही त्याचप्रमाणे एका आशिया खंडात एकाच वेळीस पक्ष बांधणीला सुरवात केली म्हणून डांगे व त्यांचा पक्ष माओच्या तोडीला जाऊ शकत नाही. 'अशा given formula त जर माणस घडली असती तर इतिहासाचा प्रवाह अगदी धोपटमार्गी राहिला असता. एकाच मातीत कौरव-पांडव जन्माला आले असते. दैवाची-तकदीरची ही किमया आहे आणि इथे दोन अधिक दोन–चारचे समीकरण अधुरे आहे.

भारतीय साम्यवाद्याकडून सर्वंकष क्रांतीचे शिवधनुष्य पेलण्याची अपेक्षा धरून तुम्ही त्याचा गौरव केला आहे इतर ऐतिहासिक परिस्थिती जरी सोडली तरी शिवधनुष्य पेलायला स्वतःचे स्नायु बलवान असावे लागतात. ती ताकद स्वतःच कमवायची असते– आपल्या मस्तीत व पद्धतीने. रशियाचे जू झुगारून देऊन माओ ने आपल्या बुद्धीने व चालीने ज्या क्षणी फासे फेकले, त्या क्षणीच तो मोठा झाला. ' Our nation will never again be an insulted nation. We have stood-ap ' असा सामर्थ्याचा हुंकार देऊ शकला. ' साम्यवाद ' की ' राष्ट्रवाद ' या भोवऱ्यात न सापडता माओने राष्ट्रवादाच्या नौकेतून साम्यवादाचा किनारा गाठला. आपल्याकडील त्यागी पण आधळे साम्यवादी मात्र या भोवऱ्यात गटांगळ्या खात बसले. आपल्याला अभिप्रेत असलेला ' आंतरराष्ट्रीय साम्यवाद ' प्रत्यक्षात रशियाचा राष्ट्रवाद आहे, आपण त्यांच्या डावातील एक प्यादे बनले आहोत हे विसरले आणि भारतीय जन-प्रवाहापासून दूर फेकले गेले. सर्वस्वाचा होम केलेली डांगे–रणदिवे–मुजुमदार इ. माणसे ' विकली ' जातील असं ज्याना वाटत त्याच्या भाबडेपणाची कीव येते, पण त्यांच्यासारखी हुशार–त्यागी माणसे पण रशिया वा चीनचे ' मॉडेल 'च गिरवीत बसावी याचे वाईट वाटते. पण त्याच-बरोबर मनात विचार येतो की साम्यवाद्यांना दोष देणाऱ्या लोक-शाहीच्या पूजकानी तरी काय केले ? अँग्लो–सॅक्सन लोकशाहीचा सांगाडाच सरळ–सरळ आयात केला ना ? आपल्या परंपरा, कुवत, जाणिवा याची जाणीव न ठेवता लोकशाहीचा देव्हारा त्यानी या भूमीत उभा केला आणि आज प्रतिदिनी होणारी त्याची विटंबना पहाण्याचे आपल्या नशिबी आले आहे. एकूण काय तर ' मॉडेल ' आयात करण्याचाच आपला इतिहास आहे, मग एका पार्टीला व एखाद्याच्या नेतृत्त्वाला दोष देण्यात काय अर्थ आहे !

पाश्चिमात्य विचारवंताच्या मते भयानक दारिद्र्यात पिचणाऱ्या आणि कमालीच्या दुःखाने गांजलेल्या भारतात आजवर क्रांतीच्या किमान सहस्र लाटा फुटावयास पाहिजे होत्या. त्याची मोज-मापे ठीक आहेत, पण ' ठेविले अनंते तैसेंची रहावे ' या आपल्या जनतेच्या हाडी-मासी भिनलेल्या ' गुणाची ' पूर्ण ओळख असणाऱ्यानी तीच मोज-मापे वापरून कसे चालेल ? भुकेचा डोंब पोटात पेटला असताना देखील अजूनही अन्नछत्रापुढे स्पृश्य-अस्पृश्याच्या वेगवेगळ्या रांगा लागलेल्या आपल्याला दिसतातच ना ? पूरग्रस्तासाठी बांधलेल्या नव्या गावठाणात अजूनही ' महार वाडा ' अलग बांधला जातोच ना ? साम्यवाद्यांनी हयात घालवलेल्या गिरणी कामगारामध्ये अजूनही ' कपडा-खात्यात ' अस्पृश्य नेमला जात नाही ना ? एकात्मतेच्या कितीही गप्पा मारल्या तरीही आपल्या पांढरपेशा समाजात आजही ' सिंडिकेट बँकेत ' कारवारी, देना बँकेत गुजराथी व ' महाराष्ट्र बँकेत ' मराठी ( त्यातूनही सदाशिव पेठी कोकणस्थ ब्राह्मण असल्यास बरा ! ) भरले जातातच ना ? तुमच्या माझ्या घरचे–आजुबाजूचे लोक आजही ' खालच्या वर्गातले लोक ' इ. अगदी सहजपणे बोल-तातच ना ? अगदी छोट्या छोट्या वाटणाऱ्या या गोष्टीतून आपल्याला अजून किती दूरचा पल्ला गाठावयाचा आहे, याची कल्पना येते. आपल्या समाज जीवनाच्या खोलवर भिनलेल्या या विषवल्ली एखाद्या प्रचंड झंझावाताशिवाय समूळ उपटून काढणे किती कठीण आहे याची कल्पना आपल्याला नसेल का ? त्यातून आपल्या नशिबी ' काँग्रेस ' नावाची अशी एक अजब ग्रहमाला आली आहे की त्यात मोरारजी–पाटील–घोष पासून ते मेनन–मालवीय–त्यागीपर्यंत सर्व विचाराचे ग्रह ( आता पक्ष बदलले असले तरी ) सामावले गेले होते. आजही शंकरराव मोहिते पाटील व यशवंतराव मोहिते एकाच काँग्रेस पक्षाच्या छावणीत आहेत. त्यामुळे आपल्या गोलमाल व धूर्त धोरणानी काँग्रेसने स्वतंत्र पक्षापासून ते अगदी ' डाव्या साम्यवाद्यां ' पर्यंत सर्व पक्षाच्या शिडातील हवा वेळोवेळी काढून घेऊन इतर सर्व पक्षाचे राजकारण फक्त ' प्रत्युत्तरा 'च्या रिंगणापर्यंत खेळत ठेवले आहे लोकशाही निवडणुकांचा देखावा व सांगाडा कायम ठेवून, पैशाच्या बळावर सत्तेचा दोर आपल्या हातात खेळवीत ठेवला आहे. लोकांच्या असंतोषाची वाफ बाहेर पडण्याकरता सर्व सुरक्षित झडपा उघड्या ठेवून आपल्या मर्मबंधाला मात्र कुठे धक्का लागणार नाही याची काळजी घेतली आहे. सर्व माणसाना सर्वकाळ मूर्ख बनवता येत नसले तरी ' काही माणसांना सर्वकाळ ' वा ' सर्व माणसाना काही काळ ' मूर्ख बनवता येते हे व्यवहारातले सत्य विसरून कसे चालेल ?

पण जमाना झपाट्याने बदलत आहे ! बियाण्यातील भेसळीने सतापलेला शेतकरी वर्ग, रॉकेलमधील भेसळीने कावलेल्या मध्यम वर्गाच्या जवळ येत आहे. आपल्या केसाच्या वळणाच्या फिकिरीत रहाणारा विद्यार्थी समाजाला वळण लावण्याची भाषा बोलत आहे. रामराज्याच्या इंद्रधनुमागे लागलेला यतिवर्ग वास्तवाच्या अग्निकुंडात प्रायश्चित घ्यायला उतरला आहे. आणि अवती–भवती वडवानल पेटत असता, मत्त यादव अजूनही ' यादवी 'तच मस्त आहेत. मला वाटत, Long march ला आता खरी सुरुवात झाली आहे.

पुणे

जगदीश र. गोडबोले

# असाही एक 'एशिअन ड्रामा' वुईथ स्पेशल रेफरन्स टू इंडिया

सतीश श्रीवास्तव

रविवार. सध्याकाळ.. हॉटेल. जाम गर्दी.
'एक इस्संव दोन रुपये'
मलईदार बासुदीची चव अजून रेंगाळते आहे.
'फूटपाथवरील पोरांचे या...' इत्यादी इत्यादी
तर असा एक पोरगा.
'चल हॅट...'
'सायेऽब !' आणि एक पसरलेला अखड लाचार हात.
मी लक्ष देत नाहीये. बऱ्याच दूरपर्यंत.
अजून पिच्छा सोडला नाही त्याने.
मी धमकावलं. म्हटलं जाईल आपोआप.
मी वेड्यावाकड्या गल्ल्या ओलाडित चाललो आहे.
अजून तो आहेच–
त्याच्या छोट्या धावणाऱ्या सावलीवरून मला कळतय.
कुणाच्या पाठीमागे लागलय दारिद्र्य ?
'साल्याच्या द्यावी एक थोबाडीत.'
मी पुन्हा वळलो
'तू जातोस का पोलीसाच्या ताब्यात देवू ?'
आणि बदल्यात तो ओठ दुमडून हुदकला
आणि आता चक्क रडतोय.
'इकडे ये... ... ... जेवलास सकाळपासून ?'
मानेनेच नाही म्हणतोय.
मी त्याला दोन केळी दिली.
'बाप काय करतो तुझा ?'
'हाडक गोळा करतो.'
'अन्...'
'इकतो'
'आई ?'
'कागद गोळा करीती–'
'भाऊबहिणी किती ?'
'यक भाऊ.'
वेल ! परफेक्ट फॅमिली प्लॅनिंग !
'काय करतो ?'
'भीक मागतो.'
'दो या तीन बच्चे, होते है घरमे अच्छे !'
'आईने खायला दिल नाही ?'
'न्हाई.'
'का ?'
'म्हनती, भूक लागली म्हंजे चट भीक मागून खातील–'
एसे दान देगा देवा,
माझी कूस धन्य व्हावी ।।
अरे, जेथे मायपान्हाच आटलेला
व जेथून ठुसठुसणार दारिद्र्य ठिबकतय
तेथे लक्तरातून लोंबणारा आतड्याचा आक्रोश कोण ऐकणार ?
'देखने की हद होती है कबतक देखे हम
देशकी तौहीन और बरबादी को कबतक देखे हम
दिलमे आता है लगा दे आग इसे हम
लडखडाते सिंहासन को कबतक देखे हम'
राजे बदलले. सिंहासन तेच !
आणि या सिंहासनाच्या सरणाची
लाकड गोळा व्हायला लागली आहेत
हा नजिकच्या भविष्यकाळातील लुकलुकणारा दिलासा आहे.
सगळ्यांनी यायला हव.

# वादळ

अशोक मनोहर

ही झोपडी आहे, रडत आहे
हिन आजपर्यंत फक्त रडणच ऐकल आहे.
हिन पाहिली आहेत हातापायाच्या काड्या झालेली
पोट फुगलेली पोर
जर्मलच्या भाड्यातून खरवडून करपलेली डाळ खाणारी नागडी पोरं
हिन ऐकल्या आहेत अब्रू गेलेल्या स्त्रीयाच्या असहाय्य किंकाळ्या
हिनं पाहिली आहेत कुडकुडत झोपणारी उघडी शरिर
हिन् वाढवलं आहेत फक्त कष्ट करणारे उपाशी देह
रोज सडत जाणारे रक्तहीन देह
सताप चीड बाळगणारे तरीही थड देह
ही चाळ आहे, मोडत आली आहे
हिन आजपर्यंत बघितल्या आहेत खूप रागा
हिन ऐकली आहे अखड कुरकुर
हिन पाहिले आहेत असे ससार की जे केव्हाही मोडून पडतील
ज्याप्रमाणे बाह्य टेकूवर ती उभी आहे
त्याचप्रमाणे खोट्या कल्पनाच्या, धर्माच्या, नितिमत्तेच्या
देशप्रेमाच्या टेकूवर उभे असलेले असंख्य ससार
हिनं पाहिले आहेत.
हिन वाढवले आहेत देह जे तात्पुरत्या धडपडीशिवाय
काही करत नाहीत.
ज्याच्यापाशी हिंमत नाही जे कधीही पुऱ्या न होणाऱ्या स्वप्नातच
दंग असतात असे देह
आणि
ती तिकडे बगली आहे, हसते आहे
समोरच्या झोपडीकडे, चाळीकडे मोठ्या डौलदारपणे बघत आहे.
बगलीन पाहिल्या आहेत असख्य मोठ्या पार्ट्या
बगलीन पाहिल आहे जगातल सार सौदर्य
बगलीनं ऐकल आहे सर्वोत्तम सगीत
बगलीन ऐकली आहेत नितिमत्तेची मानवतेची प्रवचन
बगलीन पाहिला आहे रोमाचकारी साजशृगार
बगलीन वाढवली आहेत ब्रेड-बटर खाणारी पोर
बगलीन वाढवले आहेत विद्वान (!)
बगलीने ऐकले आहेत जग जिंकण्याचे मनसुबे
बगलीन वाढवले आहेत चरबीचे देह
वजन कमी करण्यासाठी डायेट करणारे देह
झोपडी चाळ आणि बगली उभी आहेत एकाच जमिनीवर अगदी समोरासमोर
सगळीकडे राहाणाऱ्या प्राण्यास निसर्ग ओळखतो माणूस म्हणून
वर्षानुवर्षे हे असेच आहे.
पण आज अचानक काहीतरी घडत आहे
कोणत तरी प्रचड वादळ होणार आहे.
त्या वादळाची चाहूल
झोपडीला आहे
चाळीला आहे
अन् बगलीलाही आहे
वादळाची सुरुवात झोपडीमागून होणार आहे.
आणि बगली पलीकडे सरणार आहे
झोपडी अन् चाळीला वादळाची भीती नाही
जे ऐकल जे पाहिल त्याला त्या कटाळल्या आहेत
पण बगलीला वादळाच्या कल्पनेनीच भयभीत केले आहे.
आजपर्यंत उभ्या केलेल्या साऱ्या तटबद्या कोसळतात की काय ?
ही शका बगालीला स्वस्थ बसू देत नाही;
नव्या तटबदीच्या शोधात बगली आहे.
पण वादळाचा जोर न्यारा आहे
साऱ्या तटबद्या ओळखून शेवटचा हल्ला करण्यासाठी
नव्या घडणीसाठी जमीन खाली करण्यासाठी
वादळ नवे मार्ग शोधत आहे;
नवे डावपेच आखत आहे
वादळ येणार आहे अगदी सोसाट्यान येणार आहे
बगलीला नको असल तरी येणारच !

# उपाशी जग

## रोम परिषदेचे फलित

वा. दा. रानडे

गेल्या महिन्यात रोम येथे झालेली जागतिक अन्न परिषद मराठी वृत्तपत्रातून दुर्लक्षिली गेली, पण अविकसित राष्ट्राच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची होती. उपासमारीविरुद्ध लढाईसाठी संघटितपणे उपाय योजणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता विकसित राष्ट्रानी याबाबतीत पुढाकार घ्यावयास हवा पण प्रश्नाच्या गांभीर्याच्या मानाने त्यांच्याकडून मिळालेली आश्वासने फार तुटपुंजी व अपुरी होती. त्यामुळे परिषदेच्या निर्णयानी अविकसित राष्ट्राची *निराशा झाली. 'पॅन'* या जागतिक अन्न परिषदेच्या अनधिकृत वृत्तपत्राने पुढील शब्दात ही निराशा व्यक्त केली : "संधि आली होती पण औदार्य दिसले नाही. त्यामुळे संधि गेली आणि अर्धपोटी मृतवत जिणे जगणाऱ्या अनेक कोटी लोकाच्या मनातील आशाही नष्ट झाली."

"उपासमारीविरुद्ध लढाई ही सर्व राष्ट्राची सामाइक जबाबदारी आहे" असे घोषित करणारे निवेदन परिषदेने मंजूर केले आणि याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी जागतिक अन्न मंडळ नेमण्याची भारताची सूचनाही संमत झाली "प्रत्येक पुरुष, स्त्री व मुलास उपासमार आणि निकस आहारापासून मुक्तीचा मूलभूत हक्क आहे" हे १२३ राष्ट्राच्या या परिषदेने मान्य केले.

राष्ट्रानी आपला लष्करी खर्च कमी करून ती रक्कम विकसनशील राष्ट्राना धान्य उत्पादन वाढविण्यासाठी द्यावी हा पेरुचा ठराव परिषदेने मतदानाशिवाय पास केला. पण याचा अर्थ तो एकमताने पास झाला असे नव्हे. मतदान घेतले असते तर आम्ही तटस्थ राहिलो असतो हे अमेरिका व काही पाश्चात्य राष्ट्रानी स्पष्ट केले. आम्हाला शस्त्रकपात आणि धान्य उत्पादन दोन्ही हवी पण या दोहोंचा काही संबंध आहे असे आम्हाला वाटत नाही असे त्याचे म्हणणे होते. अन्न प्रश्नावर बडी राष्ट्रे आणि छोटी राष्ट्रे असे दोन तट पडल्याचे परिषदेत स्पष्ट दिसून आले. त्याचा उल्लेख करून सेनेगलचा प्रतिनिधी म्हणाला, "गटागटानी व संघर्षाने परिषद *अयशस्वी झाली. आपण काही उच्च* मानेने परत जात नाही" पण अमेरिकन प्रतिनिधीला मात्र तसे वाटले नाही. तो म्हणाला, "परिषद सपल्यानंतर लागलीच उद्या अन्न मिळेल अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती. दहा वर्षांत आपण ते उद्दिष्ट गाठणार आहोत." विकसनशील राष्ट्रात धान्य–उत्पादन वाढविण्यासाठी एक खास निधि उभारण्याचा निर्णय रोम परिषदेने घेतला.

दहा वर्षाच्या वायद्यापेक्षा आजच्या निकडीच्या गरजा भागविण्यासाठी प्रत्यक्ष पदरात काय पडणार हा अविकसित राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न होता. त्याबाबतीत त्यांची निराशा झाली. तातडीची मदत म्हणून एक कोटी टन *धान्याची मागणी या* राष्ट्रानी केली होती पण परिषदेने निम्मी मागणीच मान्य केली.

धान्य उत्पादनात समृद्धी असलेल्या राष्ट्राकडून परदेशाना जी धान्य निर्यात होते त्यापैकी मोठा वाटा विकसित राष्ट्रांनाच जातो. अविकसित राष्ट्राना कमी वाटा मिळतो. या राष्ट्रानी १९७३–७४ मध्ये ७ कोटी १० लाख टन गहू निर्यात केला त्यापैकी फक्त २ कोटी ७० लाख टन गहू अविकसित राष्ट्रांना मिळाला. अमेरिकेने ३ कोटी २० लाख टन गव्हाची निर्यात केली त्यापैकी फक्त १ कोटी २० लाख टन गहू अविकसित राष्ट्राना मिळाली. भरड धान्याच्या बाबतीत हीच परिस्थिती होती. संपन्न राष्ट्रानी ६ कोटी ६० लाख टन भरड धान्याची निर्यात केली. त्यापैकी फक्त ८० लाख टन भरडधान्य अविकसित राष्ट्राना मिळाले.

जगातील ४० कोटी लोकांना आज निकस अन्नावर अर्धपोटी जगावे लागत आहे आणि त्यापैकी निम्मी मुले आहेत. निकस व अपुरा आहार म्हणजेच उपासमार हे निम्म्यापेक्षा अधिक बालमृत्यूचे कारण आहे. धान्याची गरज भागवायची तर लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा धान्य उत्पादन वाढीचा वेग जास्त हवा पण या दोहोतील अंतर कमी होऊ लागले असून हाच कल कायम राहिला तर *वाढत्या लोकसंख्येची धान्याची गरज* भागविणे कठीण जाणार आहे. जगातील दर माणशी सरासरी धान्यउत्पादन १९७१ मध्ये १९६१ पेक्षा फक्त ८ टक्के जास्त होते. १९७२ मध्ये त्यात घट झाली. १९७३ मध्ये १९७१ ची पातळी पुन्हा गाठली. जगात दरवर्षी आठ कोटी नवे जीव जन्म घेत *आहेत. धान्य उत्पादन मात्र त्या वेगाने* वाढत नाही. त्यामुळे दरवर्षी ७ कोटी ६० लाख टन धान्याची टचाई भासणार आहे. याचाच अर्थ तीस कोटी लोकाना उपासमारीचे जिणे कठावे लागणार आहे. यूनोच्या तज्ज्ञाचे अदाजाप्रमाणे धान्य टचाई भरून काढता आली नाही. तर युद्धात किंवा नैसर्गिक आपत्ती जेवढी सामुदायिक उपासमार झाली त्यापेक्षा अधिक उपासमार या परिस्थितीमुळे *माणसाना सोसावी लागेल.*

ही धान्य टचाई भरून काढण्याएवढी भौतिक व तांत्रिक साधन सामग्री जगातील राष्ट्रापाशी आहे. मग घोडे अडले कोठे? घोडे अडले आहे ते यासाठी लागणारा पैसा कोणी खर्च करावयाचा या प्रश्नावर एकट्या अमेरिकेतील शेतकरी ही टंचाई भरून काढू शकेल पण जगाच्या अर्थव्यवस्थेवर पुन: आपली पकड बसविण्याची संधी एकट्या अमेरिकेला *देण्यास इतर विकसित राष्ट्रांचा* विरोध आहे. तज्ज्ञाच्या अदाजाप्रमाणे १९८५ पर्यंत अविकसित राष्ट्राना वर्षाला ७ कोटी ६० लाख टन धान्याची तूट जी भासणार आहे ती भरून काढण्यासाठी दोनशे कोटी डॉलर (म्हणजे ४००० कोटी रुपये) खर्च कोणी करावयाचा हा खरा प्रश्न आहे. अविकसित राष्ट्रे एवढा पैसा देऊ शकत नाहीत हे उघड आहे. उपासमारीचा प्रश्न अशा रीतीने दारिद्र्याच्या प्रश्नाशी निगडित आहे. उपासमारीचा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या सामर्थ्यास अनुरूप असा मोठा प्रयत्न करण्याची तयारी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री किसिंजर यांनी परिषदेपुढील भाषणात दर्शविली *पण यात उदारपणा* नसून अमेरिका आपला स्वार्थ कसा साधीत आहे हे दक्षिण अमेरिकेच्या एका प्रतिनिधीने स्पष्ट केले. तो म्हणाला, हा पेचप्रसंग अमेरिकन शेतकऱ्याच्या धान्यास बाजार पेठेची निश्चित हमीच *मिळवून* देणार आहे.'

अविकसित राष्ट्रे अविकसित राहिली हा साम्राज्यशाही राष्ट्रानी गेले एक शतक केलेल्या त्याच्या पिळणुकीचा परिणाम आहे. हेच धोरण अगदी उघड नव्हे पण अप्रत्यक्ष स्वरुपात त्यानी चालू ठेवले आहे. मागासलेल्या राष्ट्राच्या विकासासाठी प्रयत्न केल्याचा देखावा ही बडी राष्ट्रे करीत असली तरी या बाबतीत फारसे भरीव कार्य ही राष्ट्रे करणार नाहीत. कारण मागासलेली राष्ट्रे मागासलेली राहाण्यातच त्याच्या शेतकऱ्याचे हित संबध सुरक्षित राहणार आहेत. □

आपला देह झोकून दिला. बाहेरील दरवाजा बंद करून त्यांची पत्नी जवळ आली. त्यांची मुले जवळ येऊन उभी राहिली. रक्तबंबाळ झालेल्या बापाकडे ते तारवटल्या आणि भरल्या डोळ्यानी बघत राहिले. रिकाम्या हाताने डॉक्टरानी आपल्या छोटया मुलाला जवळ घेतले आणि डॉक्टराच्या डोळयात अश्रू तरारले. त्यानी आपल्या पत्नीस म्हटले, 'आज आयुष्यात पहिल्यादा माणुसकीवरील माझा विश्वास उडाला. ज्याना मी प्राणदान दिले तेच माझ्या प्राणावर उठले. असो. तू या मुलाची नीट काळजी घे. जपून रहा शोक करू नकोस.' आतापावेतो बराच रक्तस्राव झाला होता. डॉक्टरानी डोळे मिटले. मिटल्या डोळयासमोर ओळखीच्या राक्षसाचा नंगानाच चालू होता. डॉक्टरानी पुन्हा डोळे उघडलेच नाहीत. जवळच उभा असलेला डॉक्टरचा मुलगा आपल्या पिताजीच्या त्या भीषण मृत्यूकडे थिजल्या डोळयानी बघत होता. आपल्या आईचा आक्रोश त्याला ऐकवत नव्हता. तो असहाय्य होता. परंतु एकदर दृश्याने तो पेटून उठला आणि मनोमन प्रतिज्ञा करता झाला, 'पिताजी, आपण सुखाने स्वर्गारोहण करा. आपल्या खुनाचा सूड मी घेईनच.'

डॉ. नारायण रेड्डी हे मुदीगोडा गावच्या (नलगोडा जिल्हा) श्री. बुच्चारेड्डीचे ज्येष्ठ चिरंजीव. याचे प्राथमिक शिक्षण जडचरला येथे आणि पुढील शिक्षण हैदराबाद येथील 'चादरघाट हायस्कूल' आणि 'उस्मानिया विद्यापीठा'त झाले. व्यायाम आणि खेळ याना अती प्रिय. या स्पर्धांतून त्यानी अनेक पारितोषिके मिळविली होती. उस्मानिया हॉस्पिटलमधील डॉ. बहाद्दूरखाँ या विख्यात सर्जनचे सहाय्यक म्हणून त्यानी काम केले. पुढे सहकारी नोकरीचे त्यागपत्र देऊन यानी नामपल्ली रोडवर स्वतंत्र दवाखाना थाटला. मित्राच्या आग्रहाखातर दि. २४–९–१९४४ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर त्यांनी दवाखाना काढला. थोडयाच दिवसात त्याचे त्याच्या रोग्यात ऐंशी टक्के लोक मुसलमान होते. त्यातल्या जवळ जवळ २५ टक्के मुसलमानावर फुकट इलाज करीत ते फार उदार होते. आपले मित्र डॉ. मूर्ती यांच्या-समवेत ते स्टेट कॉंग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाला प्रेक्षक म्हणून उपस्थित होते. हाच त्याचा अक्षम्य अपराध होता. केवळ हिंदू असल्यामुळे त्याच्या प्राणावर बेतले. एवढी मोठी प्रतिष्ठित व्यक्ती मारली गेली परंतु कोणीही पकडला गेला नाही. वरगल सुभेदार हबीब उलाखाँ मात्र मनातल्या मनात आपल्या कार्यावर प्रसन्नतेने हसत होता.

डॉ. नारायण रेड्डीचा मोठा मुलगा सुधीर रेड्डी, आज भारतीय सेनेत मेजर आहे वडिलाच्या श्राद्धदिनी त्याने आपली प्रतिक्रिया सांगितली, " माझ्या वडिलांना मुसलमानानी हकनाक मारले. मी लहान होतो. परंतु रक्तबंबाळ वडील मला दिसतात. मी सूड घेण्याची प्रतिज्ञा केली होती पाकिस्तान–बांगला युद्धाने ती संधी मला दिली. भारतातर्फे लढत असता जवळ जवळ साठ–सत्तर पाकिस्तान्याना मी मारले. माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली. बांगला देशात माझ्यावरही पाकिस्तान्यांनी छुपा हल्ला केला होता. मी घायाळ झालो होतो. परंतु वाचलो. आपल्यावर सोपविलेल्या कार्यात यश मिळविण्याबद्दल मला सार्थ अभिमान आहे. आणि आतताई तत्त्वाना चिरडून टाकण्याची संधी मिळाल्याचा आनंदही आहे "

मुसलमानानी–रझाकारानी आपल्या पाशवी अत्याचारानी आणि राक्षसी बलात्कारानी माणुसकीला काळीमा फासला. निरपराध माणसाना मारणे, स्त्रीचे सतीत्त्व लुटणे, घरा झोपडयाना आग लावणे, बेदम मारझोड करणे याशिवाय अनेक राक्षसी प्रकार त्यानी हिन्दूना नेस्तनाबूद करण्यासाठी अवलंबिले. अन्यायाच्या एकेक कथा अंगावर शहारे आणतात, रोमांच उभे करतात.

विसाव्या शतकात या घटना अतिरंजित वा असंभनीय वाटण्याची शक्यता आहे परंतु नुकतेच पूर्व बंगालात या निकृष्ट, धर्मांध मनोवृत्तीचे नग्नरूप जगाने पाहिले आहे. पाकिस्तानी मुसलमानाद्वारे बंगाली मुसलमानावर जे अत्याचार झाले त्याने सारे जग हादरले, विस्मित झाले, अनुकंपित झाले इथे तर रझाकाराचा, ज्यांच्या कार्यास सर्व सत्ताक निझामाचा आशीर्वाद होता. मुकाबला असहाय्य हिन्दू प्रजेशी होता. तेव्हा हिन्दूवर झालेल्या अन्याय–अत्याचाराची कल्पना येऊ शकेल. बंगालमधील पाशवी अत्याचाराच्या कथा, वृत्तपत्रे, चित्रे आणि आकाशवाणी यांच्या माध्यमातून जगभर पसरल्या. परंतु हैद्राबाद राज्यात हिन्दूवर झालेल्या अत्याचाराना सूर्य–प्रकाशही दिसला नाही. ☐ ☐

## ऑपरेशन लक्ष्मीरोड

पृष्ठ १३ वरून

किंमत याविषयी आपले दडपण यशस्वीपणे आणता येते.

ग्राहक चळवळ अशा वस्तूबाबत अधिक यशस्वी होईल की ज्या अगदी जीवनावश्यक नाहीत ही गरजही पुन्हा हास्यास्पद वाटेल. कापड, घरे, चैनीच्या वस्तू, प्रवास इत्यादीच्या बाबत ग्राहक चळवळ हे एक प्रभावी हत्यार बनू शकेल आपल्याकडे चळवळ म्हटली की ती जीवनावश्यक वस्तूसाठीच करावयाची व गरिबानीच करावयाची असा संकेत रूढ असल्याने वरील कल्पना पटणार नाही पण अमेरिकेत तसा काही प्रकार नाही.

ग्राहक चळवळ यशस्वी होण्यासाठी तिसरी आवश्यकता म्हणजे अर्थव्यवस्थेत काळा पैसा फार असता कामा नये. चलन हे सारखे फिरते पाहिजे–चक्राकार प्रवासात ते मध्ये मध्ये साचून राहाता कामा नये. आपल्याकडे कापड, चैनीच्या वस्तू, औषधे याच्या किंमती जास्त आहेत त्या ग्राहकाच्या खरेदीच्या दबावामुळे नव्हे तर काळया पैशाच्या भक्कम आधारामुळे.

चौथी आणि फार महत्त्वाची गरज म्हणजे सर्व किंमती खुल्या पाहिजेत.. निर्धारित किंमती–ज्या आपणाकडे बहुतेक वस्तूबाबत प्रचलित आहेत–स्वत चे असे निराळेच अर्थशास्त्र पाळतात. त्या कोणत्याही दबावास फारशी दाद देत नाहीत.

या साऱ्या विचारावरून हे स्पष्ट होईल की ग्राहक चळवळ ही प्रगत भांडवलशाही-मध्येच प्रभावी ठरणारी औषधी आहे. आपल्यासारख्या अप्रगत सरंजामशाहीत तिचे स्वरूप प्रतीकात्मक राहाणे क्रमप्राप्त आहे.

मग किंमती खाली येणार की नाही? त्या का वाढतात? त्यात उत्पादक विक्रेता–सरकार–जनता याचा वाटा किती? जीवनावश्यक वस्तूच्या बाबत कोणते धोरण असावे? सध्याचे पूंजीपतीचे बाहुले–सरकार ते अंमलात आणू शकेल काय? गरज, अडचण या बरोबरच काही वस्तूच्या बाबत स्टेटस–व्हॅल्यू हा प्रकार किंमत वाढीस पूरक ठरतो काय? असे अनेक प्रश्न ग्राहकांच्या समोर उभे राहातात

या साऱ्याचा विचार या छोटयाशा टिपणात करणे शक्य नाही. या प्रश्नाचा मागोवा असाच वेळोवेळी केव्हातरी घेतला पाहिजे. 'ऑपरेशन लक्ष्मी रोड'ने अशा प्रश्नाच्या विचारास चालना दिली तरी तेही यश काही कमी नाही. ☐



# टॉलस्टॉय : एक माणूस

**लेखिका : सुमती देवस्थळे**
**परीक्षण : प्रा. वि. ह. कुलकर्णी**

टॉलस्टॉय हा सुमती देवस्थळे यांनी लिहिलेला ५३३ पृष्ठांचा चरित्र-ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. अलीकडे कागदाची टंचाई असूनही चारपाचशे पृष्ठांच्या कादंबऱ्या व कादंबरीवजा पौराणिक वा ऐतिहासिक चरित्रे प्रसिद्ध केली जातात व ती वाचलीही जातात. प्रस्तुत चरित्र-ग्रंथ हा मात्र टॉलस्टॉय या सर्वतोपरी परकीय व्यक्तीसंबंधीचा आहे. त्याचा मृत्यू होऊन साठ वर्षे होऊन गेली असल्यामुळे तो आता इतिहासजमा झाल्यासारखाच आहे. त्याच्या कथा- कादंबऱ्या आजही मोठ्या आवडीने वाचल्या जात असल्या तरी त्याच्या चरित्राविषयी कुणाला कुतूहल असेल असे वाटत नाही. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की टॉलस्टॉय याचे चरित्र त्याच्या कादंबऱ्यांपेक्षाही अद्भुत घटनांनी भरलेले आहे; व त्याचे चरित्रलेखक ते बऱ्यावाईट रीतीने अधिकच अद्भुत करतात. परंतु सुमती देवस्थळे यांनी मात्र ते तटस्थ वृत्तीने व सत्यान्वेषण करण्याच्या चिकित्सक बुद्धीने लिहिले असल्यामुळे वाचकाला ते त्याच पद्धतीने वाचून काढणे हे एक प्रकारचे आव्हानच आहे. परंतु सुमती देवस्थळे यांची लेखनपद्धती प्रौढ काव्यात्म व सूचक असूनही इतकी ओघवती, सुबोध आणि रसाळ आहे की हा चरित्र-ग्रंथ वाचताना आपण त्याच्याशी अगदी तद्रूप होऊन जातो आणि एका अपरिचित अफाट जगात विहार करीत असल्याचा प्रत्यय येऊन आपले मन त्यातच कितीतरी वेळ रेंगाळत राहाते व मानवी जीवनातील नाना प्रकारच्या समस्या आपल्या समोर निर्माण होऊन मन अंतर्मुख होते. असा अस्वस्थ करून सोडणारा अनुभव देणे हे या चरित्र-ग्रंथाचे व पर्यायाने सुमती देवस्थळे यांच्या लेखन कौशल्याचे यशच मानले पाहिजे.

टॉलस्टॉयचे चरित्र लिहिणे व त्याच्या मनाचा ठाव घेणे हे काम तसे सोपे नाही. कारण साक्षात विधात्यानेच दहा-पंधरा अगदी भिन्न प्रकृतीच्या व्यक्तींची मूस एकत्र करून टॉलस्टॉयचे व्यक्तिमत्त्व घडविले होते. खुद्द लेखिकेनेच म्हटले आहे की 'टॉलस्टॉय याच्या विकसनशील व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे ही कधी न संपणारी प्रक्रिया आहे. एक तर त्याचे व्यक्तिमत्त्व अतिशय गुंतागुंतीचे आहे आणि त्याविषयी अपरंपार ग्रंथरचना झाली आहे; होत आहे. हे सर्व वाङ्मय वाचणे ही गोष्ट मानवी सामर्थ्यापलीकडची आहे. माझ्या अत्यंत मर्यादित शक्तीनुसार टॉलस्टॉय याचे वाङ्मय, चरित्रे, दैनंदिन्या, पत्रे, स्मृतिग्रंथ व इतर संदर्भग्रंथ यांच्या अभ्यासातून त्यांचा व्यक्तिवेध घेण्याचा मी प्रयत्न केला आहे. माझी भूमिका विभूतिपूजनाची नाही. तशी भूमिका खुद्द टॉलस्टॉय यांना कधीही आवडली नसती. माझी भूमिका अभिनिवेशशून्य जिज्ञासूची आहे. ती कितपत साधली आहे, हे वाचकांनीच ठरवायचे आहे.'

लेखिकेच्या या भूमिकेचा विचार केला म्हणजे तिने या चरित्र-ग्रंथाला 'टॉलस्टॉय—एक माणूस' असा मथळा का दिला आहे याचे मर्म ध्यानात येते. लेखिकेला असे म्हणायचे आहे की मनुष्य हा केवळ स्वर्गाचाच नव्हे तर पृथ्वीचाही पुत्र असतो. वाल्याचा वाल्मीकी झाला तरी वाल्मीकीतील वाल्या काही पूर्ण नाहीसा होत नाही. तो जागाच असतो. आणि अवसर मिळेल तेव्हा डोके वर काढण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहात नाही. पार्थिव वाल्याला पूर्णपणे नाहीसा करणारा एखादा वाल्मीकी फक्त पुराणातच आढळतो. ऋषी म्हणून ते वंदनीय खरे, परंतु अखेर तीही माणसेच होती. सत्त्वरजतमाच्या विविध प्रकृतीचे मिश्रण त्यांच्याही स्वभावात असणे अपरिहार्य होते हे विसरल्यास संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे आकलन होऊ शकत नाही.

सुमती देवस्थळे यांचे हे भाष्य वाचले म्हणजे हा चरित्र-ग्रंथ लिहिताना त्यांची भूमिका टॉलस्टॉयच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणाऱ्या जिज्ञासूची व व्यक्तिगत समाधानाची आहे हे स्पष्ट होते. टॉलस्टॉयवर प्रबंध लिहून पी. एच्.डी.सारखी पदवी मिळविण्याचा त्यांचा हेतू दिसत नाही. कारण तसा त्यांचा हेतू असता तर हा ग्रंथ त्यांनी परीक्षकांच्या पसंती किंवा प्रशस्तीसाठी लिहिला असता. त्यांनी तसे केले असते तर या चरित्र-ग्रंथाची मांडणी प्रबंधाच्या पारंपरिक पद्धतीने झाली असती. म्हणजे टॉलस्टॉयच्या चरित्राचे व त्याच्या वाङ्मयाचे निरनिराळे सलग भाग कल्पून त्यावर एकेक स्वतंत्र प्रकरण त्यांनी लिहिले असते. म्हणजे

टॉलस्टॉय, त्याचे बालपण व शिक्षण, तारुण्यातील स्वैराचार, त्याची युद्धक्षेत्रातील कामगिरी, त्याचे प्रियाराधन व विवाह सोहळा, त्याचे कौटुंबिक जीवन व त्यातून निर्माण झालेला संघर्ष, या संघर्षाचे अंतर्गत व बाह्य स्वरूप, त्यातून निर्माण झालेले त्याचे धार्मिक, सामाजिक व राजकीय परिवर्तन, गृहत्याग व देहावसान. अशा पद्धतीने टॉलस्टॉय याचे चरित्र लिहून मग त्याचे कथा-कादंबरी इत्यादी ललित लेखन आणि नंतर ललितेतर प्रचारात्मक लेखनाचा परामर्ष, असा एक वाङ्मय विवेचनाचा स्वतंत्र भाग. अशा पद्धतीने हा ग्रंथ लिहिला गेला असता तर तो परीक्षकाच्या व वाचकाच्या दृष्टीनेही सोयीचा झाला असता आणि त्याला कलात्मक आकारही आला असता. अर्थात कलेबरोबर कारागिरी त्यातून आली असती उदाहरणार्थ, टॉलस्टॉय व त्याचे साहित्यिकांशी आलेले संबंध या ग्रंथात ठिकठिकाणी चरित्रानुरोधाने विखुरले गेले आहेत ते संकलितपणे पहावयास मिळाले असते. विशेषतः हे चरित्र वाचताना टर्जिनीव्हच्या बाबतीत वाचक अगदी गोंधळून जातो, कारण टर्जिनीव्ह व टॉलस्टॉय याचे परस्पराशी आलेले संबंध अगदी विचित्र स्वरूपाचे होते व त्याचा उल्लेख या चरित्र-ग्रंथात अगदी सुरुवातीपासूनच तो दोघाच्या जीवनाच्या अखेरपर्यंत कितीतरी वेळा आलेला आहे. पण त्याचे संकलित दर्शन होऊ शकत नाही. टॉलस्टॉय व त्याचे समकालीन साहित्यिक असे स्वतंत्र वेगळे प्रकरण लेखिकेने लिहिले असते तर ते विशेष उद्बोधक झाले असते टॉलस्टॉयचे शेक्सपिअरवरील भाष्य हे वाचकांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे झाले असते, परंतु सुमती देवस्थळे यानी शेक्सपिअरचा उल्लेख फक्त एका वाक्यात करून टाकला आहे व तोही पर्यायाने टॉलस्टॉयला चेकॉव्हच्या कथा जरी फार आवडत असल्या तरी त्याची नाटके मात्र आवडत नसत. त्या बाबतीत तो चेकॉव्हला म्हणे, 'तुम्ही नाटके लिहीत जाऊ नका हो! त्या शेक्सपिअरची नाटके एकदर वाईटच असतात, पण तुमची त्याहीपेक्षा वाईट असतात हो!' एवढे एक वाक्य लिहून सुमती देवस्थळे मोकळया होतात! निदान 'कला व नीती' या प्रकरणात तरी याविषयी चर्चा करावयास पाहिजे होती.

या आक्षेपावर सुमती देवस्थळे याचे काय उत्तर असेल याची मला कल्पना आहे. त्या म्हणणार की, हे चरित्र लिहावयास घेताना माझ्या मनात जे हेतू अजिबात नव्हते ते माझ्यावर लादून आक्षेप घेण्यात काय अर्थ आहे? माझा हेतू टॉलस्टॉय हा विलक्षण प्रतिभेचा एक लेखक व तत्त्वज्ञ असला तरी शेवटी तो एक माणूस होता, हे मनात ठेवून मी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हा शोध घेण्यात मला एखादा पारंपारिक पद्धतीचा चरित्र-ग्रंथ लिहावयाचा नव्हता तर तो केवळ माझ्या हौसेचा प्रकार होता व मी माझा हा हेतू प्रस्तावनेतच विशद केला आहे. तेव्हा टॉलस्टॉय याच्या चरित्राचे व त्याच्या वाङ्मयाचे वेगवेगळे विभाग पाडून त्याचे दर्शन व विवेचन या ग्रंथात नाही याबद्दल तक्रार करण्यात अर्थ नाही. साराश हा चरित्र-ग्रंथ म्हणजे स्वर्गातून भूतलावर उडी घेऊन अनेक वळणे वळणे घेत सागराला सहस्रमुखानी मिळणाऱ्या भागीरथीच्या दोन्ही तीरावरील असंख्य तीर्थक्षेत्रे व निसर्गदृश्ये एखाद्या भाविक यात्रेकरूप्रमाणे नव्हे तर सौंदर्यदृष्टी असलेल्या चोखंदळ व रसिक प्रवाशाने काढलेला एक आलेख आहे. आता इतका लाबचा प्रवास करावयाचा म्हणजे बरोबर शिधासामग्रीही भरपूर घेतली पाहिजे. ती सुमती देवस्थळे यानी किती घेतली आहे याचे दिग्दर्शन त्यानी प्रस्तावनेत केलेच आहे. टॉलस्टॉय याचे वाङ्मयाचे संपूर्ण वाचन व चरित्र-नायकावरील ४७ ग्रंथाचे परिशीलन त्यानी केले आहे आणि त्याच्या सहाय्याने टॉलस्टॉय याचे चरित्र जसे घडत गेले तसे त्याचे दर्शन घडविले आहे. परंतु हे नुसते चरित्र दर्शनच नाही तर टॉलस्टॉय याच्या जीवनप्रवाहाच्या अनुषगाने त्याच्या आयुष्यात ज्या विविध घटना घडल्या, ज्या व्यक्तींशी त्याचा संबंध आला, ज्या अनुभवातून त्याचे बहुविध स्वरूपाचे वाङ्मय निर्माण झाले त्याचेही मार्मिक दर्शन या ग्रंथात घडविण्यात आले आहे. कित्येक वेळा टॉलस्टॉय ही व्यक्ती क्षणभर दूर सारून तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचे विश्लेषणही केले आहे, युद्धप्रसगाची व रशियातील राज्यक्रांतीची पार्श्वभूमी विशद केली आहे. थोडक्यात म्हणजे हा ग्रंथ केवळ चरित्र-ग्रंथ न होता त्याला चरित्र-गाथेचे स्वरूप आले आहे व गाथेत अपेक्षित असलेला. विस्कळितपणाही त्यात आलेला आहे.

परंतु यामुळे या चरित्र-गाथेचा चटकदारपणा मात्र यत्किंचितही कमी झालेला नाही. तसे पाहिले तर टॉलस्टॉयसबधी जे वाङ्मय लिहिले गेले आहे ते हा ग्रंथ लिहीत असताना उपकारक ठरण्याऐवजी उपद्रवकारकच वाटावे इतके अफाट आहे. परंतु सुमती देवस्थळे यानी आपली स्मरणशक्ती सतत जागृत ठेवून पुस्तकात मागचे–पुढचे संदर्भ अगदी योग्य त्या ठिकाणी देण्यात जे अवधान व औचित्य दाखविले आहे ते खरोखरच कौतुकास्पद आहे. उदाहरणार्थ, विद्यार्थीदशेत टॉलस्टॉयला इतिहास हा विषय अगदी निरर्थक वाटत असे, असे जेव्हा लेखिका सांगते तेव्हा त्याच ठिकाणी ती असेही सांगायलाही विसरत नाही की, याच टॉलस्टॉयला पुढे 'वॉर अँन्ड पीस' ही कादंबरी लिहिण्यासाठी सारा युरोपचा इतिहास घुसळून काढावा लागणार होता. असे सूचक संदर्भ प्रस्तुत ग्रंथात ठिकठिकाणी दिलेले आढळतात.

टॉलस्टॉयचा विवाह हे या ग्रंथातील बारावे प्रकरण विशेष उल्लेखनीय आहे हे प्रकरण म्हणजे एक स्वयपूर्ण अशी प्रणयप्रधान अद्भुत कादबरीच आहे अद्भुत असूनही ती सत्यकथा आहे, व लेखिकेने ती आपले सारे लेखनकौशल्य पणास लावून अगदी तन्मयतेने लिहिली आहे. प्रणयप्रधान कादंबरीत ज्या घटना अपेक्षित असतात त्या सर्व या ठिकाणी आढळतात. ज्या बर्स कुटुंबातील मुलीशी टॉलस्टॉय लग्न करतो ते बर्स कुटुबही कादबरीत शोभेल अशा प्रकारचे आहे. टॉलस्टॉय हा या कुटुंबातल्या सर्व मंडळींशी परिचित व सर्वांना आवडणारा उमदा लष्करी तरुण. कुटुबातील तीन मुली, सर्वांत्या वहिणी थोरली लिझा सुंदर व सुसंस्कृत. हिचे टॉलस्टॉयवर प्रथमपासून प्रेम असते व टॉलस्टॉयही तिच्याशी प्रेमाने वागत असल्यामुळे पुढं मागे या दोघाचे लग्न होणार असे सर्वांनी गृहीत धरलेले असते. परंतु शेवटी मधली मुलगी तान्या हिची निवड टॉलस्टॉय करतो. म्हणजे इथ कादबरीत अपेक्षित असा त्रिकोण निर्माण

झालेला असतो. मुलीच्या वडिलांना मोठया मुलीचे लग्न झाल्याशिवाय तिच्या धाकटीचे लग्न अगोदर होणे पसत नसते. म्हणजे विरोध आलाच. अशा परिस्थितीत दोन तरुण प्रणयी व्यक्तीत अपेक्षा, ओढ, हुरहूर, आशा निराशा, प्रेमपत्रे वगैरे जे प्रकार कादबरीत अपेक्षित असतात ते सर्व येथे आढळतात. मुलगी तान्या ही टॉलस्टॉय हा आपणाला रीतसर मागणी केव्हा घालतो याची वाट पहात असते तर टॉलस्टॉय यास आपण मागणी घातली तर तिचा स्वीकार तान्या करील की नाही अशी शका वाटत असते. तोंडी मागणी घालण्याचा धीर होत नाही म्हणून पत्र लिहितो. परतु ते देण्याचाही त्याला धीर होत नाही. शेवटी एकातात तिची भेट घेतो; पण बोलण्याची सुरुवात कशी करावी हेच त्याला कळेनासे होते. वास्तविक या आधी टॉलस्टॉयने इतक्या पोरीशी आणि तरुणीशी प्रणयाचे चाळे केले होते की त्याची मोजदाद करण्यासाठी सख्या-शास्त्रज्ञाची एखादी कमिटीच नेमणे आवश्यक होते. तरी आयत्या वेळी टॉलस्टॉयची गाळण उडते. तान्याच्या सदर्भात भाष्य करताना सुमती देवस्थळे म्हणतात–"दृष्टादृष्ट होताच काय बोलावे हे टॉलस्टॉयला कळेना. अनुभवी होता, तरीही गप्प." या वाक्यात अनुभवी हा शब्द किती सूचक व सयमितपणे वापरला आहे ? अशी सूचक सयमित व अर्थपूर्ण वाक्ये प्रस्तुत ग्रथात सर्वत्र आढळून येतात या विवाह प्रकरणी लेखिकेने सुरुवातीलाच वापरलेला एक शब्द विलक्षण सूचक किंवा अशुभ सूचक आहे. तो शब्द म्हणजे शेक्सपिअरच्या अथेल्लो या नाटकातील नायिका डस्डिमोना हा होय. लेखिका म्हणते–बर्स कुटुबात टॉलस्टॉय रणक्षेत्रावरील "आपले जीवावरचे प्रसग अथेल्लोच्या सुरात सांगत असताना तान्या डेस्डिमोना बनून जायची." अथेल्लो नाटकाचा या सदर्भात लेखिकेने केलेला उल्लेख ही टॉलस्टॉयच्या पुढील आयुष्याच्या शोकान्त नाटकाची भयसूचक घटाच वाटते. असे नानाप्रकारचे आशानिराशेचे प्रसग येऊन टॉलस्टॉयचा तान्याशी शेवटी एकदाचा विवाह होतो, विवाह विधीच्या ऐन प्रसगी टॉलस्टॉय याचे समारभाचे कपडे कुठतरी गळपटतात ! नवरा मुलगा अजून येत का नाही म्हणून चर्चमध्ये भटजी सारखी वाट पहात असतात. शेवटी टॉलस्टॉय कसाबसा घाईघाईनी कपडे घालून तेथे हजर होतो व शुभमगल कसेबसे म्हटले जाते विवाहाच्या आदल्या दिवसापासूनची हनीमूनला निघण्यापर्यंतची हकीगत वाचताना हसावे की रडावे हेच समजत नाही. या विवाहाचा शेवट पुढे दोघाच्याही मनःस्तापाला व विनाशाला कारणीभूत होतो हे लेखिकेने ग्रथाच्या प्रस्तावनेतच सांगून ठेवल्यामुळे हे विवाह प्रकरण वाचताना वाचकाला याचे पर्यवसन पुढे काय होणार हे आधीच माहीत असते. त्यामुळे या आगामी सकटाच्या सावल्या लेखिकेने दक्षतापूर्वक सूचकतेने व कौशल्याने आधीपासूनच कशा चित्रित केल्या आहेत एवढेच येथे पहावयास मिळते. म्हणून असे वाटू लागते की सुमती देवस्थळे यानी ग्रथाच्या प्रस्तावनेतच पुढील रहस्याचा जो परिस्फोट केला आहे तो केला नसता तर फार बरे झाले असते. प्रस्तावनेत फक्त आपण कोणत्या प्रकारच्या जिज्ञासेने हा ग्रथ लिहिण्यास प्रवृत्त झालो आहोत तेवढेच सांगायचे. म्हणजे वाचकाची जिज्ञासा शेवटपर्यंत कायम राहिली असती. चरित्राच्या बाराव्या प्रकरणात प्रत्यक्ष लग्न होण्यापूर्वी टॉलस्टॉय तान्या हीस आपल्या दैनंदिन्या वाचायला देतो असे लेखिका सागते तेव्हा वाचकाच्या मनाला धक्काच बसतो. परतु आनदाच्या उद्रेकात तान्या या दैनदिन्या वाचून सुद्धा टॉलस्टॉयशी लग्न करण्यास तयार होते. या नतर पुढे लेखिका असे सागते की या दैनदिन्यावाचून सान्याने मनातल्यामनात टॉलस्टॉयला क्षमा केली असली तरी दैनदिन्यातले 'तपशील काही विसरली नाही. तो जन्मभर लक्षात होता.' या सूचक वाक्यातील मर्म ग्रथातल्या उत्तरार्धात लक्षात येते. या दैनदिन्यावर पुढील अशुभ अशा तेराव्या आकड्याच्या प्रकरणात सुमती देवस्थळे भाष्य करतात ते असे–

'दोघेजण एकमेकावर फार प्रेम करीत होते. त्यामुळे 'अतिस्नेह पापशका म्हणतात ना, तसा प्रकार होता. (या ठिकाणी कालिदासाच्या करुणरसात्मक शाकुतल नाटकाची आठवण त्या खुबीने करून देतात.) तान्याचा अनुराग इतका उत्कट की टॉलस्टॉय आपल्या पासून दुरावेल किंवा काय या शकेने ती सतत पछाडलेली असे. स्वभावतःच ती फार सशयी होती. असूया, द्वेष, मत्सर, संशयीपणा, स्वामित्व गाजविण्याची ईर्षा या सर्वांचा इतका चमत्कारिक परिपाक तिच्या स्वभावात होता की त्या पायी टॉलस्टॉयकडे स्वच्छ नजरेने पाहणे तिला जवळ जवळ अशक्य होते. त्यातून टॉलस्टॉयने एक अनावश्यक चूक करून ठेविली होती. लग्नापूर्वीच स्वतःच्या पूर्वायुष्याचा सबध चित्रपट रोजनिशयाच्या स्वरूपात तिच्यासमोर उलगडून ठेवला होता. पण सुरुवातीलाच एवढया प्रामाणिकपणाची काहीही गरज नव्हती असल्या अनाठायी केलेल्या प्रामाणिकपणाचा परिणाम काय झाला ? तर त्यामुळे 'टॉलस्टॉयच्या सर्व व्यवहारावर ती गुप्त हेराच्या सशयी नजरेने पाळत ठेवू लागली.' लेखिकेने हे भाष्य करून पुढे निर्माण झालेल्या वादळाची आगाऊच कल्पना देऊन ठेवली आहे. अशा प्रकारच्या पूर्वसूचना ग्रथात अनेक ठिकाणी दिलेल्या आढळतात; यामुळे वाचकाचे मन पुढील धक्के सहन करण्यासाठी आधीपासूनच तयार झालेले असते. हा लेखनातील गुण समजावा की दोष मानावा हे ज्याचे त्याने ठरवावे.

टॉलस्टॉयच्या एकदर वाङ्मयात 'वॉर अॅन्ड पीस' आणि 'अॅना कॅरनिना' या दोन काथबऱ्या त्याला जागतिक कीर्ती मिळवून देण्याइतक्या सरस झाल्या आहेत. या दोन कादंबऱ्यांची पार्श्वभूमी व त्यासबधीचा साद्यत इतिहास हा प्रस्तुत ग्रथातील एक अत्यत महत्त्वाचा भाग होय. कारण या दोन कादंबऱ्या वाचून मनाला जो आनद वाटतो त्यात या आनुषगिक माहितीमुळे भर पडते 'वॉर अॅन्ड पीस' या कादबरीला लेखिकेने 'साहित्यातील कैलास लेणे' म्हटले आहे ते अगदी यथार्थ वाटते ज्या असख्य तपशिलाने हे भव्य शिल्प आकार घेऊ लागले त्याचा साद्यत इतिहास लेखिकेने मोठया साक्षेपाने सादर केला आहे. लेखिका म्हणते–'मोहरीएवढया बीजापासून प्रचड अश्वत्थवृक्ष उभा राहावा तशी ही कादबरी वाढत गेली. मूळचा आराखडा तीन वेळा बदलला. नाव सुद्धा अर्थातच तीन वेळा बदलले. कित्येक व्यक्तिरेखाना मूळच्या आराखडयात स्थान नव्हते. इत्यादी कादबरीविषयक इतर तपशीलही अत्यत उद्बोधक आहे. परतु या कादबरीच्या

# ‘ऑपरेशन लक्ष्मीरोड’च्या निमित्ताने

चंद्रशेखर मराठे

नोव्हेंबर महिन्याच्या प्रारंभी पुण्याच्या लक्ष्मी रोडवर एक वेगळीच धमाल उडाली. नेहमी सणावाराच्या दिवसात या रस्त्यावर कापड-साड्या खरेदीची धमाल उडते. पण ही धमाल खरेदी न करण्याची होती खरेदी करण्यासाठी धावपळ करणारे स्त्री-पुरुष पाहाण्याची सवय असलेल्या पुणेकराना त्या तीन चार दिवसात खरेदी न करण्यासाठी व न करू देण्यासाठी धावपळ करणारे स्त्री-पुरुष पाहून विस्मयाचा धक्का पोहोचला. ऑपरेशन लक्ष्मी रोड या नावाने प्रसिद्धी पावलेला हा प्रकार ग्राहक चळवळीचा एक नवा आणि वेगळा असा आविर्भाव होता. या सर्व मोहिमेचा अधिकृत व साद्यंत वृत्तान्त ३० नोव्हेंबरच्या माणूसमध्ये येऊन गेला आहे.

वेगवेगळ्या चळवळीचा व चालू घडामोडीचा एक अभ्यासक या नात्याने ‘ऑपरेशन लक्ष्मी रोड’च्या संदर्भात ग्राहक चळवळीबाबत काही विचार मांडीत आहे प्रथम ऑपरेशन लक्ष्मीरोडच्या डावपेचाबाबत काही विचार करणे आवश्यक ठरते.

या मोहिमेची वेळ अचूक निवडली होती. दिवाळी ऐन तोंडावर आलेली असताना कापड खरेदीवर बहिष्कार टाकणे म्हणजे व्यापाऱ्याना चांगलेच कोंडीत पकडण्यासारखे झाले. काही व्यापाऱ्याच्याच म्हणण्याप्रमाणे दसरा-दिवाळीच्या सुमारास कापडबाजाराचा जवळजवळ निम्मा व्यवहार घडतो. तेव्हा वेळ अचूक होती.

दुसरी गोष्ट म्हणजे चळवळ निदर्शने वगैरे प्रकारात अनुयायी म्हणून मध्यम वर्गीयाना गोळा करण्यात, या मोहिमेस त्यावेळी तरी यश आले. अनुयायी म्हणून हे शब्द मुद्दाम वापरीत आहे. कारण तसे सर्व चळवळीचे नेतृत्त्व मध्यम वर्गीयाकडेच असते. पण अनुयायात मध्यम वर्गाचा फारसा भरणा असत नाही.

ही मोहीम केवळ निषेधात्मक असू नये म्हणून तिला जोडून स्वस्त कापडाची विक्रीही काही दिवस या मोहिमेच्या सूत्रधारानी चालवली. ‘ऑपरेशन लक्ष्मी रोड’च्या प्रचारपत्रकात चळवळीची तात्त्विक भूमिका सविस्तर मांडली आहे ती वाचून व प्रत्यक्ष चळवळ पाहून एक गोष्ट जाणवते ती ही की चळवळीच्या संयोजकानी अनेक चळवळींचा अभ्यास करून, नेहमीच्या आक्षेपाचा अगोदरच विचार करून, काही तात्त्विक भूमिका घडवून ही मोहीम “सर्वांग सुंदर” कशी होईल याकडे बरेच लक्ष दिलेले आहे ‘एका विचारी, शिस्तबद्ध, समतोल गटाची सात्त्विक संतापापोटी–शिस्तीत व्यक्त झालेली निषेधात्मक प्रतिक्रिया’ असे या चळवळीचे वर्णन बहुतेकाना मान्य होईल.

सो फार–सो गुड या प्रयोगाचे पुढे काय स्थित्यंतर होते ते दिसेलच. ही ग्राहक चळवळ होती का? ग्राहक चळवळीस जो रूढ अर्थ प्राप्त झाला आहे त्यानुसार ही ग्राहक चळवळ नव्हती; असे मला वाटते.

कन्झुमरिझम किंवा नॅडॅरिझम या नावाने जी चळवळ ओळखली जाते ती ‘ऑपेरेशन लक्ष्मीरोड’ सारखी नसते. कन्झुमरिझमचे प्रणेते राल्फ नॅडर यानी अमेरिकेत ज्या पद्धतीने ही चळवळ चालवली आहे ती पद्धत तशी निषेधावर आधारित नाही निषेध हा प्रतीकात्मक असतो. नॅडर ग्राहक–चळवळ ही प्रतीकात्मक मानीत नाहीत. ग्राहकाच्या हिताची जपणूक करण्यासाठी करीत रहावयाचे नित्याचे काम अशी त्याची भूमिका आहे. त्याच्या चळवळीस राजकीय परीमाण नाही, नॅडर मुख्यत: कायदेशीर उपयानी उत्पादक विक्रेत्यावर सततचा दबाव ठेवतात. मोटारीच्या गुणवत्तेतील घसरगुंडी विरुद्ध पाठ पुरावा करण्याने नॅडर हे प्रथम प्रसिद्धीच्या झोतांत आले. त्यानंतर त्यानी अनेक प्रश्न हाताळले. वजन मापातील फसवाफसवी, दर्जामधील कमअस्सलपणा याविषयी त्यानी पराकाष्ठेच्या जागरूकतेने वारंवार कोर्टात धाव घेऊन ग्राहकाच्या हितसंबधाचे रक्षण केले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष, सरसेनापती याच्या तोडीस तोड मान अमेरिकन जनता राल्फ नॅडर याना देते. ते सभेत आल्यावर सारी सभा त्याना उभी राहून सलामी देते.

आता नॅडर कोर्टावर भर देतात म्हणून आपल्याकडेही तसेच व्हावे असे नाही. पण त्याना हाच मार्ग का सोयीस्कर वाटतो याचा विचार केल्यास ग्राहक चळवळीचे स्वरूप स्पष्ट होईल.

‘ग्राहक’ असा समान हितसंबध असलेला एकजिनसी वर्ग कोठेही अस्तित्वात नाही वस्तु असंख्य असतात प्रत्येक ग्राहकाचे स्थान एकसारखे नसते शिवाय प्रत्येक ग्राहक हा विक्रेताही असतो. नोकरी करणारेही आपले श्रम विकीत असतात. तेव्हा ग्राहक व विक्रेता अशा दोन्ही स्वरुपात प्रत्येकजण वावरत असल्याने या दोन वेगवेगळया कॅपॅसिटीमधील अपेक्षा परस्पर विरोधी असतात

एखाद्या वर्गाची मजबूत संघटना निर्माण होण्यासाठी केवळ समान हितसंबध असून भागत नाही. तर तो हितसंबध कमालीचा महत्त्वाचा (ऑफ ओव्हर रायडिंग इंपॉर्टन्स) असावा लागतो तो जपण्यासाठी इतर सर्व गोष्टींच्या विरुद्ध उभे रहावेसे वाटावे असा तो असावा लागतो. ‘ग्राहक’ हा वर्ग असा हितसंबधी वर्ग नाही. त्यामुळे त्याची संघटना काही मर्यादित प्रमाणावर (उदा. ग्राहक सहकारी संस्था) वा काही मर्यादित हेतूवर (उदा. ऑपरेशन लक्ष्मीरोड) होऊ शकते.

आपल्याकडं ही चळवळ अजून होऊ शकेल अशा प्रमाणात व स्वरुपात झालेली नाही. त्यामुळे तसा येथे पुष्कळ वाव आहे.

अशी चळवळ यशस्वी होण्यासाठी काय परिस्थिती आवश्यक आहे? संबधित बाजार पेठ ही ग्राहकाची असावयास पाहिजे. (बॉयर्स मार्केट) ही गरज कोणास हास्यास्पद वाटेल. कारण बॉयर्स मार्केट असल्यावर चळवळीची आवश्यकता काय? तशी आवश्यकता ही हेतूवर अवलंबून असते. हे हेतू अनेक असू शकतात. उदा.

मालाचा योग्य दर्जा

मालाची योग्य किंमत

मालाचा अखंडित पुरवठा.

मालाचे योग्य प्रमाण.

बायर्स मार्केटमध्ये ग्राहकांना दर्जा व

पृष्ठ २१ वर

# ही सुरुवात ठरो....

महादेव मोरे

निपाणीत काही बिडी कारखाने आहेत. मगलूरच्या नं. ३० बिडी-चीही एक शाखा येथे होती पण कामगाराना काहीही सूचना न देता ती शाखा दिवाळीपासून अचानक बद करण्यात आली आणि १८० कामगार व त्यावर अवलबून असलेले कुटुबीय बेकारी व उपासमारीच्या खाईत लोटले गेले बिडी फॅक्टरी बद करण्यापूर्वी सर्वसामान्य नियमानुसार तीन महिन्याचा आगाऊ पगार द्यायला हवा होता, तोही दिला गेला नाही. म्हणून कामगारानी मोर्चे-मिरवणुका काढल्या, 'काम दो या जेल दो' अशा घोषणा देत... न. ३० बिडी फॅक्टरीच्या येथील शाखेचे व्यवस्थापक श्री. आन्नाप्पा बापू शेट्टी याच्या तंबाखू पेढीपुढे सर्व कामगार धरणे धरून बसले. चार-पाच कामगार गावभर फिरून भिक्षा मागत व मिळालेले ते अन्न, धरणे धरलेले ते कामगार पेढीपुढील रस्त्यावरच बसून खात असे विलक्षण दृष्य निपाणीच्या इतिहासात आजवर कधीही न घडलेले; त्यामुळे सारे नागरीक विस्मीत होऊन पहात रहात मग चक्री उपोषणाचे सत्रही कामगारानी सुरू केले... महाराष्ट्रातील विरोधी पक्षाचे काही नेते येऊन गेले. सभाही झाल्या... असा दोन आठवडे चिवटपणे लढा दिल्यावर फॅक्टरी मालक नमले...' कामगार कोर्टाकडूनच येऊ देत, आम्ही त्याना एक पैसाही देणार नाही,' ही ही त्याची भाषा बद झाली; अन् त्यानी महिनाभरचा पगार आगाऊ देऊन तडजोड केली.

कामावरून कुणीही, कुणालाही कमी करावे, असे आजवर येथे घडलेले. तर कामगारानी लढा देऊन मिळविलेला हा पहिलाच विजय. हा शेवट न ठरता, ही सुरुवात ठरो...

ह्या लढ्याकरिता श्री. विष्णु निंबाळकर, प्रा सुरेश जोशी, सुरेश शिप्पूरकर आदीनी कामगाराना मार्गदर्शन केले. परिणामत· श्री विष्णू निंबाळकराची नोकरी गेली. ते येथील श्री. वेणीचद दोशी याच्या पेढीवर कारकून होते पण निंबाळकर डरले नाहीत. तसेच प्रा. जोशीही निर्भीड आहेत. आंबेडकर जयती दिवशी त्यानी दलित पॅंथरच्या सभेत भाषण केले म्हणून कॉलेजने त्याना काढून टाकल होत; पण लढा देऊन त्यानीही कॉलेजला नमविल होत. कामगार मरोत, स्वत ला का ताप म्हणून दोन वेळच घरच खाऊन वरील लोकाना आरामशीर बसता आल असत. पण निधड्या छातीने व निरपेक्ष वृत्तीने ते धडपडले. स्वत च्या नोकरीचीही त्यानी पर्वा केली नाही. त्याचे अभिनदन करावे तेवढे थोडेच आहे.

सुदैवाने असे धडाडीचे नेते कामगाराना लाभले. त्यानी आता कामगाराची सघटना बाधावी; म्हणजे कामगार वर्ग पिढ्यान् पिढ्याच्या दारिद्र्यातून थोडे तरी डोके वर काढील कारण न. ३० बिडीचे कामगार हा लढा देत असताना गावातील इतर बिडी फॅक्टरीमधील अक्षरश: हजारो कामगार केवळ त्रयस्थ बध्याचे काम करीत होते. नं ३० बिडीच्या कामगारांना सहानुभूती दाखविण्यासाठी निदान मूक मिरवणूक काढण्याचे सौजन्यही कुणी दाखविले नाही... निपाणीतील कामगार वर्ग सघटित नाही, म्हणून हे असे घडते आहे, घडणार आहे, तेव्हा ह्या निमित्ताने सारा कामगार वर्ग सघटीत झाला तर त्याच्याच हिताचे आहे.

बिडी कामगाराप्रमाणेच तबाखूच्या वखारीत काम करणार मजूर वर्गही सघटीत व्हायला हवा आहे. निपाणीच्या चौफेर तीन-चार मैलाच्या परिघामध्ये दोन डझनाहून अधिक खेडी आहेत त्या खेड्यातूनही असख्य स्त्री-पुरुष मजूर निपाणीच्या वखारीत रोज कामगार येत असतो. सरकारचे सारे गुमास्ता कायदे व फॅक्टरी ॲक्ट्स् धाब्यावर बसवून केवळ अडीच रुपड्याच्या पगारावर ह्या मजुराना १२-१२, १४-१४, तास ढोरागत राबवून घेण्यात येत. तपासणीसाठी कुणी वरचा अधिकारी आलाच तर केवळ स्वत:चे खिसे भरून आलबेल, आहे, असे भासवून निघून जातो. मग परत पूर्वीगत व्यापारी व मालक लोकाचे मजुराना पिळण्याचे धोरण सुरू रहाते. ह्या हजारो मजुराच्या जिवावर कित्येक व्यापारी व मालक अक्षरश. लखोपती-करोडोपती झाले आहेत. आणि बिचाऱ्या मजुराच्या घरी मात्र शभर रुपयेही कधी शोधून सापडायचे नाहीत, अशी परिस्थिती! तबाखूच्या एका-एका वखारीत राबून एका-बाईचा अख्खा जन्म गेलेला असतो. पण कायमचे कामगार म्हणून मालकाकडे त्याची कधीच नोद होत नसते. त्यामुळे कायमच्या कामगाराना मिळणाऱ्या कायदेशीर सवलती व फायदे ह्यापासून ह्या असख्य मजूर बायका कायमच्या वचीत आहेत. एखाद्या वखारीत कायमचे काम जर टिकवायचे असेल तर केवळ ढोरमेहनत करावी लागूनही मालक जर जनावराच्या औलादीचा असेल तर त्याच्या पापी वासनेला बळीही पडावे लागते! मजूरबाई देखणी असेल तर हा धोका जास्तच असतो! प्रत्येक वखारीत ४०-५० पासून ५००-६०० पर्यंत बाईमाणूस कामाला असत ह्या साऱ्यावर देखरेख करायला एक मुकादमीणही असते इदिरा गाधी भारतावर काय सत्ता गाजवील, अशी ही मुकादमीण वखारीत सत्ता गाजवीत असते काही मुकादमीणीनी तर वखारीच कुटणखाणे केलेले असतात. मालकांना बायका पुरविण्याचे काम त्या मुख्यत· करतात! त्यामुळे एखादी चागली गरतीबाई वखारीत कामाला जाऊ लागली, (अन् अलीकडील तीव्रतर महागाईने तर असे अनेक वेळा होत असते) तर ती बिघडण्याची वा तिला बिघडविण्याची फार शक्यता असते साराश, ह्या तबाखूच्या धद्यात मजूर बायकाचे श्रम व शील असे शोषले जाते कित्येकीना आयुष्यातून उठविले जाते, तर कित्येक जणीच्या आयुष्याला वारयोषितेची कळा आणली जाते. वर्षो न् वर्षे, पिढ्यान् पिढ्या हे असच चालत आल आहे... तबाखूच्या धद्यातील कारकून, हमाल, दिवाणजी ह्या लोकांनाही अत्यत अल्प पगारात राबवून घेतल जात. हाजी हाजी करीत त्यानी मालकाची मर्जी साभाळून रहायला हव, नपेक्षा उद्यापासून येऊ नका!' म्हणून झट्कन् त्याना नोकरीवरून काढण्यात येत. (श्री विष्णु निंबाळकराचे उदाहरण तर ताजेच आहे!) एखादा दिवाणजी वा कारकून आयुष्यभर एखाद्या मालकाच्या पेढीवर खपत असतो, अन् एखाद्या दिवशी चटकन् त्याला काढून टाकण्यात येत, ह्याचा अर्थ काय?

तर निपाणी भागातील श्रमिक वर्गाच्या जगात असा आजवर अधारच पसरलेला होता न ३० बिडीच्या कामगाराचा विजय हा ह्या अधारातील आशेचा एक किरण आहे... त्या किरणाच्या लुकलुकत्या प्रकाशात हा हजारोच्या सख्येने असणारा श्रमीक-कामकरी मजूरवर्ग उज्वल भविष्याच्या, उत्कर्षाच्या प्रकाशात येवो!

म्हणून म्हणतो की, हा विजय शेवटचा न ठरता, ही सुरुवात ठरो.

आगामी सघर्षात, सर्वंकष लढ्याची...

प्रगतीच्या मार्गाची, सुखाच्या थडगार झुळकाची...

☐

# सोलकढी

## □ भांडकुदळ विचारवंत

महाराष्ट्रातल्या विचारवंताची शिरगणती करू गेल्यास ती इथल्या प्रौढलोकसंख्येपेक्षा जास्त भरेल, असा माझा कयास आहे यात मुळीच नसलेली अतिशयोक्ती बाजूला ठेवली तरी महाराष्ट्रात विचारवंताची रेलचेल आहे ही गोष्ट मान्य व्हायला हरकत नसावी विचारवंताचे किती वर्ण आणि जातीउपजाती येथे आहेत ते पाहिले म्हणजे आश्चर्याने बोट तोंडात जाते (आणि तियेच राहते) महाराष्ट्रात काही कर्ते विचारवंत आहेत, काही नाकर्ते विचारवंत आहेत. काहींना अनुयायी आहेत; काही नेते, अनुयायी सर्वकाही स्वतःच आहेत. काहीजण विचारवंत आहेत हे लोकांना माहीत नाही; काहीजण विचारवंत नाहीत हे लोकांना माहीत नाही. काही पुणे, मुंबई, नांदेड, फलटण, नागपूर, वाई, पवनार, उरळीकांचन येथे वास्तव्य करून करून विचारवंत झाले आहेत; काही या स्थळीचे वास्तव्य टाळल्यामुळे विचारवंत झाले आहेत; काहींना फक्त दहापाच विषयातले कळते, तर काहींना कळत नाही असा विषय भूतळावर आणि अंतरिक्षात नाही. काही विचारवंत धंदेवाईक आहेत, काही हौशी आहेत काही विचारवंत सरकारी आहेत, काही बिनसरकारी आहेत. काही विश्वाळलेले विचारवंत आहेत, काही महाराष्ट्राळलेले आहेत. काही मागे पाहणारे विचारवंत आहेत; काही पुढे पाहणारे विचारवंत आहेत; काही तर कोठेच न पाहणारे विचारवंत आहेत. तात्पर्य असे की महाराष्ट्र हा जसा आणि जितका साधुसंताचा, भाडखोर माणसाचा, दगडाधोंड्याचा तसा आणि तितका विचारवंताचाही देश आहे

डॉ. वि. म. दांडेकर हे महाराष्ट्रातले भांडकुदळ ('भांडकुदळ' म्हणजे 'भांडखोर' नव्हे हे 'सोलकढी'च्या वाचकांना सांगायला नकोच) विचारवंत आहेत. ते नुसते भांडकुदळच असते, किंवा नुसते विचारवंतच असते तर त्यांच्याकडे आपल्याला दुर्लक्ष करता आले असते. पण हा माणूस पडला विचारवंत आणि भांडकुदळ. त्यांच्याकडे दुर्लक्ष करायची सोय नाही. गेल्या वर्षीच, जुलैमध्ये, साक्षात यशवंतराव चव्हाणांच्या उपस्थितीत, दांडेकरांनी महाराष्ट्र शासनाचे समारंभपूर्वक रायते केले त्यावरून केवढे वादळ उठले होते. त्या वादळाने चक्रावलेल्या महाराष्ट्र शासनाला सावरायला खुद्द गोवर्धन पारिखांना धावावे लागले. त्यांनी तत्परतेने 'महाराष्ट्र-टाईम्स' मध्ये लेखमाला लिहून वि म. दांडेकरांचे थवथवीत केले म्हणून ठीक; नाहीतर महाराष्ट्र-शासनाची धडगत नव्हती. ही गोष्ट आम्ही पुरती विसरलो नाही तोच दांडेकरांनी आणखी एक भांडण 'उकरून' काढले आणि आपला भांड'कुदळ' असल्याचा लौकिक सार्थ आहे हे सिद्ध केले. कॅनरा बँकेच्या चतुर्थ वार्षिक परिषदेचे उद्घाटन ते करत होते उद्घाटनाच्या भाषणात, बँका, औद्योगिक व व्यापारी कंपन्या यांच्या बड्या अधिकाऱ्यांना वेतनाच्या पलीकडे सोयीसवलती म्हणून जो भरमसाठ रमणा दिला जातो त्याच्यावर दांडेकरांनी तोंड टाकले. या अधिकाऱ्यांना पगार तर भक्कम असतोच, पण त्यांना मिळणाऱ्या वरपगारापुढे पगारसुद्धा फिका पडतो. दांडेकरांना उदाहरणाने मुद्दा पटवून द्यायची वाईट्ट आदत आहे. ते सांगतात की त्यांच्या माहितीच्या एका अधिकाऱ्याने आपले घर सजवण्यासाठी पन्नास हजार रुपये खर्च केले.

दांडेकरांचा दृष्टिकोन एकांगी असल्यामुळे फक्त पैसेवाल्यांना मिळणाऱ्या सोयीसवलती तेवढ्या त्यांना दिसतात; त्यांच्या डोळ्यावर येतात. वास्तविक बिनपैसेवाल्या मध्यमवर्गाला आणि खालच्या वर्गांना केवढ्या तरी सोयीसवलती खाशा उपलब्ध असतात पैशाच्या अभावी, नीतिमान आणि सभ्य राहायची एवढी मोठी सोय मध्यमवर्गाला मिळालेली आहे की तिच्यामुळे मध्यमवर्गात नीती आणि सभ्यता नुसत्या बोकाळल्या आहेत. शिवाय आपल्या नित्य होणाऱ्या कुचंबणेमुळे मध्यमवर्ग जसा कण्हू शकतो तसे कण्हण्याची सवलत इतरवर्गांना असत नाही. कण्हणे हा एक चैनविलास आहे, असे एका चिनी तत्त्वज्ञाने म्हटले आहे त्याचे मला स्मरण होते. (वास्तविक हे मीच म्हटले आहे. पण जीवनाबद्दल सखोल आणि चिंतनपर असे काही माझ्या सारख्याला सुचू शकेल ही गोष्ट आपण वाचकांनी मानली नसती म्हणून 'एका चिनी तत्त्वज्ञा'चा हवाला देऊन ठेवला या चिनी तत्त्वज्ञाने मराठी लघुनिबंधाच्या जडणघडणीत बजावलेली कामगिरी संस्मरणीय अशीच आहे.) खालचे वर्ग तर सोयीसवलतीसाठीच खास तयार झालेले असावेत. विमान प्रवासाच्या भडकत्या दराची झळ त्यांना कधीच लागत नाही. त्यांना आयकर भरावा लागत नाही, इतकेच नव्हे तर त्याचे ते जीव घाबरा करणारे फॉर्म्ससुद्धा भरावे लागत नाहीत. चोथट शिक्षण आणि मचूळ साहित्य यांच्यापासून त्यांना सहजच यथास्थित चार हात दूर राहता येते. असे आणखी कितीतरी. पुन्हा या सोयीसवलती आपल्यापासून कधीकाळी हिरावून घेतल्या जायची भीतीही त्यांना नसते. दारिद्र्याचा थाट आणि दारिद्र्याचे ताट असा त्यांच्या दारिद्र्याचा खानदानी थाट असतो.

दांडेकरांना जे दिसले नाही व त्यामुळे तुम्हाला जे पाहता आले नाही ते मी दाखवले. एक विचारवंत म्हणून ही माझी जबाबदारी होती, असे मी मानतो. तुम्हीही माना.

—अनंतराव

# 'क्रांतिक' कासिम शरीफचा शासनातर्फे सत्कार!

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा

---

क्रमांक सात


अशोक परळीकर
परभणी


एका घरापुढील प्रशस्त चौकोनी प्रांगण. तिरंगा ध्वज आकाशात विहरत होता. पंक्तिबद्ध स्वयंसेवक ध्वजगीत गात होते. 'विजयी विश्व तिरंगा प्यारा, झंडा उंचा रहे हमारा' या गीताचा आवाज वातावरणात भरून राहिला होता. गीताचे शेवटचे कडवे पुन्हा पुन: आळवले जात होते.

> शान न उसकी जाने पाये,
> चाहे जान भलेही जाये,
> विश्व विजय करके दिखलाये,
> तब होवे प्रण पूर्ण हमारा
> झंडा उंचा रहे हमारा ।।

गीत समाप्त झाले. प्रभातकालीच्या त्या प्रसन्न वेळी 'इन्किलाब जिंदाबाद', 'भारत माता की जय', 'म. गांधी की जय'चा निनाद किल्ल्याच्या परिसरात प्रतिध्वनित झाला.

१९४६ चा ऑगस्ट मास. रविवारचा दिवस. दिनांक चार. वरंगल किल्ल्याच्या पूर्व भागात ध्वजवंदन होत होते. विश्वास बसण्यासारखी बाब नाही ही. ऐकणाऱ्यांचा नव्हे बघणाऱ्यांचाही विश्वास बसू शकत नव्हता—आजच्याप्रमाणे तेव्हाही. निझामाच्या धर्मांध आणि अत्याचारी राजवटीत, वरगलसारख्या 'सुभ्या'च्या ठिकाणी, इतक्या स्वतंत्रपणे आणि सन्मानाने, तिरंगा फडकविला जावा आणि ध्वजवंदनही व्हावे? पोलीस अॅक्शन का करावी लागली याचे एकाच वाक्यात, मोठे समर्पक कारण 'रियासत हैदराबादका वातावरण दम घुटानेवाला था' असे उदारमना प. जवाहरलाल नेहरूंनी दिले होते. परंतु अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीतही वरंगलच्या किल्ल्यात तिरंगा ध्वज फडकविला गेला होता—नव्हे प्रत्येक रविवारी, नियमितपणे, फडकविला जात असे यावर कोणाचा विश्वास बसेल? विश्वास बसण्यासारखी बाब नसली तरी होती अगदी सत्य—जगातील दहा आश्चर्यांपैकी एक जणू.

स्वातंत्र्यपूर्व कालातील आंदोलनात अखिल भारतीय काँग्रेसची विविध राज्यांसंबंधी तटस्थतेची भूमिका होती. भारतातील ज्या प्रदेशावर इंग्रजांचे राज्य होते—प्रशासन होते, त्या भागापुरतेच, अखिल भारतीय काँग्रेसने आपले कार्य मर्यादित ठेवले होते. हैदराबादच्या निझामी राज्यात अ. भा. काँग्रेसचे कार्य नव्हते. 'स्टेट पीपल्स कॉन्फरन्स' नावाची एक संस्था हैदराबादमध्ये कार्यशील होती आणि तिला अ. भा. काँग्रेसचे समर्थन होते. परंतु स्वत: काँग्रेस मात्र, व्यवस्थाप्रमाणे, राज्याच्या प्रश्नाबाबत उदास होती, चूप होती.

हैदराबादच्या निझाम सरकारचा हा सदाचा प्रयत्न होता की, कोणत्याही कारणामुळे त्याची प्रजा एखाद्या राजकीय मंचावर एकत्र न यावी, नव्हे तिला संधीच मिळू नये. म्हणूनच राजकीय पक्षांवर बंदी घालण्यात आली होती. कोणत्याही प्रकारची राजकीय संघटना उभारली जाऊ शकत नव्हती. सरकारचा कडवा विरोध असल्यामुळे राजकीय संघटना आकार घेऊ लागणे तितकेसे संभवनीय नव्हते. परंतु शेजारच्या ब्रिटिश प्रांतात ज्या राजकीय उलाढाली होत त्यापासून सर्वस्वी अलग, विनास्पर्श रहाणे सर्वस्वी अशक्य होते.राजकीय पक्षांना बंदी असल्यामुळे परिणामत: सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक रूपात कार्य आरंभणे सुरू झाले. शासनाने या कार्यालाही विभक्त ठेवण्याचा प्रयत्न केला आणि म्हणून आंध्र—परिषद, महाराष्ट्र परिषद आणि कर्नाटक कॉन्फरन्सची स्वतंत्र उभारणी झाली. आर्यसमाजाचे धार्मिक आंदोलन राज्यव्यापी होते. परंतु राज्यातील तरुण वर्ग या कार्याने संतुष्ट नव्हता. तो निझामी सत्तेविरुद्ध 'मैदाना'त येऊ इच्छित होता, त्याचे लक्ष्य राजकीय होते—अगदी उघड. राजकीय आकांक्षेने प्रेरित कार्य उघड आणि सक्रिय व्हावे असे त्यांना वाटत होते.

१९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनापूर्वी वरंगलमधील या तरुणांनी वैयक्तिक सत्याग्रह केला होता. राजकीय दृष्टीने पूर्ण राज्यात हा गौरव फक्त वरंगलला प्राप्त झाला होता. या वैयक्तिक सत्याग्रहासाठी प्रामुख्याने प्रयत्नशील असणारे नवयुवक सर्वश्री एम्. एन्. राजलिंगम्, बी. रंगनाथकलु आणि कोमरगिरी नारायणराव होते आणि आता १९४६ मध्ये याच वरंगल जिल्ह्यातील एक-दोन स्थानी या नवयुवकांनी राजकीय हालचालींना पुन्हा आरंभ केला होता. त्यांच्या कार्यात बी. एन्. चंद्रमौळेश्वरराव आणि हायग्रीवाचारी येऊन मिळाले. या सर्वांनी एकत्र येऊन सल्लामसलत

लत केली. त्यांनी एकमुखी निर्णय घेतला की, आपल्या लोकांत आत्मविश्वास आणि जागृती निर्माण करण्यासाठी प्रत्येक रविवारी ध्वजवंदन करावयाचे. तिरंगी ध्वज सन्मानाने फडकावून लोकांना बौद्धिकाद्वारे राजकीय परिस्थितीचे ज्ञान द्यावयाचे आणि शिवाय तरुण प्रौढांना शस्त्र आणि शारीरिक शिक्षण द्यावयाचे. वरील निर्णयानुसार वरंगल किल्ल्यात या तरुणांचा अपेक्षित कार्यक्रम सुरू झाला. किल्ल्याची निवड एवढ्यासाठी केली गेली होती की, काकतीय महानगरीच्या या केंद्राशी सांस्कृतिक आणि राजकीय गौरव निगडीत झाला होता. त्यांच्यासाठी वरंगल किल्ला प्रेरणेचा स्रोत होता. बघता बघता या तरुणांच्या भोवती उत्साही आणि धाडसी नवतरुणांचा एक उत्तम मेळावा जमा झाला. उत्साहाला नवे उधाण आले. धूमधडाक्याने आणि जोशात कार्यक्रम होऊ लागले.

एकीकडे तरुणांनी आपल्या कार्यक्रमाचे बस्तान नीट बसवले होते तर दुसरीकडे लोकतांत्रिक अंमल आणि त्याच्या संभाव्य परिणामांना लक्ष्य करून संबंधित 'स्थानावर' बेचैनीचा, अस्वस्थतेचा जन्म झाला होता. या बेचैनीने आणि अस्वस्थतेने स्वार्थरक्षणासाठी एका नव्या विचारधारांची सृष्टी उभारली आणि एक नवा नारा स्वजनांना दिला. 'बुडणाऱ्याला काडीचा आधार' तसा हा प्रकार होता. दिला गेलेला नवा नारा 'हम मुसलमान, (रियासतके) बादशाह है' आर 'निझाम हमारा प्रतीकमात्र है!' इसलिये हम मुसलमानोके इजाजत के बगैर कोई राजकीय सुधार या परिवर्तन नहीं होगा!' इत्यादी. नेत्याचे नाव होते 'बहाद्दूरयार जंग.' या विचारसरणीच्या संघटनेचे नाव होते 'इत्तेहादूल मुसलमीन.' निझाम सरकारच्या दृष्टीने ही राजकीय बाब नव्हती आणि त्यामुळे या संस्थेवर बंदी नव्हती. थोड्याच दिवसात नवाब बहाद्दूर यारजंगची संघटना अशी प्रबळ झाली की त्या संघटनेची धास्ती घेऊन निझामाने नवाब साहेबावर विषप्रयोग केला असा लोकापवाद आहे. सत्य काय आहे हे परमेश्वर आणि संबंधित व्यक्तीशिवाय अन्य कोणालाही माहीत नाही. परंतु नवाब बहाद्दूरजंगसारखा एक निरोगी आणि तगडा गृहस्थ एकाएकी दि. २५-६-४४ रोजी मृत पावावा हे एक अनुत्तरीत प्रश्नचिन्ह आहे. त्यादिवशी निझामाकडे 'दावत' होती म्हणतात. निझामाला बहाद्दूरयार जंगचा काटा काढावयाचा होता. नबाबसाहेब वेळेचे पाबंद होते. दिलेल्या वेळेस ते नियोजित ठिकाणी गेले. पंगत बसली होती आणि त्यांना त्यामुळे थांबण्यास सांगण्यात आले. त्यांना हुक्का पिण्याची जबरदस्त सवय होती. त्यांच्यासमोर हुक्का ठेवण्यात आला. नवाबसाहेबांनी एक-दोन झुरके घेतले आणि त्यांचा श्वासोच्छ्वास आतल्या आत ओढला जाऊ लागला. त्यांच्या हातून हुक्क्याची नळी निसटली तेव्हा हुक्क्याची अदलाबदल करण्यात आली. दावत खाऊन बाहेर पडलेल्या लोकांना नवाबसाहेब मेलेले आढळले. निझामाने आपल्या कानावर हात ठेवले–अशा प्रकारची एक कथा कुटील निझामाच्या संदर्भात सांगण्यात येते. खरेखोटे अर्थातच बाहेर आले नाही. एका उर्दू कवीने नवाबसाहेबांच्या या मृत्यूबद्दल म्हटलेला शेर त्याकाळी सर्वतोमुखी झाला होता.

तुम गये दावत को खाने,
दावत तुमको खा गयी
ये कैसी मौत आगयी,
तुम्हे बहाद्दूर यार जंग ॥



असो ! आता त्याच सघटनेचा उपयोग आपल्या 'शेवटच्या दिवसात' निझाम आपल्या स्वार्थासाठी करून घेत होता. त्याने या सघटनेत वैयक्तिक लक्ष घालण्यास प्रारभ केला 'मजलीस'च्या निवडणुकी-सबधी आणि अतर्गत भानगडीविषयी निझामाचे 'फरमान' निघू लागले. तसे म्हटल्यास राज्यातील मुसलमानात राजकीय जागृती होती आणि आता तर प्रश्न त्याच्या स्वार्थाशी निगडीत होता. शासकीय सेवा आणि धनलाभाचे आयोजन जणू त्याच्या बापजाद्याची एकमेव 'देन' होती. जणू त्याचा तो एकाधिकार होता. हिंदूना ते गुलाम मानीत आणि योगायोगाने हिंदू बहुसख्य होते, या परिस्थितीत वरगल किल्ल्यात होणारे राजकीय 'जागरण' त्याना विचलित न करते तरच आश्चर्य होते. वरगल सुभ्याचे (Division) सुबेदार (commissioner) हबीब उल्लाखाँ एक खास स्वभावाचा गृहस्थ होता आपल्या धर्मांध, क्रूर आणि छलकपट स्वभावाचे दर्शन त्याने अनेकाना दिले होते. अर्थात जी प्रतिक्रिया बाहेर पडली ती एकदर तणावाला साजेशीच होती.

प्रत्येक सकाळ नव आशा आणि नवजीवन घेऊन येत असते अशी भाबडी श्रद्धा असते—आहे. आजही वरगल किल्ल्याच्या पूर्व दिशेने उदित होणाऱ्या सूर्यनारायणाने आपल्या कोवळ्याकोवळ्या किरणानी किल्ल्याच्या परिसराला न्हाऊ घातले होते. सारे वातावरण कसे प्रसन्न आणि सुखद होते. वर्षाऋतूचे आगमन झाले होते. निसर्गाने आपले भाडार खुले केले होते. पक्षीगणाच्या कलरवाने, किल्ल्याला केव्हाचीच जाग आणली होती. नेहमीप्रमाणे आजही, पूर्वी सांगितल्याप्रमाणे, एका घराच्या पटागणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम यथासमय, यथाविधी सपन्न झाला कार्यक्रम सपल्यानतर काही तरुण घराकडे परतले, काही शेजारच्या रामस्वामीच्या घरी चहापानासाठी गेले. इकडे ध्वजाजवळ केवळ मोगलय्या होता आपल्याच धुदीत ध्वजाची ढिली पडलेली दोरी तो नीट करीत होता. तोच—पाठीमागून येऊन एकाने अधोमुख मोगलय्याच्या मानेवर, पूर्ण शक्तिनिशी 'बर्छी'ने घाव घातला. मोगलय्याला काही कळण्याअगोदरच त्याच्या कंठातून रक्ताचे कारजे उडाले आणि तो तसाच ध्वजस्तंभाशी घेरी येऊन पडला 'शान न इसकी जाने पाये, चाहे जान भलेही जाये' गीतगायन सार्थकी लागले. मोगलय्या घेरी येऊन पडल्याबरोबर मारेकऱ्याला जोर आला. त्याने मोगलय्यावर अनेक वार केले. मारेकऱ्याचे अन्य साथीदारही आता प्रागणात जमा झाले होते 'मारो काटो' आवाज सुरू झाला. आवाज ऐकून घरच्या लोकानी दार उघडले तो त्याना धक्का बसला. रक्ताच्या थारोळ्यात मोगलय्या पडलेला आहे आणि जमा झालेले मुसलमान मारोकाटोच्या तालात मोगलय्याच्या प्रेतावर वार करताहेत. मोगलय्याचे शरीर अगदी छिन्नभिन्न आले होते. मोगलय्याच्या भावाने बाहेरील आवाज ऐकून काय प्रकार आहे हे पाहाण्यासाठी बाहेर डोकावले तो त्या राक्षसाचे लक्ष रामस्वामीवर पडले. ते आततायी आणि गुड साथीदार रामस्वामीकडे वळले. आपल्यावर हल्ला होणार हे जाणवताच रामस्वामीने दरवाजा वद करण्याचा प्रयत्न केला. त्या गडबडीत त्याच्यावर सुरी हल्ला झाला. जिवावरचे नाकावर बेतले. रामस्वामी आणि त्याच्या घरातील मित्रानी जोर लावून दरवाजा वद केला आणि आपल्या शक्तीचा 'टेका' दिला. बाहेरच्या जमावाने दरवाजावर धडका दिल्या पण दरवाजा उघडता आला नाही. बिचाऱ्या निशस्त्र आणि असावध मोगलय्यास धोका झाला. त्याची निर्घृण हत्या या राक्षसाच्या मनोवृत्तीवर पुरता प्रकाश टाकू शकेल. मोगलय्याला बेसावध मारण्यात आले अन्यथा तो दहा बारा जणास सहज भारी होता,

मोगलय्याच्या या निर्मम हत्येचे एकमात्र कारण म्हणजे प्रति रविवारी त्याच्या घराच्या प्रागणात राष्ट्रध्वजारोपण होत असे, स्वयसेवकाची कवायत-परेड होत असे. राष्ट्रीय गीत गायिले जात असे आणि राष्ट्रीय नारेही लावले जात. या सर्व माध्यमातून राष्ट्रीय जागृती होत होती 'मजलीस'च्या दृष्टीने हा अक्षम्य अपराध होता गुलामगिरीत सडत पडणाऱ्याची ही हिम्मत, हे धाडस की प्रस्थापित असफिया सत्तेविरुद्ध बडखोरीचा ध्वज लावावा ? त्याना सताप वाटण्याजोगीच बाब होती ही. म्हणून लकडी पहलवान आणि त्याच्या साथीदारांनी असावध अशा मोगलय्यास मारले होते. रामस्वामी हाती सापडता तर त्याचे सुद्धा तुकडे तुकडे केले गेले असते मोगलय्यास मारण्याचा भीम (!) पराक्रम लकडी पहेलवानाने केला तेव्हा त्याचे अभिनदन करण्यासाठी, त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव करण्यासाठी चाहत्या मडळीनी गर्दी केली आणि त्या मारेकऱ्याला मध्यभागी घेऊन, मिरवणुकीप्रमाणे हा जमाव राजमार्गावरून निघाला. 'शाहे उस्मान जिंदाबाद'च्या नाऱ्याने किल्ल्याचा परिसर दणाणून गेला.

लकडी पहेलवानाने, एका बडखोर काफिरास मारून, फार मोठे काम केले होते. देश आणि राजा याची असामान्य सेवा केलीहोती. प्रशसकाच्या नजरेत आज तो वीरमणी होता. लकडी पहेलवान—कासीम शरीफ या एकाच घटनेने मजलिसच्या 'नाकातील बाल' बनला. 'मुल्क' आणि 'मालिक'चा रक्षणकर्ता—राखणदार—बनला. वरगलचा तो आज हिरो होता. शासकवर्ग आणि मुसलमानाच्या दृष्टीने त्याने लाजवाब कार्य केले होत. 'शाहे उसमान जिंदाबाद' कासीम शरीफ जिंदाबाद' 'लकडी पहेलवान जिंदाबाद' असा जयनाद करीत ही मिरवणूक वरगल किल्ल्याच्या महाद्वाराशी आली तोच वरगल सुभ्याचे ख्यातनाम (!) सुभेदार हबीबउल्लाखाँची गाडी सामोरी आली. सुभेदाराच्या आगमनाने मिरवणुकीत नवचैतन्य आले 'शाहे उस्मान जिंदाबाद' 'कासीम शरीफ जिंदाबाद'चे नारे बेबीच्या देठापासून लावण्यात आले. सुभेदार महाशय गाडीतून उतरून समोर आले. त्यानी कासिम शरीफचे—एका खुन्याचे—स्वागत पुष्पहार घालून केले. शासनाच्या प्रतिनिधीकडून एका नागरिकाच्या खुन्याचा असा सत्कार ? निझामी राजवटीत असेच दृश्य दिसावयाचे. त्यात मरणारा 'काफीर' हिंदू होता आणि मारणारा 'पाक' मुसलमान होता. शासिताला शासकाने मारिले यात काय चुकले ? कासीम शरीफच्या अभूतपूर्व पराक्रमाचा गौरव करण्यासाठी सुभ्याचा सर्वाधिकारी आला एवढेच नव्हे तर त्याने पुष्पहार घालून कासीमचा—एका 'कातिल'चा सन्मान केला. केवढी तत्परता ! केवढी तळमळ ! हबीब-

उल्लाने कासिमच्या गळ्यात हार घालताच पुन्हा एकवार 'शाहे उस्मान जिंदाबाद' 'कासीम शरीफ जिंदाबाद'चा जयघोष झाला. मिरवणुकीतील लोक आनंदाने बेहोश झाले होते. कासीमचा हा राजकीय सन्मान पाहून त्याचे मन आनंदले–सुखावले. जणू कासीम शरीफने मोगलय्यास मारून फार मोठे कार्य केले होते. मोगलय्याच्या रक्ताने कासिमचे हात लडबडले होते–भरले होते. त्याच अवस्थेत तो डुलत झुलत मिरवणूकीत चालला होता. सुभेदाराने सन्मानित केल्यामुळे त्याला आभाळ ठेंगणे झाले होते. लकडी पहेलवानाचे–एका खुनी माणसाचे–या प्रकारे स्वतः सुभेदाराने स्वागत केलेले ऐकून हिंदूंचे धाबे दणाणले. भय आणि असुरक्षिततेचे विषादयुक्त वातावरण हिंदू-वस्तीत पसरले. हा असा होता निझामी शासन आणि निझामी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा व्यवहार! मोगलय्याच्या खुनाचा आरोप ठेवून कासीमला न्यायालयात ओढणे बाजूलाच राहिले–त्याचा जाहीर सत्कार केला गेला. निझामी राज्यात प्रशासन आणि व्यवस्था–लॉ अँड ऑर्डरचे स्वरूप किती बीभत्स आणि संतापजनक होते त्याचे हे बोलके उदाहरण आहे. निझामी सत्तेचे खरे अंतरंग हे असे होते–अगदी विसाव्या शतकात, ब्रिटिश पॅरामौंट-सी-आंग्ल प्रभूसत्तेच्या छत्र छायेत.

सरकारी अधिकाऱ्यांनी गौरविलेली ही मिरवणूक किल्ल्याकडून नगराकडे मार्गस्थ झाली. किल्ल्याच्या हद्दीतून नगरात प्रवेश करण्यापूर्वी एक रेल्वेगेट ओलांडावे लागते. गेटच्या जवळ हिंदूंची वस्ती होती. तेथे पोचेपर्यंत मिरवणुकीला उन्माद चढला होता. वरंगळ नगराची वस्ती आता प्रारंभ व्हावयाची होती. मिरवणुकीतील मर्कटांनी काही झोपड्यांना आग लावली. झोपड्यांच्या आश्रयाने रहाणारे–बेघर असणारे–हिंदू अक्षरशः रस्त्यावर फेकले गेले. मुसलमानांच्या या खोडीने हिंदू बिथरले, चिडले. त्यांनी संघटितरीत्या या मिरवणुकीवर एकाएकी हल्ला केला. या अनपेक्षित हल्ल्याने 'गाजी' मुसलमान घाबरले. या प्रखर हल्ल्याने त्यांची टांगतोड झाली पण एकाच पायाने ते वीर (!) पळाले. त्यांच्या अभूतपूर्व विजयाला, यशाला–आनंदाला या हल्ल्याने गालबोट लागले होते–मिरवणुकीतील बहाद्दर (!) आणि त्यांच्या रूपाने शासन अपमानित झाले होते.

दुसऱ्या दिवशी या अपमानाचा सूड घ्यावा म्हणून चिप्पा बालय्याची कत्तल करण्यात आली. परंतु तरीही रेल्वे गेट-जवळील लोकांची (अर्थात हिंदूंची) 'नशा' जोवर उतरली जात नाही तोवर त्यांना चैन नव्हती. चार बावडी क्षेत्रात एकत्रित येऊन, गेटवाल्या वस्तीवर त्या दिवशी हल्ला करून, त्यांना चांगलाच 'सबक' शिकवावयाचा, असा मुसलमानांनी बेत केला आक्रमणाची कुणकुण वस्तीवाल्यांना लागली. ते सावध होतेच. त्यांनी आत्मरक्षणार्थ चंग बांधला. हा विभाग, आर्यसमाजाच्या प्रभावाखाली होता. त्यांचा स्थानीय नेता होता इटकियाल मधुसूदनराव. रेल्वे गेट वस्तीवाल्यांचे मनोधैर्य जबरदस्त होते. ते मुसलमानगुंडांशी प्रखर लढा देऊ इच्छित होते. सुभेदाराने एकंदर परिस्थितीचे सूक्ष्मावलोकन केले. स्थानीय मुसलमान या वस्तीला धडा न शिकविता धडा शिकतील–फजीत होतील हे त्याने जाणले. तेव्हा मुसलमान गुंडांच्या सोबत निझामी पोलीस देण्याचे त्याने ठरविले. परंतु अपेक्षित संख्येचे पोलीसदल वरंगलमध्ये नव्हते. तेव्हा सुभेदाराने, दोन्ही पक्षांची गाठ पडू नये, मार झोड होऊ नये (अर्थात स्वकीयांची हानी होईल हे लक्षात घेऊन) म्हणून, दोघांमध्ये शान्तिसाठी समेट करण्याचे नाटक केले आणि त्या दिवसापुरता पराभवाचा, विनाशाचा, नामुश्कीचा प्रश्न पुढे रेटला.

बाहेरील पोलिसांची मदत मागविण्यात आली. जेव्हा प्रचंड संख्येने पोलिसांची कुमक आली तेव्हा सुभेदाराचा जिवात जीव आला. त्याने स्थानीय मुसलमान गुंडांना 'हिरवा कंदील' दाखविला, इशारा दिला. प्रचंड संख्येने पोलिसांचे पाठबळ घेऊन मुसलमानी गुंड, रेल्वेगेटवाल्यांचा बदला घेण्यासाठी, शस्त्रसज्ज होऊन, वाजत गाजत निघाले. या हल्ल्याची पूर्वसूचना वस्तीवाल्यांना मिळाली होती. त्यांनी प्रतिकाराची व्यवस्थित तयारी केली आणि ते हल्ल्याची प्रतीक्षा करीत रेल्वेगेटापाशी थांबले. सुभेदार महाशय, पोलीस दलासह, रेल्वे गेटाजवळ आले. समोरच्या हिंदूंना पाहून मुसल-




मान गुंड हल्ला करीनात हे त्याने पाहिले. त्याने हिंदूंना ' डिसपर्स ' व्हावयास सांगितले. वस्तीवाल्यांनी सुभेदारांना उत्तर दिले, आम्ही तर या वस्तीतील आहोत. हे जे उपरे लोक इथे आले आहेत– जमा केले गेले आहेत, त्यांना प्रथम डिसपर्स व्हावयास सांगा. ते आमच्या वस्तीवर हल्ला करण्यासाठी एकत्रित झालेले आहेत. त्यांना पिटाळून, अर्थातच, आमच्या वस्तीचे रक्षण करण्यासाठी आम्ही इथे उभे आहोत. तेव्हा आपण कृपया त्यांनाच डिसपर्स व्हावयास सांगितले तर सर्व काही सुरळीत होईल.' सुभेदाराने त्यावर युक्तिवाद करण्याचा प्रयत्न केला.' तुमच्या रक्षणासाठी आम्ही आहोत. तेव्हा रक्षणाचा भार आम्हावर टाकून तुम्ही निर्धास्तपणे वस्तीत परत जा. मी जातीने तुमचे रक्षण करीन.' सुभेदाराच्या म्हणण्याला वस्तीवाल्यांनी संमती दिली नाही. ते सुभेदाराला चांगलेच ओळखून होते. त्यांनी स्पष्ट शब्दात डिसपर्स होण्यास नकार दिला आणि उलट, 'आम्ही तर आमच्या वस्तीत एकत्र झालो आहोत. हे भाडोत्री गुंड बाहेरून मागविलेले आहेत. आपणास आमच्या रक्षणाची तळमळ असेल तर त्यांनाच कृपया डिसपर्स व्हायला सांगा.' असे सुभेदार महाशयांना सुनाविले. हा उद्धटपणा (!) सुभेदारांना असह्य झाला. हिंदूंची अस्मिता त्यांना दुखवीत असे. या अस्मितेला या बंडखोरीला ' कुचलणे ' त्याला अत्यावश्यक वाटले. वस्तीवाल्यांच्या उत्तराने तो बिथरला आणि त्याने ' फायर 'ची आज्ञा दिली. पोलीस दल तयार होतेच... त्यांनी पहिली फैर झाडली, तीन माणसे (परमट्टी कुष्टय्या, कोडीमेला कनकय्या आणि भलप्पा) मारली गेली आणि दोन (एम्. बाडी. लिंगय्या आणि आडेपु कोमरय्या) माणसे गंभीर जखमी झाली. अशा रीतीने केवळ आपल्या वस्तीचे, मुसलमान गुंडांपासून, रक्षण करू इच्छिणाऱ्यांवर पोलिसाकरवी गोळीबार करून, सुभेदार महाशय, हिंदूतील साहस, अस्मिता नष्ट करू -करू इच्छित होते.

श्री. मोगलय्या आणि रामस्वामी गौड वरंगल किल्ल्यातील पिढीजात रहिवासी होते. दोघांचेही शिक्षण तेलगू लिहिण्या-वाचण्या पलीकडे झालेले नव्हते. मोगलय्या पिढीजात धंदा सांभाळीत होता आणि रामस्वामी आडत्याचा व्यवहार करी. दोघेही राष्ट्रीय आंदोलनात सक्रीय होते. मोगलय्या अधिक समर्पित होता. त्याला व्यायामाचा नाद होता. त्याचे शरीर सुडौल आणि धष्टपुष्ट होते. स्वातंत्र्यासाठी आपणही काही करावे, आपलाही काही वाटा असावा असे त्याला वाटे. आणि यामुळेच त्याला असे मरण आले. परतु आज तत्कालिन काही राजकीय कार्यकर्ते सोडून ज्यांची संख्या बोटावर मोजण्याइतपत आहे, वरंगलच्या सर्वसाधारण नागरिकांना मोगलय्याच्या बलिदानाची, कार्याची आठवणही नाही. Public has a very short memory असे जे म्हटले जाते ते खरेच आहे. अर्थात अनेकांच्या बाबतीत हे शल्य अनुभवास आले आहे.

मोगलय्या आणि चिप्पा बालय्या यांच्या हत्येनंतर जवळ जवळ सहा महिन्यांनी अनंत रामचंद्र नामक हिंदू पहिलवानाला, एका विहिरीवर, मोगलय्याप्रमाणेच बेसावध गाठून मारण्यात आले. या सर्व हत्येमागे एकच डाव होता– एकच तंत्र होते. बहुसंख्य हिंदूप्रजा नेहमीसाठी भयग्रस्त आणि असुरक्षित रहावी हा प्रयत्न होता. जिथे जिथे जागृती, सामर्थ्य किंवा संपन्नता दिसली तिथं तिथे नायनाट करून हा सारा विशाल समाज मार्गदर्शनापासून वंचित, असहाय्य, विपन्न आणि भयग्रस्त रहावा की ज्यामुळे मुसलमानांचे वर्चस्व नेहमीसाठी राहील आणि हिंदूंनी कधीही डोके वर काढू नये म्हणून हा डाव होता.

३० जून १९४७ ची घटना. वरंगल शहरावर उदासीनतेची छाया पडली होती. सगळीकडे भीषण शांतता अनुभवावयास येत होती. गावामध्ये मुसलमानाची एक सभा सकाळच्या १०–११ च्या दरम्यान झाली होती. वातावरणात तणाव होता. मृगनक्षत्र संपून आर्द्राची सुरुवात झालेली होती. मृगाच्या प्रारंभिक वर्षावाने ग्रीष्माचा ताप तीव्र केला होता. निसर्गातील या प्रकारास अनुसरून राजकीय वातावरणही चांगलेच तापलेले दिसत होते. १६ जून १९४७ रोजी स्टेट काँग्रेसचे अधिवेशन संपन्न झाले होते. तेव्हा या अधिवेशनाची तीव्र प्रतिक्रिया धर्मांध मुसलमानांकडून होणे अस्वाभाविक नव्हते. आपल्या अधिवेशनात एका प्रस्तावाद्वारे स्वतंत्र हैदराबादला विरोध केला गेला होता. आणि जबाबदार लोकतांत्रिक सरकाराची मागणी केली गेली होती. म्हणून हैदराबाद राज्यात, प्राकृतिक आणि राजकीय क्षेत्रात, ' तापक्रम ' वाढीस लागलेला होता.

दुपार झाली होती. १–१॥ च्या सुमार असावा. हनमकोंडयाच्या चौरस्त्यावरून जेव्हा डॉ. नारायणरेड्डीची कार वरंगलकडे वळली तेव्हा जाफर नावाच्या पोलीस सब-इन्स्पेक्टरने डॉ. साहेबास 'सलाम करून' वरंगलमधील परिस्थितीची कल्पना देऊन, वरंगलला न जाण्यास परोपरीने सांगितले. डॉक्टरनी जाफरच्या सलामाचा स्वीकार करून, त्याच्या सूचनेबद्दल आभार मानून त्याला म्हटले, 'मुझे किसका डर है? मैंने किसका क्या बिगाडा है? मैंने तो बहुत बार मुसलमानोंपर फुकट इलाज किये हैं। वे मुझे हरगिज तकलिफ नहीं देंगे। मेरे पेशन्ट ज्यादातर मुसलमीन है। और वे मुझे अच्छी तरह जानतेभी है। फिर डर किस बात की है?' जाफरही डॉक्टरसाहेबांचाच पेशन्ट होता. त्याने डॉक्टरांना आपल्याकडून सावध केले. डॉक्टर ' व्हिजिट 'हून परतत होते. आधी मंडीतील आपल्या दवाखान्यात जाऊन मग घरी जाण्याचा त्यांचा बेत होता. वरंगलमधील वातावरण पाहून त्यांचा नोकर पार घाबरला. डॉक्टरांनी त्याला आपल्या गाडीतून त्याच्या घराशी सोडले. दवाखान्याला जाण्याचा बेत रहीत करून ते आपल्या घराकडे वळले. घराजवळ त्यांची गाडी येताच दगडांचा वर्षाव केला गेला. डॉक्टरांनी घरापाशी गाडी थांबवली. सत्तर-ऐंशी मुसलमान गुंडांनी त्यांच्या गाडीला घेरले. डॉक्टरांना आपल्या ओळखीचे अनेक चेहरे त्या गर्दीत दिसले. त्यांनी डॉक्टरांना गाडीबाहेर ओढले. डॉक्टरांच्या विश्वासाला आज प्रथमच तडा गेला. बाहेर ओढणाऱ्यात त्यांचे पेशंटच सक्रिय होते. ओढाओढीत त्यांच्या हातातील घड्याळ तुटून खाली पडले. एवढ्यात एकाने त्यांच्यावर सुऱ्याने वार केले. एक पोटावर आणि दुसरा मानेवर. पोटावरचा वार गंभीर होता. डॉक्टरांनी एका हाताने पोटाला दाबले आणि ते घराकडे धावले. घरात जाताच त्यांनी पलंगावर

# ग्राहक सहकार व्यवहार व तत्त्वज्ञान

पां. वा. गाडगीळ

ग्राहक सहकाराची चळवळ ही काही अगदी नवीन चळवळ नव्हे पश्चिमी राष्ट्रात इंग्लंड, स्वीडन, डेन्मार्क जर्मनी वगैरे सुधारलेल्या देशात १०० वर्षांपूर्वीपासून ही चळवळ कमी अधिक प्रमाणात रूढ असून कम्युनिस्ट राष्ट्रात ग्राहक सहकाराचाच नव्हे तर एकंदर सहकारी चळवळीचाच प्रभाव खूप मोठा असतो. त्या त्या देशात सहकारी चळवळीचा उगम थोड्या फार वेगवेगळ्या प्रेरणेतून होत असला तरी मुख्यत. व्यापारी पिळवणुकीतून उत्पादकाचा व ग्राहकाचा बचाव करणे आणि उपभोग्य मालाची गरज भागल्यावर जास्तीत जास्त भांडवल सचय करता येणे या हेतूने सहकारी चळवळ सर्वत्र केली जाते. भारतात वरील हेतुशिवाय किमतीचे स्थैर्य निर्माण करणे, हा विशेष हेतू सहकारी चळवळीत गृहीत धरलेला आहे.

भारताचा आर्थिक विकास नियोजनाने केला जावा अशी व्यवस्था स्वातंत्र्य प्राप्तीनतर करण्यात आली. नियोजनाचे तत्त्वज्ञात हे जगात नवीन असून ते मुख्यत: कम्युनिस्ट राष्ट्रानी सशोधिले व व्यवहारात आणले. नियोजन म्हटले की कम्युनिझम अपरिहार्य असतो असे मत वरील वस्तुस्थितीमुळे काही लोक माडीत असतात, पण हे खरे नाही. आज लोकशाही प्रधान अशा पुढारलेल्या भाडवलदार राष्ट्रानीही कमी अधिक प्रमाणात नियोजन स्वीकारले असून मागासलेल्या राष्ट्रात लोकशाही असो अथवा कम्युनिझम असो, नियोजना वाचून आर्थिक विकासाची पाऊल पुढे पडतच नाही. याचे विशेष कारण असते. गरिबीच्या ससारात काटकसर करावी लागते. हा अनुभव सार्वत्रिक आहे, शाळेतील मुलाचा खर्च जर वाढला आणि वडील माणसांची मिळकत जर मर्यादित असली, तर वडील माणसे आपला काही खर्च कमी कमी करून मुलाच्या शाळेच्या खर्चाची तरतूद करतात. तसेच मुलाच्या शाळेच्या खर्चाला खर्चाच्या अनुक्रमात अग्रस्थानही देतात. गरीब व मागासलेल्या राष्ट्रात आर्थिक विकास करताना वरील दोन्ही तत्त्वे पाळावी लगतात सिमेंटच्या कारखान्यात आणि पोलादाच्या कारखान्यात अनुक्रमे सिमेंट व पोलाद जे उत्पन्न होत आहे ते देशाच्या वाढत्या गरजेच्या मानाने अपुरे असते. ते जर श्रीमताकडून जास्त पैसा घेऊन त्याना विकून टाकले तर श्रीमताच्या, मोठ्या हवेल्या बाधल्या जातील आणि गरिबाना रहायला घरेच मिळणार नाहीत. म्हणून श्रीमताचा पुरवठा कमी करून गरिबाना पोलाद व सिमेंट याचा पुरवठा करणे आणि त्याला अग्रक्रम देणे हे अवश्य ठरते. त्याचबरोबर श्रमजीवी गरिबांना जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा सतत चालू राहील अशी मिळकत त्यांना देणे आणि श्रमजीवी वर्गांनी मनापासून व कार्यक्षमतेने उत्पादन करणे हेही आर्थिक विकासाच्या दृष्टीने अवश्य ठरते. या सर्व व्यवस्थेचे नाव नियोजन.

कळकळीने व कार्यक्षमतेने उत्पादन करणे, उत्पादनाची व खर्चाची आखणी करणे, खर्चात काटकसर करून खर्चाचा अनुक्रम ठरवणे, इत्यादी गोष्टी राष्ट्रीय नियोजनाचा गाभा ठरतात. या गोष्टी पुढाऱ्यांनी व जनतेने समजून घेऊन स्वेच्छा शिस्तीने केल्या तर ती लोकशाही आणि त्यासाठी सक्ती करावी लागल्यास ती हुकूमशाही, एवढाच फरक माझ्या मते निदान मागासलेल्या राष्ट्रात कम्युनिझम व लोकशाही यामध्ये करता येईल.

नियोजनाची आखणी करायची म्हणजे ती दीर्घकालीन करावी लागते. शेती दरसाल पुन्हा पुन्हा पिकत असते कारखान्याचे उत्पादन दररोज होत असते. उलट कारखान्याची उभारणी आणि धरणासारखी बाधकामे कित्येक वर्षांनी पुरी होणारी असतात. या सर्व कामात राबणारी माणसे रोजच्या रोज श्रम करून व त्याचा मोबदल्याचे म्हणजे मजुरीचे दर दीर्घकालचे ठरवावे लागतात. त्यासाठी वस्तूच्या किमतीही दीर्घकालावर स्थिर ठेवाव्या लागतात. शेती, उद्योग धदे, धरणासारखी बाधकामे या सर्वांची दीर्घकालावर जमा खर्चाबाबत आखणी करावयाची म्हणजे, किमतीचे स्थैर्य हे अत्यावश्यक असते.

किमतीच्या स्थैर्याची ही गरज किती मोठी व निश्चित असते हे गेल्या २ ते ३ वर्षांत भारतात चागले कळून आले आहे गेल्या दोन वर्षांत भारतातील किमती ५० टक्क्याहून अधिक वाढल्या. त्यामुळे, प्रत्येक वर्षाच्या आरभी उत्पादनाचे बजेट शेतकऱ्यानी, लहानमोठ्या कारखान्यानी, सरकारने जे जे केले ते सारे विस्कटले आणि उत्पादन खर्च पुष्कळसा वाया जाऊन दारिद्र्य व टंचाई यांची आग भडकत गेली. किमती स्थिर ठेवता आल्या असत्या तर ही फजिती झाली नसती. म्हणून नियोजनात किमती स्थिर राखणे हा नियोजनाच्या यशाचा गाभा असतो हे सहज कळून येते.

ग्राहक सहकार हा किमती स्थिर ठेवण्याचा मुख्य उपाय होय असे वर म्हटले आहे. सक्षेपाने बोलता यावे म्हणून असे म्हटले आहे. पण ते सपूर्ण सत्य नव्हे. संपूर्ण खरेदी विक्री व्यवहार सहकारात आणला तरच मागासलेल्या राष्ट्रात किमती स्थिर रहातात हे सपूर्ण सत्य होय. आणखीही अधिक गरज म्हणजे सावकारी कर्जही सहकारातच उभारणे. ही गरज मागासलेल्या शेतीप्रधान राष्ट्रात

किमतींच्या स्थिरतेसाठी व भांडवल संचयासाठी अत्यावश्यक असते. या संबंधाने ग्रामीण पत चौकशी समितीने 'सावकारी कर्ज व शेतीमालाची खरेदी विक्री यांची जोडगण लावली पाहिजे.' असे सूत्र सांगितले आहे.

सदर समितीने मुख्यतः ग्रामीण जीवनाचा विचार केला आहे. ग्रामीण भागात सावकार फाजील व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यांची पिळवणूक करतात. नंतर शेतकऱ्यांचा माल कर्जापोटी खरीदून शेतकऱ्याला किमतीत पिळतात. त्यामुळे शेतकऱ्याजवळ भांडवल रहात नाही. इतकेच नव्हे तर त्याची उपासमारही होते आणि सावकार व व्यापारी यांना मिळणारा नफा उत्पादक भांडवल म्हणून शेतकऱ्यांना न मिळता केवळ व्यापारी नफा आणखी आणखी वाढण्याला कारण होतो. म्हणून सावकार व व्यापारी यांना ग्रामीण अर्थ-व्यवहारातून बाजूला काढून उत्पादन व खरेदी विक्री हा व्यवहार करणे आवश्यक ठरते.

पण शेतकरी हे लहान लहान व गरीब असतात. त्यांना एक-एकटयाने भांडवल उभारता येत नाही म्हणून त्यांनी सहकाराने भांडवल उभारून सावकारास बाजूला सारावे आणि उत्पादक शेत-कऱ्यांनी सहकाराने आपला माल विकून रास्त किमत व रास्त नफा मिळवावा, ही ग्रामीण पतचौकशी समितीची शिकवण आहे. उत्पादक शेतकऱ्यांनी सहकाराने आपला माल जो विकायचा तो ग्राहकाने सहकाराने खरीदल्यास उत्पादकांची व ग्राहकांची व्यापाऱ्याकडून होणारी पिळवणूक टळून दोन्ही बाजूने किमती रास्त व स्थिर ठेवता येतील. वर ग्राहक सहकार हा जो संक्षिप्त शब्द वापरला त्याचा तपशील इतका मोठा व सर्वंकश असून 'कर्ज व खरेदी विक्री हा संपूर्ण व्यवहार सहकारात आणणे हा पिळवणूक थांबवण्याचा, किंमती स्थिर ठेवण्याचा आणि भांडवल संचयाचा मार्ग होय.' या शब्दात हा ग्राहक सहकाराचा सिद्धांत सांगावा लागतो.

## जपानचे उदाहरण


याचे विवेचन थोडक्यात करता यावे म्हणून जपानचे उदाहरण समजून घेण्यासारखे आहे. जपानमध्ये वैयक्तिक शेती आहे. म्हणजे सहकारी शेती नसून अथवा संयुक्त भांडवली शेती नसून एक एका शेतकरी कुटुंबाला अडीच एकर ते साडेसात एकरपर्यंत शेती दिलेली आहे. शेती अशा रीतीने वैयक्तिक असली तरी शेतीमालाची विक्री, त्याचे साठवण, त्याचे संरक्षण, त्याची वहातूक, इत्यादी सर्व व्यवहार सहकारी पद्धतीने व साधनांनी होतात. जपानी शेतकरी सहकारी बँकांतीच कर्ज घेतात आणि सहकाराने माल विकून मालाच्या किमतीतून बँकेची कर्जे परत करतात. सरकारने शेती मालाच्या किमती शेतकऱ्याला परवडतील व शेतकऱ्याच्या मिळकतीतून त्याला सुस्थिती प्राप्त होईल अशा प्रकारे बांधून दिल्या असल्यामुळे आणि शेतकरी अतिशय मेहनतीने व कार्यक्षमतेने शेती करीत असल्यामुळे शेतीच्या व्यवहारात उत्पादन वाढून शेतकऱ्याला नफाही चांगला रहातो. आणि शेतकरी आपला शिल्लक पैसा सहकारी बँकातच ठेवी म्हणून ठेवतो. यामुळे जपानी सहकारी बँकात ठेवी इतक्या वाढतात की सदर बँकांना शेतकऱ्यांची कर्जाची गरज भागवून शिवाय उद्योगधंदेवाल्यांना त्यातून कर्जेही देता येतात.

जपानमध्ये सबंध देशात, तांदूळ सरकारच खरेदी करीत असून तांदुळाचे रेशनिंग आहे. भात सडून तांदूळ करण्याच्या गिरण्या ९० टक्के प्रमाणात सहकारी संघटनांच्या असून शेतकरी या गिरण्यातच भात सडून सरकारला तांदूळ विकतात. काही व्यापाऱ्यांना तांदूळ खरेदीचे परवाने दिले आहेत पण शेतकरी व्यापाऱ्याला ५ ते १० टक्क्याहून अधिक तांदूळ विकीतच नाही. तसेच शेतकऱ्याच्या संसाराला व शेती व्यवसायाला लागणाऱ्या सर्व वस्तू जपानमध्ये सहकारी संघटना मार्फत खरेदी केल्या जातात. फळांचे रस काढणे, ते डबाबंद करणे, यासारख्या उत्पादन संघटना आणि वहातुकीचे ट्रक्स, मालाच्या साठवणीची गुदामे, खतांचे लहान कारखाने, इत्यादी सर्व उत्पादन साधने जपानात सहकारी संघटनेत आलेली आहेत. सारांश जपानच्या लोकसंख्येत ४८ टक्के असलेला जो शेतकरी, त्याने शेती उत्पादन व्यवहार कौटुंबिक पातळीवर ठेवला असून शेती क्षेत्रातील बाकीचा सर्व अर्थव्यवहार सहकारात आणला आहे. भारतात ग्राहक सहकाराची चळवळ उभारायची तिची अंतिम व्याप्ती एवढी मोठी असावी लागेल.

## प्रा. गाडगीळांची सूचना

यापूर्वी हा प्रयत्न मुळीच झाला नाही. १९५४ साली युद्धकाळापासून चालत आलेली आर्थिक नियंत्रणे संपूर्ण रद्द करण्यात आली. त्यावेळी ती चूक होत आहे असा इशारा प्रा. ध. रा. गाडगीळ यांनी दिला होता. बाजारात येणारा धान्य वगैरे जो जीवनावश्यक माल त्यातला निदान एक तृतीयांश अथवा एक चतुर्थांश माल सरकारने शेतकऱ्यांच्या सहकारी संघटनांच्या सहाय्याने रास्त किमतीला खरिदावा आणि किमती फार कमी होण्याने शेतकऱ्याचे होणारे नुकसान टाळावे; तसेच किमती फाजील वाढल्याने ग्राहकांची होणारी लूट टाळण्यासाठी रास्त किमतीला माल विकावा अशी व्यवस्था प्रा. गाडगीळ यांनी सुचवली होती. वर उल्लेखलेल्या ग्रामीण पत-चौकशी समितीच्या सभासदात प्रा. गाडगीळ हे असून त्या समितीच्या अहवालात शिफारसलेली योजना अंमलात आणण्याचीच सूचना प्रा. गाडगीळ करीत होते. पण अगदी प्रांजळ बोलायचे तर सत्ताधारी पक्ष पैशासाठी व्यापारी वर्गापुढे लाचार झालेला असल्याने त्याने ग्रामीण पत चौकशी समितीच्या अहवालातील शिफारसी आणि प्रा. गाडगीळ यांची सूचना, यांची मुळीच कदर केली नाही.

विरोधी पक्षांनी, सुशिक्षित मध्यमवर्गाने व सामान्य जनतेनेही प्रा. गाडगीळ यांची ही सूचना समजून घेऊन तिचा अंमल करण्याच्या कृतीबाबत आग्रह धरला नाही. परदेशातून आलेल्या धान्याची विक्री सरकारने शहरी लोकांना किमती माफक रहाव्या या हेतूने केली व



शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किंमती देण्याचे धोरण न अवलंबता व्यापाऱ्यांच्या शोषणयंत्रात शेतीमालाचा किमतीचा व्यवहार सोपवून दिला. इकडे लोकसंख्यावाढ, उत्पादनवाढ व रोजगारीची वाढ सतत होत राहिल्याने शेतीमाल सतत अपुरा पडत राहून बाजारातील मागणी मात्र वाढती राहिली. यामुळे व्यापाऱ्यांना बाजाराची कोंडी करून किमती भडकवता आल्या.

युद्धे, अवर्षणे आणि लोकसंख्यावाढ, ही किमतींच्या वाढीची महत्त्वाची कारणे होत हे खरे आहे. पण लोकसंख्या वाढीला निदान १९६१ पासूनच्या काळात (स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या १५ वर्षांत लोकसंख्या एकदम खूप वाढली हे लक्षात घेऊन) आळा घालण्याचा प्रामाणिक व शिस्तशीर प्रयत्न जर झाला असता आणि प्रा. गाडगीळांच्या सूचनेप्रमाणे शेतीमालाच्या किमती कमाल व किमान पातळीवर फारसा चढ उतार होऊ न देता स्थिर ठेवण्याचा प्रयत्न सहकारी संघटनांमार्फत सरकारच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रव्यापी प्रमाणात, प्रामाणिकपणे व कार्यक्षमतेने झाला असता तर युद्धे आणि अवर्षणे यांचे धक्के सहन करूनही किमतींची पातळी नियोजनाच्या चौकटीत साधारण स्थिर राखता आली असती.

### अनुत्पादक चलनवाढ !

चलन फुगवटीने किमती भडकल्या असे सांगण्यात येते. यात सत्य आहे ते अल्पांशाने आहे. असत्यच पुष्कळ आहे. चलन फुगवटाही नेहमीच अयोग्य असतो असे नव्हे. नाशिक जिल्ह्यात काही जमिनीला पाणी नाही. म्हणून उत्पादन कमी असून लोक बेकार आहेत असे समजा. तसेच डोंगरावर पाऊस खूप पडत असून ते पाणी समुद्राकडे वाहून वाया जाते असेही समजा. येथे नाशिकच्या चलनी छापखान्यात एक कोटी रुपयांच्या नोटा छापून म्हणजच चलन फुगवटा करून त्या पैशाच्या खर्चाने चर खणले आणि वाहून जाणारे पाणी डोंगराच्या उतारावर अडवले तर खाली शेतीच्या प्रदेशात पाझर तलाव बांधता येतील, त्याच्या पाण्याने शेतीची पिके वाढवता येतील, रोजगारी वाढवता येईल व उत्पादन वाढून चलन फुगवटीने वाढलेल्या पैशापेक्षा अधिक उत्पादन वाढेल. चलन फुगत असता उत्पादन वाढले नाही तर महागाई भडकते, पण चलन फुगवून त्याचे भांडवल करून जर ते नव्या उत्पादनासाठी वापरले तर चलनाच्या वाढीबरोबर उत्पादनाचीही वाढ होऊन किमती भडकण्याचे टळते.

पण सरकारने ही काळजी घेतली नाही. व्यापाऱ्यांनी टंचाई माजवून चढ्या किमतीचा बाजार ठेवला. रोजगारी वाढत असल्याने रोजगारी वर्गाने अधिकाधिक मिळकती अडवणुकीने मागवून घेतल्या. चलन फुगवून पैसा वाढवता येतो हा सोपा मार्ग नोकरशाहीला दिसल्यामुळे नोकरशाहीने चलन फुगवटा करून राज्यकारभार फाजील खर्चाचा केला. सरकार विरोधी पक्षांनी महागाई वाढीबरोबर संप, बंद, अडवणुकी वगैरे मार्गांनी वर्गलढे पुकारून उत्पादन घटविले, आणि उत्पादन संघटना मोडकळीस आणली. राज्यकर्त्या वर्गाने



औद्योगिक परवान्यांचा व लाचबाजीचा उपयोग करून सत्तालोभ व धनलोभ यासाठी अर्थसघटनेत अनीती माजू दिली. या सर्व कारणाने उत्पादन वाढी पेक्षा फार मोठ्या प्रमाणात चलन फुगत गेले. धदेवाले व व्यापारी ह्यांनी महागाई वाढत असल्यामुळे उत्पादनात भांडवल घालण्यापेक्षा व्यापारात मालाची कोंडी करण्यासाठी चलन वापरून चलनफुगवटीला आणखी उत्तेजन दिले. आणि हे सर्व सकट आगी-सारखे सर्व बाजूनी भडकत असता लोकसख्या ही कीडमुगीप्रमाणे वाढत जाऊन उत्पादन वाढीतील बहुतेक भाग वाढत्या मुलांनीच खाऊन टाकला. हल्ली उत्पादन, घट आणि चलनवाढ यामधील दरी वाढत जात आहे. त्यामुळे बेकारी उसळत आहे. आजच्या आर्थिक आपत्तीचे स्वरूप स्थूलमानाने या प्रकारचे असून वर माडलेली त्याची उपपत्ती लक्षात घेतल्यास सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष हे या आपत्तीला सारखेच जबाबदार असल्याचे दिसून येते.

ही सर्व आपत्ती अखेर सहकार मार्गाने खरेदी-विक्री व्यवहार सुरू करून व लोकसख्या वाढीला त्वरित आळा घालून दूर करता येणे शक्य आहे. आजच जवळ जवळ ४ ते ५ कोटी लोकसख्येला अन्न नाही. ५० कोटी लोकसख्येला १० कोटी टन धान्य लागते, या हिशेबाने आज १२ कोटी टन धान्याची गरज आहे आणि सपलेल्या वर्षात फक्त १०॥ कोटी टन धान्य उत्पन्न झाले असून येत्या वर्षात अथवा त्या पुढील दोन तीन वर्षांत तरी अधिक धान्य निपजण्याचा सभव अगदी कमी आहे. परदेशातून मिळणारे धान्य अधिकाधिक अपुरे पडत जाईल तेव्हा कोटयवधी लोक अप्रसिद्धपणे उपासमारीने मरत रहाणे हे तूर्त तरी अपरिहार्य दिसते. कदाचित सरकारी अदाजा-पेक्षा अधिक अन्नधान्य खेड्यापाड्यात साचत असेल तर माणसांची मरामर त्यामुळे काही कमी होईल. पण सालोसाल लोकसख्येच्या वाढीचा वेग हा अन्न पुरवठ्याच्या वाढीच्या वेगापेक्षा कमी होणार आहे. यामुळे लोकसख्या वाढ थाबवल्याशिवाय उपासमार थांबणे शक्यच नाही.

हा काही लोकाच्या उपासमारीचा प्रश्न तूर्त तरी आपल्या शक्ती-बाहेरचा आहे असे मानून बाजार किंमती स्थिर कशा करायच्या एवढ्याच प्रश्नाचा विचार करू.

अर्थसघटनेतील बाकीचे सर्व दोष दूर करण्याचे सामर्थ्य बाजार-भाव स्थिर करण्याच्या सहकार प्रयत्नात मिळणार आहे. ग्रामीण पतचौकशी समितीने उत्पादकांच्या सहकारी सघटना स्थापून शेती-मालाची खरेदी विक्री करण्याचा आदेश दिला पण ती गोष्ट त्या-काळी घडली नाही. आता ग्राहकांची सघटना करून ग्राहकाने जीवनावश्यक माल सहकारितेने खरेदी केल्यास अखेरीस शेती-मालाचे उत्पादक सहकारितेने माल विकण्याला उत्तेजित होतील असा सभव दिसतो.

### सद्य:स्थिती आणि नवे प्रयोग

सध्या ग्राहक सहकारी चळवळ जी रूढ आहे ती फारशी प्रामा-णिक अथवा कार्यक्षम नाही. शिवाय ती अगदी तुरळकही आहे. तीत आणखी एक मूलग्राही दोष आहे. ग्राहक सहकाराची घाऊक व किरकोळ दुकाने सरकारने लाखो रुपये मदत देऊन उभी केली, पण त्या दुकानाचे भागीदार हे त्या दुकानाचे ग्राहक नसतात. उलट दुकानाचे ग्राहक हे त्या दुकानाचे भागीदार नसतात आणि दुकानाचे मालक भागीदार दुकाने स्वत: न चालवता नोकरावर सोपवून फक्त डिव्हीडंडस्‌ची काळजी घेतात. सहकारी खरेदी विक्री चळवळीचा हेतू किंमती स्थिर व्हाव्या, लोकाना रास्त किंमतीला माल मिळावा आणि उत्पादकाना रास्त किंमत मिळावी, टचाईच्या वस्तूचे रेशनीग लोकांनी खुशीने पत्करावे, ठरलेल्या किंमतीलाच लोकानी माल खरिदून काळ्या बाजारात जाण्याचे टाळावे, लोकानी बचत करून ती सहकारी बँकेत साठवावी आणि या सहकारी बँकेलाच कर्जव्यवहार करून देऊन खाजगी सावकारी अजिबात थाबवावी इत्यादी प्रकारचा असतो. पण आजच्या ग्राहक सहकारी दुकानानी यातले काहीही साधत नाही. जनतेला जाणीवयुक्ततेने या खरेदी विक्री व्यवहारात आपले कर्तव्य पार पाडण्याचे शिक्षण दिल्या-शिवाय ग्राहक सहकारी चळवळ यशस्वी होणार नाही.

ग्राहक सहकारी चळवळ कशी असावी याचा आदर्श अगदी अली-कडे पुण्यातील युवक महामडळाने घालून दिला आहे. या मडळाने २५–२५ कुटुबाचे गट करून दर महिन्याला जीवनावश्यक मालाची खरेदी त्या त्या गटातर्फे करण्याची पद्धत सुरू केली आहे जवळ जवळ ७००० कुटुबे आता या योजनेत सघटित झाल्याचे कळते. श्री. बिंदुमाधव जोशी हे या योजनेचे सघटक आहेत. प्रत्येक कुटुंबा-कडून १० रुपयाची बिनव्याजी ठेव घेऊन ७०००० रुपये बँकेत मुद-तीची ठेव म्हणून ठेवायचे व त्याच्या व्याजातून गगाजळी उभारून पुढला व्यवहार वाढवायचा इतकी शक्ती या सघटनेला २–३ महिन्यातच आली आहे.

मुबईस ताडदेव भागात शास्त्री हॉलमध्ये, अधेरीला चद्रशेखर नगर येथे, विलेपार्ले येथे व इतर काही भागात काही वर्षापासून असे सामुदाईक खरेदी करणारे गट स्थापन झाले आहेत. ही सर्व चळवळ तुरळक तुरळक न होता महापुराच्या पाण्याप्रमाणे सलग व सर्वत्र पसरली पाहिजे. एखाद्या वर्षाच्या आत लाख दोन लाख कुटुंबे अशा रीतीने सघटित झाल्यास उत्पादक कारखानदारांकडून रास्त किंमतीला घाऊक माल खरीदणे आणि शेतकऱ्याकडून धान्य, फळे, दूध इ. शेतीमाल दलालाशिवाय खरीदणे हे त्यामुळे शक्य होईल. ही ग्राहक सघटना ग्राहकासाठी चालविलेली ग्राहकाची सघटना असेल. आपण एकएकटे स्वार्थबुद्धीने जगणार नसून सामुदाईक हितासाठी परस्पराच्या सहाय्याने जगणारे आहेत. परस्परासाठी आपण झटले पाहिजे अशी जाणीवयुक्त कृती करणाऱ्या या ग्राहक सघटना अस-तील. सारे राष्ट्र अशा ग्राहक सघटनात विभागले गेले पाहिजे. काळाबाजार करायचा नाही, कुणालाही करू द्यायचा नाही. फाजील नफेबाजी कुणालाही करू द्यायची नाही. बचतीने राष्ट्रीय भांडवल सचय करायचा, लाचलुचपत चालू द्यायची नाही आणि धनोत्पादनाचे आपले राष्ट्रीय कर्तव्य ज्याने-त्याने कळकळीने व कार्यक्षमतेने पार पाडायचे, अशा आणाभाकानी या सघटना बाधलेल्या असतील.

हे सर्व अफाट व जगड्व्याळ आहे, पण तेच सर्व शक्य तितक्या लवकर पार पाडणे अत्यावश्यक आहे. राजकीय पक्षबाजीपासून पूर्ण अलिप्त राहून या सघटना काम करतील तर आर्थिक व सास्कृतिक क्रांती करून नव्या मानव धर्माने बाधलेला नवा भारतीय समाज निर्माण करतील. ही सर्व मागणी फार मोठी आहे पण याहून कमी अशा कक्षानेही आजचे अडलेले प्रश्न मुळीच सुटणार नसून भारतीय अर्थसघटना नजीकच्या काळातच उद्ध्वस्त होण्याचे टळणार नाही.

□ □

अंतर्गत भागाशी काहीही संबंधी नाही अशी एक गोष्ट तर विशेष महत्त्वाची आहे ती येथे सागणे अत्यत आवश्यक आहे. ती म्हणजे टॉलस्टॉयच्या पत्नीने या कादबरीचे बाळतपण करण्यासाठी जे कष्ट घेतले ती होय. ' रोज दिवसभर लिहिलेला भाग संध्याकाळी टॉलस्टॉय सोन्याच्या टेबलावर आणून ठेवी. रात्री सोन्याचे काम सुरू व्हायचे. टॉलस्टॉयने लिहिलेल्या भागाची सुवाच्य नक्कल उतरवून काढणे हे तीचे काम. ते ती अत्यत मनःपूर्वक करी. ती होती लेकुरवाळी. कादंबरी पुरी होईतो ४ मुलाची आई झाली होती. (कादबरी लेखनाचे काम सहा वर्षे चालले होते. ) दर दीड वर्षाला पाळणा हलत होता. पण मुले झोपली की सोन्याचे काम सुरू होई. ती सर्वार्थाने लेखकाची सहचरी बनली होती. न कटाळता सारे काही लिहून काढण्यात तिचा सारा आनद समावलेला होता. स्वच्छ नक्कल उतरवून काढणे ही काही सोपी गोष्ट नव्हती कारण टॉलस्टॉयचे अक्षर म्हणजे 'स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयती ' अशा थाटाचे होते. त्याच्या डोक्यात कल्पनाची इतकी गर्दी होई की, त्या भरात समासात तो वाकडे तिकडे शब्द-वाक्ये-लिहून ठेवी. अनेकदा खाडाखोड, मध्येच दोन ओळीच्या मध्ये लिहिणे-तेही खोडणे-मग एका लाब रेषेच्या टोकाला फुगा काढून त्यांत गिचमिड मजकूर लिहिणे इत्यादि प्रकार चालायचे. सोन्याला बिचारीला या साऱ्या गिचमिडातून सलग मजकूर ओळखून काढावा लागे. त्याच्या लिहिण्याच्या पद्धतीची मग तिला सवय झाली. तिला सूक्ष्म-दर्शक भिंग घेऊनच बसावे लागे. भिंगातून पाहून, शब्द लावून मग स्वच्छ नक्कल करायची हे काम कित्येकदां पहाटे ५ पर्यंत चालायचे. ती आपण लिहिलेले कागद टॉलटॉयच्या टेबलावर नीट रचून ठेवी; आणि मग झोपी जाई. दुपारी ११-११॥ पर्यंत उठे. तोवर टॉलटॉयने आपल्या अभ्यासिकेत पुढील भाग लिहायला सुरुवात केलेली असायची. सोन्याने लिहून काढलेली प्रकरणे सकाळी तो नजरेखाली घालीत असे त्यात पुनश्च असख्य फरक करी. सारे कागद पुनश्च खाणाखुणा, वाक्यखोड, रेघा इ तपशिलाने चिताडले जाई. मग ते दुखावलेले घायाळ कागद सध्याकाळी नव्या सोबत्यासह पुनश्च सोन्याच्या टेबलावर स्थानापन्न होत असत मग रात्री तिचा उद्योग सुरू व्हायचा. अशा रीतीने सोन्याने ती २००० पृष्ठाची कादबरी जवळ जवळ सात वेळा लिहून काढली. पण इतके करूनही तिच्या लिव्होचकाचे (लिओ टॉलटॉयचे ) समाधान झाले नाहीच ! छापखान्यातून प्रुफे आली की तो आणखीबदल करायचा. त्याच्या चोखदळ चिकित्सेला काही सीमाच नव्हती. केलेल्या दुरुस्तीबद्दल तो कमालीचा जागरूक होता-

होता होता सहा वर्षांत हस्तलिखिताचे ढीगच्या ढीग झाले. सोन्या इतकी शहाणी होती की, तिने एक कपटा देखील फेकला नाही. सर्व हस्तलिखिते व्यवस्थित बाधून ठेवली. तळमजल्यावरील वापरात नसलेल्या एका खोलीत हे गट्ठे ठेवून दिले. अशा रीतीने ही हस्तलिखिते ठेवून दिल्याचे कोणालाही माहित नव्हते. कादबरी लिहिण्याच्या सुरुवातीला दोन वर्षांचा असणारा सर्जी पुढे १६-१७ वर्षांचा झाला. त्याला स्वतंत्र खोली हवी होती स्वतःसाठी म्हणून त्याने ही खोली झाडून साफसूफ करून घ्यायचे ठरविले; त्या वेळी हे जुने निरुपयोगी कागदाचे गट्ठे त्याने बाहेर फेकून दिले. सोन्याचे लक्ष जाताच धावत जाऊन तिने ती सर्व हस्तलिखिते वाचविली. त्यासाठी मोठया लाकडी पेटया करून त्यात नीट रचून ठेवली. आज ती मास्कोच्या वस्तुसग्रहालयात पाहावयला मिळतात '

सोन्याने घेतलेले हे परिश्रम एका दृष्टीने या कादबरीपेक्षाही अधिक उद्बोधक व मोलाचे वाटतात. ते येथे इतके विस्ताराने सागण्याचे कारण पुढील टॉलस्टॉय-तान्या सघर्षात तिने त्या आधी आपल्या पतीसाठी किती खस्ता खाल्ल्या होत्या याची कल्पना यावी व वाचकाकडून तिला योग्य तो न्याय मिळावा.

टॉलस्टॉयची 'ॲना कॅरेनिना ' ही दुसरी कादबरी वैवाहिक जीवनावरील प्रत्ययकारी व प्रमाणबद्ध ललितकृती म्हणून त्याच्या 'वॉर ॲन्ड पीस ' पेक्षाही अधिक श्रेष्ठ मानली जाते. यातील सर्व व्यक्तिरेखा टॉलस्टॉयने प्रत्यक्ष आपल्या अनुभवातून निवडलेल्या असल्यामुळे त्या रसरशीत व जिवत वाटतात. ॲनाच्या चित्रणावर स्त्रिया तर इतक्या बेहद्द खुश होत्या की ही कादबरी क्रमश. छापली जात असताना थोरा मोठयाच्या बायका आपल्या नोकराना छापखान्यात पाठवून छापलेली पाने मागवून घेत ! ही कादबरी अश्लील आहे म्हणूनही मोठे वादळ उठले होते. परतु प्रस्तुत चरित्रात या कादबरीचे वैशिष्टय म्हणजे त्यात टॉलस्टॉयने लेव्हिन व किटी या पात्रांमार्फत आपले व तान्याचेच चित्रण केले होते.

ॲना कॅरेनिना या कादबरीबरोबरच टॉलस्टॉयच्या आयुष्याचा पूर्वार्ध सपतो व उत्तरायणाला सुरुवात होते. हे उत्तरायण म्हणजे टॉलस्टॉयच्या कौटुबिक जीवनातील युद्धकांडच म्हटले पाहिजे-त्यात टॉलस्टॉय व त्याची पत्नी ही दोघेही आपापल्या आयुष्याची शोकातिका कशी करून घेतात ते पहावयास मिळते हा सारा वृत्तात अत्यत उद्वेगजनक आहे. या प्रकरणी टॉलस्टॉय व तान्या यात अधिक दोषी किंवा अपराधी कोण हे ठरविणे अत्यत कठीण आहे. त्यासाठी विद्वान लोकाची एक अभिरूप न्यायसभाच घेतली पाहिजे व टॉलस्टॉय व तान्या या दोघावर खटले भरून प्रत्येक बाजूला उत्तम वकील नेमले पाहिजेत व निवाडा करून घेतला पाहिजे. जमल्यास टॉलस्टॉयचे बाजूने पुरुष वकीलानी तान्याचे बाजूने स्त्री वकील नेमणे न्यायास धरून होईल. या बाबतीत खुद्द सुमती देवस्थळे यानी तटस्थतेची भूमिका स्वीकारली आहे. व तान्याला योग्य तो न्याय दिला आहे. हे लक्षात घेणे जरूर आहे. त्या म्हणतात ' टॉलस्टॉयच्या स्वभावातील विसगतीमुळे सोन्याला कसे वागावे हेच समजेनासे झाले होते. त्याच्या भराभर बदलणाऱ्या (विकसित होत जाणाऱ्या) तत्त्वज्ञानामाठी धावताना तिची दमछाक होत होती. बारा मुलाना जन्म दिल्यावर, मालमत्तेची सर्व जबाबदारी स्वीकारल्यावर केवळ टॉलस्टॉयच्या परमेश्वर विषयक कल्पनानुसार जीवनप्रवाहाला वेगळे वळण देणे तिला शक्य वाटत नव्हते. बरे, परमेश्वर तरी कोणता ? आदर्शाविषयीच्या व परमेश्वरविषयीच्या त्याच्या कल्पना निश्चित झाल्या होत्या का ? नाही ! त्या सतत उत्क्रात होत गेल्या होत्या-दर दहा वर्षांनी त्याने स्वत च आपल्या जुन्या कल्पना-

वर हल्ला चढविला होता; व स्वत:चे आदर्श स्वत.च खोडून काढले होते. जीविताच्या आदर्शाचे सारखे उन्नयन चाललेले होते. तो कुठं थावायलाच तयार नव्हता. मग हिने तरी त्याचे काय खरे धरायचे? त्याच्या गतीने ही नऊ मुलांची आई धावणार कशी? तो हाडाचा कलावंत होता— पण कलेचा धिक्कार करीत होता. वासनाधीन होता, विरागीही होता. धर्मनिष्ठ होता तसाच रूढ धर्मचा पक्का शत्रूही होता. खरे म्हणजे टॉलस्टॉय ही एक एकसंध अशी व्यक्तीच नव्हती त्याच्या एका देहात दहावारा परस्पराशी सतत भांडणाऱ्या व्यक्तीचे एकत्रीकरण झालेले होते.' सुमती देवस्थळे यानी लिहिलेल्या या चरित्र ग्रथाचे स्वरूप हे असे मोठे चित्तवेधक आहे.

खुद्द टॉलस्टॉय याचा उत्तर आयुष्यातील ध्येयवाद व त्याचे तत्त्वज्ञान या विषयी विचार करू लागले म्हणजे अनेक विवाद्य प्रश्न निर्माण होतात. मुख्य प्रश्न असा की आपण ज्या निसर्गनिर्मित सघर्षमय हिंसात्मक जगात वावरत आहोत त्यात कोणत्याही व्यक्तीला अहिंसावादासारखा किंवा दुसरा कोणताही आत्यंतिक ध्येयवाद त्याला मुरड किंवा मर्यादा घातल्याशिवाय प्रत्यक्ष आचरणात आणणे शक्य आहे काय? टॉलस्टॉयच्या एकूण ध्येयवादी जीवनाच्या सदर्भात विचार करू लागलो म्हणजे महात्मा गाधीची आठवण होणे अपरिहार्य आहे. खुद्द सुमती देवस्थळेच म्हणतात की साऱ्या जगात फक्त गांधीजीच काय ते टॉलस्टॉयची वास्तविक योग्यता जाणू शकले. या दोघाची प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही. परतु आपसात पत्रव्यवहार होता. दक्षिण आफ्रिकेतील महात्माजीच्या अहिंसात्मक चळवळीला टॉलस्टॉय यानी आशीर्वाद दिला होता. दोघेही निर्भेळ अहिंसावादी. अगावर डास चावला तर त्याचीही हत्या करावी कीं न करावी याचा विचार करणारे. दोघांनीही आपल्या आयुष्यात सत्याचे प्रयोग शेवटपर्यंत चालू ठेवले होते. दोघेही युद्धविरोधी. शत्रूवरही प्रेम करायला सांगणाऱ्या येशू ख्रिस्त्याच्या गॉस्पेलचा (वास्तविक ही येशूच्या मृत्युनतर शभर वर्षांनी त्याच्या शिष्यानी रचलेली आहेत.) खरा अर्थ लावण्यासाठी टॉलस्टॉयने पाचसहा भाषाचा अभ्यास चालविला होता, तर गाधीजी भगद्गीतेचा अहिंसात्मक अर्थ लावून केव्हाच मोकळे झाले होते. दोघानीही खासगी मालमत्तेचा त्याग केला होता. टॉलस्टॉयने तर आपल्या पुस्तक प्रकाशनाचे मालकी हक्कही सोडल्याचे जाहीर केले तेव्हा त्याची पत्नी सोन्या सहाजिकच सतापली. तिने त्याच्या अनेक ग्रथाची मुद्रणप्रत तयार करण्यासाठी अविरत परिश्रम घेतले होते. त्याच्या वॉर अॅन्ड पीस या दोन हजार पृष्ठांच्या कादबरीचे हस्तलिखित रात्रीचा दिवस करून सहा सात वेळा लिहून काढले होते. तेव्हा आपल्या पुस्तकाचे मालकी हक्क आपल्या पत्नीच्या नावावर न करता त्याने सोडून द्यावे व निव्वळ व्यापारी वृत्तीच्या प्रकाशकाची का धन करावी या तिच्या प्रश्नाचे उत्तर टॉलस्टॉय यास देता आले नाही.

टॉलस्टॉय आणि गाधीजी ससार कर करून भागल्यानतर देव धर्माला लागले होते. या तुलनेने समर्थ रामदास व स्वामी विवेकानंद हे आधीक शहाणे व दूरदर्शी ठरवात. इतरानी आपला ससार सार्थकी कसा लावावा हे सागण्यासाठी त्यानी स्वत.चा ससार तरुणपणीच सोडून दिला होता. एकनाथानी तर नेटका ससार करूनही आपले पारमार्थिक जीवन सार्थ करून दाखविले. परतु टॉलस्टॉय व गाधीजी या दोघानाही हे जमले नाही. दोघेही आपल्या वायकाशी सतत भाडत राहिले. प्रेमभावाने ते त्याच्याशी वागू शकले नाहीत व त्याचे मन जिकू शकले नाहीत. टॉलस्टॉयची सरदारकी थाटाची कामवासना तर इतकी प्रबळ होती की घरात बायकोशी रोज कडाक्याची भांडणे चालू असतानाही त्याला एकामागून एक मुले होतच होती! अनेक मुलाची आई या नात्याने त्यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी तिच्या एकटीवर सोपवून टॉलस्टॉय जेव्हा आपली वैयक्तिक मालमत्ता फुकून गृहत्याग करण्यास प्रवृत्त झाला तेव्हा तिने टॉलस्टॉय यास जे अनेक प्रश्न विचारले त्याची समाधानकारक उत्तरे तो देऊ शकला नाही, व तिचा सहवास टाळण्यासाठी तो शेवटी घरातून गुप्तपणे पळूनच गेला! अर्थात तिने त्याचा शेवटपर्यंत पाठपुरावा केलाच ही गोष्ट वेगळी.

या गोष्टीची चर्चा करण्याचे कारण असे की सासारिक जीवनातील अशा स्वरुपाचे प्रश्न हे केवळ टॉलस्टॉय याच्या एकटयाचेच नसून ते सर्वच सासारिक माणसाचे प्रश्न आहेत. जीवनातील अशा स्वरुपाचे अनेक प्रश्न सुमती देवस्थळे यांचा हा चरित्र-ग्रथ वाचताना वाचकासमोर उभे राहातात व तो अतर्मुख होऊन विचारप्रवण होतो, हेच या ग्रथाचे खरे महत्त्व मानले पाहिजे. सुमतीबाई टॉलस्टॉय हा माणूस म्हणून कसा होता याचा शोध घेतात तर वाचक प्रस्तुत ग्रथ वाचल्यावर मानवी जोवन म्हणजे काय याचा विचार करू लागतो. हा ग्रथ वाचल्यावर वाचक अतर्मुख होतो असे मी अगदी सुरवातीला म्हटले आहे ते याच अर्थाने.

शेवटी प्रकाशकाना एकच विनती. ती अशी की या सारख्या चरित्रग्रथाला सूचि जोडणे आवश्यक आहे. ती दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी तरी जोडावी. ◻

**टॉलस्टॉय : एक माणूस**
सुमती देवस्थळे
राजहस प्रकाशन, पुणे
मूल्य : पचवीस रुपये


# श्रीग्रामायन

| | | |
|---|---|---|
| मूल्य | लेखक | राजहंस प्रकाशन |
| पंधरा रुपये | श्री. ग. माजगावकर | पुणे ३० |

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**१४-१२-७४ ते २०-१२-७४**

### इंदिराजी-जयप्रकाश यांचे शहकाटशह

या वेळेची रवी-बुधाची युती व चद्राचे भ्रमण. पतप्रधान इदिरा गाधी याच्यासमोर जयप्रकाशजीची चळवळ मोठीच डोकेदुखी ठरावी. त्याच्या डावपेचाला जयप्रकाश याच्याकडून काटशह मिळणार आहे. मत्रिमडळाची राजकीय समिती काही निर्णय घेईल. बिहारच्या नेतृत्वात बदल घडवण्याचा विचार करावाच लागेल गफूर हे राजकीय सन्यासाकडे झुकण्याची शक्यता आहे. आयात परवाने प्रकरणाला विरोधकाकडून नवी कलाटणी मिळेल. काँग्रेस अध्यक्ष श्री. बारुआ याचा अपमान होईल. महाराष्ट्रात राजकीय विस्फोट.

### मेष : पैसा व नोकरीत यश

भाग्यस्थानी चद्र, रवी, आठवा मगळ आणि पुन्हा भाग्यस्थानी रवी-बुधाची युती तुमच्या उज्ज्वल भविष्यकाळाची यशस्वी वाटचाल दर्शविते. आता मागे रहाण्याचे कारण नाही. रेगाळणाऱ्या योजना कार्यवाहीत येतील. सोमवार ते गुरुवार अनेक क्षेत्रात घवघवीत यश पदरात पडेल. नोकरीत महत्त्वाचे निर्णय होतील. प्रमोशन सबधी शिफारस होईल. व्यापार कसाबसा चालेल. पण शेती व स्थावराच्या सबधात फायदा होईल. वक्तृत्व, लेखन व कला या क्षेत्रात तुमचे कौतुक होईल. मगळवार हा तुमचा शुभ वार आहे. महिलानी उद्योग व्यवसायात भाग घ्यावा.

### वृषभ : कौटुबिक स्वास्थ्य

आठवा व नववा चद्र दूरचा प्रवास घडवणार आहे. आठवा रवी स्थावरात काही अडचणी आणू शकेल. सध्या तरी नवे सकल्प करायला फारशी अनुकूल परिस्थिती नाही. मात्र तब्येत सुधारेल. थोडे फार गवसेल ते कौटुबिक स्वास्थ्य. कुटुंबाच्या सहवासात यात्रा, सहल घडेल. रविवार, बुधवार व शुक्रवार हे दिवस महत्त्वाच्या कामाला फार अनुकूल आहेत. लॉटरीचे तिकीट आवश्य घ्या. नोकरीत वादविवाद टाळणे आवश्यक आहे विष्णूची उपासना यशप्राप्ती देईल. तुमचा शुभ वार गुरुवार आहे. महिलाना माहेरच्या बातमीचा आनद लाभणार आहे.

### मिथुन : विवाह ठरणार आहे

आठवड्याच्या सुरुवातीलाच चद्र-शनीचा प्रतियोग असला तरी तेवढ्याने काही सर्वच प्रतिकूल घडेल असे समजू नका. तुमच्या बाबतीत या वेळी अत्यत अनुकूल योग आहे म्हणजे विवाह ठरण्याचा योग. विवाह ठरून जोडीदार चागले मिळणार आहेत. शुक्रवार हा तुमचा अनुकूल वार आहे. त्या दिवशी ठरवून नोकरीच्या सबधात कोणताही प्रयत्न करा. काम यशस्वी होईल. पैशाच्याबाबतीत फारसा त्रास नाही. पण खर्चाचे धाडस करू नये. तसेच अकल्पित पैशाच्या नादी लागू नये महिलाना नोकरीत कामाचा ताण पडणार नाही.

### कर्क : विरोधकांना शह

आठवड्याच्या सुरुवातीला चद्र व मगळाचा षडाष्टक आहे. त्याचप्रमाणे शनी-मगळाचा प्रतियोगदेखील सध्या साडेसातीच्या वातावरणात वावरत असलेल्या तुम्हाला अनुकूल नाही. तरी पण मगळवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी तुम्हाला चद्राची उत्तम साथ आहे. नोकरीत वरिष्ठाकडून सहानुभूती मिळेल. खासगी नोकरीत मालक गुणाचे चीज करतील या वेळी तुम्हाला विरोधकाना शह देण्याची सुवर्णसधी लाभणार आहे. विद्यार्थ्यांनी व शिक्षकानी कलाक्षेत्रात प्रयत्न करावा. महिलानी भाडणापासून दूर रहावे. मुलाची काळजी घ्यावी.

### सिंह : आशा पालवतील

आठवड्याची सुरुवात पाचव्या चद्राकडून होत आहे. ही शुभसूचक घटना यश देणारी आहे. मगळवार-गुरुवार राजकीय क्षेतात अचूक पावले टाकायला अनुकूल आहेत. तुमच्या राशीला रविवार व बुधवार हे शुभवार आहेत. नोकरीत नव्या क्षेत्रात प्रवेश मिळेल. यावेळी बेकाराच्या आशा आकांक्षा पालवतील. शेती, वाणिज्य व विज्ञान या पदवीधराना काम मिळेल कापड व्यापारी जरा चितातूर होतील. पण नुकसान नाही. विद्यार्थ्यांना परीक्षेत मोठे यश मिळणार आहे. आर्थिक परिस्थिती सर्वसामान्य राहील. महिलाना सार्वजनिक मान सन्मान मिळेल.

### कन्या : संधी येणार आहेत:

पहिले एकदोन दिवस चद्र मनःस्वास्थ्य थोडेफार बिघडवील. पण रविवार ते गुरुवार तुमच्या समोर नव्या नव्या सधीची मालिका लागणार आहे खर्चाची नवी नवीप्रकरणे उभी राहिली तरी काळजी करू नका. प्रतिष्ठा उचावणार आहे. नोकरीत कामाचा ताण वाढणार आहे. पण वरिष्ठ खुश राहाणार आहेत. दुय्यम व्यवसाय उपेक्षू नका. तो पालवणार आहे. शुक्रवार व शनिवार हे तुमचे शुभवार आहेत. रवि-बुधाची चतुर्थ युती राहात्या जागेची समस्या सोडवील. विद्यार्थ्यांनी अभ्यास चांगला करावा. महिलाना कीर्ती व नोकरीत प्रतिष्ठा मिळेल.

### तूळ : उद्योगात नवी पर्वणी

रवि-बुधाची युती तुमचे या आठवड्यात भविष्य घडवणार आहे गेले अनेक दिवस तुम्ही निराशेकडे झुकत आहात. पण या आठवड्यात तुमची अनेक दिवसाची राजकीय महत्त्वाकांक्षा पुरी होईल. अत्युच्च पदावरील एखाद्या व्यक्तीगरोबर तुमचे मित्रत्वाचे नाते जमेल. बुधवार तुमचा शुभवार आहे. या आठवड्यात धनू ही तुमची शुभराशी आहे सोमवार ते गुरुवार नोकरीत प्रमोशनचा योग. साहित्य क्षेत्रात प्रगती. कला व चित्रपटात कीर्ती. पैसा मिळेल. विद्यार्थी व तरुणी याच्या गुणाचे कौतुक होईल. महिलांना कुटुबात नेतृत्व

### वृश्चिक : धनस्थितीला धक्के

मगळाचे वर्चस्व कमी होत आहे दुसरा चद्र व बारावा हर्शल आर्थिक परिस्थितीला धक्के देणार आहेत. चमत्कारिक खर्चाची एखादी समस्या अचानक उभी राहाणार आहे. मगळवार तुमचा शुभवार असून या आठवड्यात कुभ ही तुमची शुभराशी आहे काटकसर करणे आवश्यक आहे व्यसना-

पृष्ठ ३२ वर

# राज्य नाट्य महोत्सव पुणे केंद्र

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्र राज्याच्या चवदाव्या नाट्य महोत्सवाची पुण्यातील पहिली फेरी नुकतीच पार पडली. पुणे केंद्रात आठ नाटके होती. संख्येचा विचार केला तर ती इतकी कमी का असा प्रश्न सहाजिकच निर्माण होतो. सख्या कमी झाल्याने स्पर्धेतील ईर्षाही कमी होण्याची शक्यता असते या वर्षी तसेच झाले.

शिशुरंजन या सस्थेने (म्हणजे थिएटर ॲकॅडमीच्या लोकांनी) सतीश आळेकर लिखित 'महानिर्वाण' सादर केले. एका सामान्य माणसाच्या (कीर्तनकाराच्या) मरणाची (प्रेताची) आणि मरणानतरची कथा या नाटकात आहे. आपुले मरण स्वतः पहाणारा, अनुभवणारा, त्यातील निरर्थकत्व जाणून घेणारा असा तो कीर्तनकार आहे. लेखनदृष्ट्या आणि अर्थात प्रयोगदृष्ट्याही पहिला अक प्रभावी ठरला. पण दुसऱ्या अकात नाट्यविषयाचा विकास नित्य सांवादिक रचनेमुळे सर्वसामान्य कथेवर आला. त्यामुळे मूळ विषयातील मर्मभेदकता निष्प्रभ ठरली. त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे मरण ही कल्पना नाट्यविषय म्हणून घेतल्यानतर त्यातील सर्व तपशील देण्यात आणि रगवण्यात लेखक मग्न राहिला, उदा. ताटी, अग्निसस्कार, कावळा शिवणे वगैरे. त्या तपशिलातील बारकावे कोरण्यात अधिक वेळ खर्ची पडल्याने मूळ नाट्यविषयापासून नाटक खूपच दूर गेले. कीर्तनाच्या माध्यमातून नाट्याविष्कार झाला असल्याने नाटककाराने सगीताचा वापर विविध पद्धतीने करून घेतला आहे प्रयोग परिणामाच्या दृष्टीने विविध प्रकारचे सगीत प्रभावी ठरले. त्यामध्ये चद्रकात काळे हा गुणी कलाकार लक्षवेधी ठरला. त्याने ज्या ताकदीने आपली भूमिका पेश केली ती फार मोठ्या कलागुणाची साक्ष देणारी आहे. सतीश आळेकर हे अभिनयदृष्ट्या कमी पडले. मरुयत. त्याच्या शब्दोच्चारातील आणि शरीर हालचालीतील जडपण व्यक्तिरेखेच्या गतिमान आविष्काराला उणेपण आणणारे आहे. माधुरी भावे यानी आपली भूमिका व्यवस्थित केली. या तीन भूमिकाव्यतिरिक्त छोट्या छोट्या भूमिकामध्ये लक्षात राहिले ते म्हणजे श्रीराम रानडे, मेढेकर, बसाळे इ लेखनदृष्ट्या दुसरा अक अधिक एकजीव आणि विकसनशील असता तर दुसऱ्याही अकाचा नाट्यपरिणाम अधिक झाला असता आणि एकूणच नाटकाची कलात्मक उची मोठी झाली असती. पण तसे घडले नाही

महाराष्ट्रीय कलोपासकने पद्माकर गोवईकरानी अनुवादित केलेले 'गोपा चामाराची बकुळा' सादर केले. मूळ नाटक लोर्काचे 'दि शू मेकर्स प्रॉडिगल वाइफ' असे आहे. अनुवादामध्ये मूळ नाटकातील कथेचा भाग जितक्या मोठ्या प्रमाणात सरसरूपाने आलेला आहे तितके त्यातले अत सत्त्व मात्र आलेले नाही. बकुळा आणि गोपा चामार याच्या वयातील अतर जसे महत्त्वाचे तसेच त्यांच्यातील दुरावा आणि आकर्षणही महत्त्वाचे आहे। पहिल्या अकात बकुळेचा दुरावा प्रगट झाला आहे. परस्परामधील प्रेम व्यक्त झाले नाही. अपत्यहीनतेतील सलणारे दुःख, म्हातारा नवरा आणि तारुण्य, स्त्रीत्व आणि अपत्यहीनत्व यातील ताण, या सर्वांमधून आलेले एकाकीपण, व्यथा इत्यादी गोष्टी लेखनात स्पष्ट होऊ शकल्या नाहीत. बकुळाविरुद्ध गाव एवढाच एकेरी सघर्ष जाणवतो. तिच्या मानसिक सघर्षापेक्षा तुलनेने याच एकेरी सघर्षावर अधिक भर दिला गेला आहेत ते प्रसग आणि व्यक्तिरेखन गृहीत धरूनही सवादातून नाट्यविषयातील जोश व्यक्त होत नव्हता त्यामुळे लेखनातील क्षीणता जाणवत होती. नाट्यसहितेतील उणेपण दिग्दर्शक वासुदेव पाळदे यानी भरून काढण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्याच्या दिग्दर्शनात वास्तवता आणि कल्पकता याची जाण, विरचनेतील सहजपण आणि नाट्यविषयानुकूल अशी गतिमानता महत्त्वाची होती. अर्थात काही प्रसग फार सफाईने बसवलेले असल्यामुळे त्यातील उत्स्फूर्तपण जाऊन त्याला यात्रिकता आली होती. उदा. नाटकाच्या सुरुवातीच्या प्रसगात काही माणसाचे जाणे-येणे, काळ्या-तांबड्या या पात्राच्या प्रतिक्रिया इ. पहिल्या अकाची गती जाणवण्याइतकी सथ वाटली. विशेषत. सुरुवातीचा भाग. बकुळाच्या भूमिकेत काचन कोटवागी होत्या. त्यांनी भूमिका साकारण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करूनही भूमिकेला त्या न्याय देण्यात उण्या पडल्या. कारणे अनेक होती. ग्रामीण स्त्रीच्या सौदर्यातील आवाहकता त्याच्या सौदर्यात नव्हती. चालणे, बोलणे वागणे यातून ती आवाहकता–आकर्षकता प्रकट होत असते. त्यांकी बोलण्याचा भाग खूपच समाधानकारक होता. पण त्यातही पतीबद्दलची सूक्ष्म प्रेमाची जाणीव कोठेच व्यक्त झाली नाही. त्यामुळे त्यांचे अभिनयदर्शन एकागी वाटले. शब्द, हालचाली, मुद्राभिनय यामध्ये वाजवीपेक्षा अधिक करकरीतपणा, रेखीवपणा जाणवला. ते सारे आतून–उत्स्फूर्तपणे येत आहे असे जाणवले नाही. गोपा चामाराची भूमिका पाडुरग पवार यांनी केली होती. त्याची देहयष्टी, आवाज, बोलणे, यातून अपेक्षित वयस्करपण निश्चित जाणवले. पहिल्या अकात पती-पत्नीचे नाते किंवा त्यातील विविध छटा त्याच्या अभिनयातून व्यक्त झाल्या नाहीत. पहिल्या अकाच्या अखेरीस, अनेक गोष्टीना वैतागून घर सोडताना होणारे दुःख–व्यथा अभिनयातून जाणवली नाही. जोडे शिवण्याचा तपशील फारच कृत्रिम वाटला. तो तपशील त्या भूमिकेचा एक अगभूत भाग आहे आणि रगभूमीवरील एक महत्त्वाचा बिझिनेस आहे असे कोठेच जाणवले नाही. मात्र दुसऱ्या अकातील वेषातर करून बहुरूप्याची भूमिका पवारानी उत्तम वठविली. नेपथ्य आणि प्रकाशयोजना राजा नातू याची होती. अर्धं भिंतीचे मातीचे घर, त्याचा ओसरीवजा पुढचा भाग उत्तम साधला होता. वास्तव आणि कल्पकता अशा दोन्ही पातळीवर नाटकाचा आविष्कार असल्याने नेपथ्य रचनेतही ती दृष्टी जरूर होती. पण कल्पकता सूचित करण्याकरता चित्रात दिसणारी रगीत झाडे उभारली होती ती आणि मागच्या पडद्यावरची रगीबेरंगी प्रकाशयोजना अकारण लक्षवेधी ठरली, परिणामशून्य ठरली. त्या गोष्टीनी नाट्यविषयाशी एकजीवित्व साधले नाही. एका गीताच्या निमित्ताने मोठे आणि खोटे फुलपाखरू रंगमचावर आणण्यात आले. त्याच्या दर्शनाने गीताचा आणि प्रसगाचा परिणाम द्विधा झाला. फुलपाखराविना ते गीत आणि त्यातील भावाशय प्रगटणे शक्य होते. आनंद

यादव यांची गीतरचना लक्षात येण्याजोगी महत्त्वाची होती, सहजस्फूर्त होती. त्या गीताना आणि इतर प्रसगाना लाभलेले सगीत चागले आहे. विशेषत: दिनकर दिवेकर यानी बासरीचा केलेला वापर परिणाम समृद्ध करणारा ठरला. जे गीत आतून म्हटले गेले त्याचे आणि पाडुरग पवाराच्या गीताचे शब्द स्पष्ट येत नव्हते. फुलपाखराचे गाणे अधिक जिवत व्हायला हवे. अशा काही उणीवा असूनही नाटचपरिणाम चढत्या श्रेणीचा होता.

'ड्रॉपर्स'ने विजय तेडुलकराचे 'सरी ग सरी' सादर केले दहा वर्षांपूर्वी या नाटकाचा प्रयोग साहित्य सघाने केलेला होता. ड्रॉपर्सच्या कलाकारानी हे नाटक का निवडावे ? असा प्रश्न मनात येऊन गेला. कदाचित वग आणि नाटक याचा समिश्र असा आविष्कार असल्याने त्याच्याच मोहापोटी सहिता निवडली गेली असावी. त्यातल्या वेगळ्या सवादभाषेचेही आकर्षण असेल! सहितेचे सपादन अधिक काळजीपूर्वक झाले असते तर लेखनातील विस्तारामुळे प्रयोगाला आलेले कटाळवाणेपण कमी झाले असते. दिग्दर्शक अनत कुलकर्णी यानी प्रयोग परिश्रमपूर्वक बसवलेला जाणवत होता. त्यानी स्वत: पेद्याची भूमिका जबाबदारीने पेलली होती. त्याच्या अभिनयातील सहजता आणि आत्मविश्वास महत्त्वाचा वाटला. नायकाची भूमिका दिलीप कोल्हटकरानी केली होती. त्याचे बोलणे कठाळी असल्याने ते त्यानाच दमवणारे ठरले परिणामी शब्दाचे वजन निघून गेले. बोलण्याच्या पद्धतीचा त्याना होणारा त्रास चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होता. तो मुद्राभिनायाला व्यत्यय आणणारा होता. आधीच पुनरुक्ती-पाल्हाळामुळे निष्प्रभ वाटणारी सहिता कोल्हटकराच्यामुळे आणखीनच त्रासाची ठरली. वैजयती ओक आणि इतर कलाकार ठीक होते. छोटे पण चागल्या अर्थाने लक्षात राहिले ते म्हणजे आळेकर. शक्य असूनही अतिरिक्त अभिनय न करता, आवाजाचा योग्य तो वापर करून त्यानी वेडसर मास्तरची भूमिका समतोलपणे केली. हा प्रयोग पाहाताना याच कलाकाराचे गतवर्षीचे 'एक असतो राजा' सतत स्मरत होते. त्या प्रयोगातील कलात्मकदृष्टी, परिणामकारकता, प्रयोगशीलता या वर्षीपेक्षा खूपच उजवी होती.

'पी. डी. ए.'ने 'आतिगान' सादर केले. जॉअनुईच्या नाटकाचा अनुवाद सौ. शाता वैद्य यानी केलेला आहे. दिग्दर्शक आणि प्रमुख भूमिकेत श्रीराम खरे होते. त्यानी प्रयोग व्यवस्थित बसवला होता. त्यात कोणत्याच प्रकारे चढउतार निर्माण करण्याचा प्रयत्न नव्हता. राणी पारसनीसने आन्तिगानची भूमिका केली होती. व्यक्तिरेखेचे आणि नाटचविषयाचे गाभीर्य ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न तिने केला. शब्दाच्या, अभिनयाच्या साह्याने आशयातील नेमकेपण व्यक्त करू शकली नाही त्यातील वैचारिकतेची उची व्यक्त झाली नाही. शब्दोच्चार सथ, स्वच्छ असूनही परिणाम घुमणारे होते मुद्रेवर सतत एकच म्हणजे करुणभाव होता. प्रसगानुरूप त्यातील सूक्ष्मता व्यक्त करण्यास ती असमर्थ ठरली. दाईचे काम शीला दाणी यानी व्यवस्थितपणे केले. बाकी इतर कलाकार सुमार होते सूत्रधार म्हणून केशव घुले यानी निराशा केली. अभिनयासाठी स्वत.च्या व्यक्तिमत्वाचा उपयोग त्याना करून घेता आला नाही. शब्दोच्चार परिणामकारक नव्हते. त्याचे कारण म्हणजे आत्मविश्वासाचा अभाव, कच्चे पाठातर आणि प्रासगिक दडपणामुळे आलेली भीती त्यामुळे त्याचे निवेदन निरर्थक वाटले. दिग्दर्शकाने नेपथ्यातील चौथऱ्याचा उपयोग चागला करून घेतला होता. पात्राच्या विरचनेत नाविन्य असे काही नव्हते. रगमचाच्या पुढील (ॲप्रन स्टेज) जादा भागात प्रेक्षक म्हणून काही कलाकार बसवलेले होते. सुरुवातीला एक-दोन वाक्यापुरता त्याचा उपयोग झाला. पुढे त्याचा काहीच वापर केला नाही नेपथ्य सूचक, आटोपशीर होते. प्रकाशयोजना हा एक निरर्थक खेळ वाटत होता. प्रकाशयोजनेचे नाटचपरिणामाशी एकजीवित्व नव्हते. प्रयोगापूर्वी जे एक माहितीपत्रक (फोल्डर) दिले होते त्यामध्ये नाटचाशयाचा काही भाग दिला आहे. त्यामध्ये म्हटले आहे–'जन्माला आलेल्या प्रत्येक मानवाला, आपल्या जीवनासबधी एकदा निर्णय घ्यावाच लागतो. एकदा होकार किंवा नकार दिला की त्याच दिशेने प्रवास चालू राहातो. याची निवड करण्याची विचारी माणसाला सधी असते. पण सहसा ती एकदाच असते... पण, आतिगान म्हणजे तरी कोण! असच एक मूर्तिमत प्रतिनिधित्व !... या शोकातिकेला काळाच बधन नाही. ती केव्हाही घडू शकते. काल, आज किंवा उद्याही !' हा नाटचाशय प्रयोगात अभिप्रेत असावा. पण तितक्या ताकदीने, उचीने तो व्यक्त झालाच नाही.

या चार महत्त्वाच्या नाटकाव्यतिरिक्त आणखी चार नाटके सादर झाली. महाराष्ट्र बँकेचे 'अरे अश्वत्थामा', रगश्रीचे 'रात्र सरेना', कलामदिरचे 'पळती लाटा उभा किनारा,' आराधना नाटचसघाचे 'सांगू नका कुणाला' (यापैकी 'रात्र सरेना' हे मी पाहिले नाही.) उरलेली तीनही नाटके लेखन, अभिनय, दिग्दर्शन या सर्वदृष्टीनी सुमार होती. त्याच्या वाईटपणाबद्दल फार लिहिण्याचे कारण नाही कारण या सर्व कलाकाराच्या नाटचविषयक समजुती काही विचित्र गोष्टीवर आधारलेल्या आहेत. आपण कोणत्या प्रकारची नाटचनिर्मिती करतो आहोत याचे किमान भानही याना नव्हते. त्यातल्या त्यात चागल्या अर्थाने भालचद्र पानसे याच्या नेपथ्याचा उल्लेख करावा लागेल त्याच्या नाटकाच्या नेपथ्याची चित्राकृती चागली होती. पण नेपथ्याने रगमचाची किती जागा व्यापावी आणि पात्राच्या वावरण्यासाठी किती जागा ठेवावी याचा व्यावहारिक विचार त्यांनी केलेला दिसत नव्हता


स्पर्धा सपल्या. त्यातून काही जाणवले ते असे. १. स्पर्धक सघाची सख्या कमी होती. २. कोणत्याही प्रयोगाचा दर्जा सर्वोत्तम पातळीवरचा नव्हता. त्यामुळे पहिली चार नाटके द्वितीयश्रेणीत आणि उरलेली तृतीय-, चतुर्थश्रेणीत होती. ३. प्रेक्षकाचा प्रतिसाद बऱ्यापैकी होता. वाढता उत्साह नव्हता. ४. स्पर्धांचे दिवस अतराअतराने असल्याने स्पर्धेचे एकजिनसी स्वरूप नाहीसे झाले होते. ५. स्पर्धेतील वाढती उत्सुकता नव्हती. ६. परीक्षकामुळे काही प्रयोग वेळेवर सुरू झाले नाहीत. ७ शेवटी स्पर्धा शिशुरजन, कलोपासक, ड्रॉपर्स, पी. डी. ए. याच्यातच झाली.

माझ्या दृष्टीने नाटकाचे क्रम असे लागू शकतील : १. महानिर्वाण २. बकुळा ३ सरी ग सरी ४. आतिगान. स्पर्धेत नाटचसघाची सख्या कमी होणार असेल, प्रयोगाची गुणवत्ता वाढणार नसेल, प्रेक्षकाचा उत्साह कमी होणार असेल तर सरकारने या स्पर्धांचा पुनर्विचार करावा अशी आता वेळ आलेली आहे.

[परीक्षक होते श्री. कमलाकर सोनटक्के, सौ. लीलावती भागवत, प्रा. म. ना. अदवत.] □ □

# चकनाचूर

भाऊ पाध्ये





# धरम

## आज्ञाधारक बच्चा हीरो !

अलीकडे धरम विषयी कोणीतरी म्हटलय की ' हा माणूस पंजाबी हिंदी बोलतो तरी तुम्हाला कसं चालतं ' त्या गृहस्थाने बिचाऱ्याने हिंदी पिक्चर्स पाह्यलीच नसतील. धर्मेंद्रचे हिंदीच काय किंवा डायलॉग पेश करणे पब्लिकला आवडते असा त्याचा गैरसमज का झाला कुणास ठाऊक ? धर्मेंद्र त्या गृहस्थाइतकाच ऑकवर्ड डायलॉग टाकतो. त्याच्या आवाजामध्ये जसबाती धार नाही, त्याला रडताना पाहवत नाही आणि तो व्हिलनला ' कमीने कुत्ते ' वगैरे गाली देऊ लागला की पब्लिकला बोअर करू लागतो. असा धरम आज टॉपला आहे. सर्वांना आवडतो. मलाही. त्याची हेमा मालिनी शिवाय दुसऱ्या कुठच्याही स्टारबरोबरची पिक्चर्स फ्लॉप झाली आहेत. सायराबानुबरोबरची त्याची ओळीने पंधरा तरी पिक्चर्स लागली होती. सगळी फ्लॉप झाली (थोडीफार चालली. ' ज्वार भाटा ' त्याच्या विनोदी भूमिकेमुळे आणि ' पॉकेट मार ' महंमूदच्या लाजवाब कॉमेडीमुळे) याचबरोबर ही सुद्धा गोष्ट लक्षात घेतली पाहिजे यातल्या बऱ्याचशा पिक्चर्समध्ये धरमची भूमिका धरमच्याच शब्दात सांगायचं म्हणजे बच्चा धरमची होती. याच बॅकग्राउंडवर आपण त्याने केलेली हेमाबरोबरची प्रत्येक पिक्चर्स पहा. ' शराफत 'पासून कालच्या ' पत्थर और पायल ' पर्यंत. जवळपास प्रत्येक पिक्चर हिट झाले. जुग्नु सारखे सर्कसवजा पिक्चरही हिट झाले तर ' नया जमाना, ' ' दोस्त ' सारखी मतलबवाली पिक्चर्सही हिट झाली. ' जुग्नुमध्ये पेश झालेला धर्मेंद्र हा बच्चा धर्मेंद्रच होता. घरावरून उड्या मारणारा, पिस्तुलबाज, पन्नास दुष्मनांना एकट्याने लोळवणारा. पण, त्या पिक्चरमध्ये हेमा होती म्हणून धरम लोकांना पसंत पडला असावा. दुसरे काही नाही. लोक हेमाला पाह्यला जातात हे नक्कीच. पण ती आपली नटखट अदाकाकारीही पेश करून त्यांना जिंकते. धरमचे तसे नाही. त्याला नुसतेच लोक पहायला जातात. प्रिन्स चार्मिंग हेमाचा तो एक प्रिन्स चार्मिंग धरम आहे एवढंच. माझा एक मित्र नेहेमी म्हणतो की ' धरम हा एकच असा हीरो आहे की जो कपडे काढल्यानंतरही पाहवतो. ' (हे त्याचे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. कारण विनोद खन्ना हा धर्मेंद्रपेक्षाही हँडसम आहे,) जवळपास धर्मेंद्रच्या फॅन्सची हीच पोझीशन आहे. पिक्चरच्या दुनियेत हे चालतंच. रॉबर्ट टेलर ह्याला कोणीही अदाकार मानतच नव्हते. परंतु ग्रेटा गार्बो, व्हिव्हिएन ली, डेबोरा कार यांच्यासारख्या हॉलीवुडच्या निवडक खुबसुरत अभिनेत्रींचा हीरो बनण्याचा योग रॉबर्ट टेलरलाच लाभला होता. त्याचप्रमाणे धर्मेंद्रलाही हेमा, शर्मिला, सायराबानु, मुमताझ, लीना चंदावरकर, रेखा, राखी अशा पडद्यावरच्या खुबसूरत अभिनेत्रींचा हीरो बनण्याचा योग लाभला आहे. एका काळी नवी हिरॉईन शम्मीकपूर बरोबरच पेश केली जात असे. शम्मीनंतर सपना, राखी, या नव्या हिरॉइन्स धरमबरोबरच पेश केल्या गेल्या.

' धरम ' ज्यावेळी बिमल रॉयच्या ' बंदिनी 'मध्ये जेलच्या डॉक्टरच्या भूमिकेत पेश केला गेला त्याचवेळी जो तो त्याच्या प्रेमात पडला होता. ऋजु बोलणे, उमदा चेहरा आणि बुजरे-शरीफ हंसणे हे त्याचे विशेष होते. पडद्यावर ज्या अदाकारानी आपल्या पहिल्याच भूमिकेत ' अंडरप्ले 'चा सेन्स आणला त्यात धरम, भारती (कुंवारा बाप मधली) अशी काही थोडीच मंडळी आहेत. धरम आज हिरो आहे, दणकेबाज हिरो आहे. परंतु, आजही ' धरम ' म्हणताच आपल्याला ' बंदिनी 'मधला तो ऋजु बोलणारा, ओठात हंसणारा, उमद्या चेहऱ्याचा जेलचा डॉक्टर आठवतो. धरम वयाने वाढला तरी कधी बदलल्यासारखा वाटलाच नाही. तो मध्यंतरी फुगला होता, त्यावेळी त्याला प्रेक्षकांनी मानलं नाही. परंतु त्याने पुन्हा आपली तब्येत सडसडीत केली आणि पुन्हा तो प्रेक्षकांच्या मनावर ' छा गया 'सा झाला. ' बंदिनी 'मधली त्याची ती हंसण्याची, बोलण्याची, एवढंच काय मान पुढे झुकवण्याची, गाणं पेश करण्याची, आणि चालण्याची स्टाईल कायम आहे. त्या स्टाईलमध्ये ' कमीने कुत्ते ' म्हणून व्हिपनला गाली देणे त्याला जमत नाही आणि ' दिल भरके ' त्याला रडता येत नाही. स्टाईलमध्येच बसत नाही त्याच्या. अगदी ऑकवर्ड वाटतो तो. आणि



प्रिन्सेस चार्मिंग हेमा आपल्या प्रिन्स चार्मिंग धरमच्या पूजेसाठी तर निघाली नाही ? ('शोले', दिग्दर्शक रमेश सिप्पी)

मोठेमोठे जजबानी डायलॉग टाकताना तर त्याची 'पच्ची' होऊन जाते. त्याने सर्वात वाटोळे केले ते 'सत्यकाम'मधल्या भूमिकेचे ! 'सत्यकाम'मध्ये त्याला भ्रष्ट जगात स्वतःचे जीवन पोळून घेणाऱ्या जवानाचे काम करायचे होते. अशाच प्रकारच्या भूमिका कै. गुरुदत्त (कागज़ के फूल) आणि संजीवकुमार (शानदार) यांनी केल्या आहेत. कै. गुरुदत्तने केवळ आपल्या सिन्सिरिटीवर आपली भूमिका निभावली पण आपल्याला डायलॉग पेश करता येत नव्हते, अदाकारीत आपण कमी पडतो हे कधीही भासू दिले नाही.
'शानदार'मधली संजीवची भूमिका म्हणजे 'अदाकारी'चा हाय वॉटरमार्क होता. अत्यंत अव्यवहार्य कथा त्याने केवळ आपल्या अदाकारीने पेलली होती.
'सत्यकाम'मधली आव्हानात्मक भूमिका पेश करताना धरम किती सामान्य अदाकार आहे हे लक्षात येते.

अर्थात धरम हा सामान्य अदाकार असला तरी तो सिनेमासृष्टीतील दिग्दर्शकाच्या तीन लाडक्या आर्टिस्टपैकी आहे. शशी कपूर, विनोद खन्ना हे दुसरे दोन कलाकार. ज्याप्रमाणे तो पडद्यावर ऋजु स्वभावाचा, गोड हंसणारा आणि उमदा वाटतो, त्याप्रमाणेच तो एरवीही वाटतो. कुठल्याही पार्टीत तो भेटला तर तुमच्याकडे पाहून हंसला तरी तुम्ही हरकून जाल. त्याचे गच्च दात चमकतात त्यावेळी तुमच्यावर जणू काही एक बहार बरसते. एखाद्या ॲथलेटसारखा तो ट्रिम आहे. पर्वा हृषिकेश मुखर्जीना एका पत्रकाराने विचारले असता, हृषिदा म्हणाले,

'माझा आवडता नट—धर्मेंद्र. तो वेळेवर येतो, सहकार्य देतो, आज्ञाधारक आहे.' हृषिदांच्या शब्दात धर्मेंद्रची सहकार्य देणे, वेळेवर येणे व बुजुर्गांना इज्जत देणे ही आदतच बनली आहे. धरमचे मीनाकुमारीपासून अगदी आजच्या आशा सचदेवपर्यंत नाव जोडले गेले. 'धरम' त्याच्याबरोबर काम करणाऱ्या प्रत्येक अभिनेत्रीला आवडला असेल यात शंकाच नाही. हा टॉपला असलेला आर्टिस्ट एका सेटवरून दुसऱ्या सेटवर आज्ञाधारक वृत्तीने जात असेल, तितक्याच आज्ञाधारकपणे प्रत्येक बाईला सांभाळीत असेल, यात शंका नाही. एक गोष्ट मात्र त्याला ठाऊक आहे की, आपली हिरो म्हणून जी भूमिका आहे, ती गलत आहे. पण त्याला त्याचाही काही इलाज नाही, तो हँडसम आहे ना ! पर्वा हेमा मालिनीची आणि जितेंद्रची शादी ठरली त्यावेळीच खरे त्याचे हिरोचे इमेज धोक्यामध्ये आले होते. त्याला ठाऊक आहे की, हेमाबरोबर त्याचीही हिरोगिरी संपणार आहे. आजचा टॉपचा हिरो एकदा का हेमा पडद्यावरून गेली की जमीनदोस्त होणार आहे. म्हणूनच हेमाच्या शादीची

बातमी कानावर येताच तो मद्रासला धावला आणि हेमाला शादीपासून वाचवले. आता काही वर्षे तरी त्याच्या हिरोगिरीला बाधा नाही.

'धरम 'ला एक गोष्ट ठाऊक नाही की, तो चागला हिरो नाही पण चांगला विनोदी नट आहे. भाप्पी सोनीच्या 'तुम हसी–मैं जवा ' मध्ये त्याने खलाशाची भूमिका केली होती. नायिका हेमा होती. मध्यतरापर्यंत चाललेल्या धमाल प्रसगामध्ये धर्मेंद्रचे एक वेगळे स्वरूप पहायला मिळाले. विलक्षण सहजता होती त्याच्या विनोदी भूमिकेत. त्यानतर 'ज्वार भाटा', 'पॉकेट-मार ' वगैरे चित्रामध्ये त्याला लहान लहान विनोदी प्रसगात आपण पाहिले. 'कुवारा बाप 'मध्येही तो पाहुणा कलाकार आहे. पण त्या इवल्याशा भूमिकेत तो लक्षात रहातो. कामयाब दिग्दर्शक मनमोहन देसाई याच्या हे लक्षात आले त्याचप्रमाणे काही खास रागडचा भूमिकेत त्याच्या अदाकारीला डायलॉग पेश करण्याची त्याने चागली हातोटी उचलली आहे. 'सीता और गीता 'मध्ये त्याच्या तोंडी जे 'झोपडपट्टी 'वाले डायलॉग आहेत, त्या *डायलॉगच्या जोरावरच तो हेमाच्या* जबरदस्त भूमिकेपुढे उभा राहिला. माझ्यासारख्या अनेकांना धरमची ती भूमिका पाहून चमत्कारच वाटला. धरमला जाऊन कडकडून भेटावे असा. त्यानतर पुन्हा त्याने 'दो चोर 'मध्ये असेच काम करून दाखवले. तनुजासारख्या जबरदस्त अदाकाराला फिके पाडावे इतकी धरमने या चित्रात भूमिका चांगली केली. आणि केवळ चोराच्या डायलॉगबाजीवर एकूण धरमचा पिंड 'सीता और गीता ' मधला डोंबारी आणि 'दो चोर 'मधल्या चोरासाठी बनलेला आहे, हिरोसाठी नाही असे वाटू लागते. एकूण हृषिदांचा हा *आज्ञाधारक हिरो ज्यावेळी आज्ञाधारकही* नसतो आणि हिरोही नसतो त्यावेळी तो अस्सल असतो, त्याच्या अदाकारीत जान येते हेच खरे. □

---

## साप्ताहिक भविष्य : पृष्ठ २७ वरून

साठी मित्र प्रेम करणार आहेत. सावध राहा. सोमवार ते बुधवार अनुकूल आहेत. शेतीसाठी जमीन खरेदी करू शकाल खताचे व्यापारी चार पैसे मिळवू शकतील. महिलांनी शेजाऱ्याच्या भाडखोरपणाकडे कानाडोळा करावा.

### धनू : डावपेच यशस्वी

आजचा पहिला चद्र अनुकूल आहे. रवि-बुध युती तुमच्या जीवनात योग्य तो अनुकूल असा बदल घडवणार आहे वृत्ती निर्मळ ठेवा. मन शुद्ध ठेवा. भीती व सशय मनातून काढून टाका. वरिष्ठ अगर मालक काही बोलले तरी विनम्रता ठेवणे आवश्यक आहे. नोकरी-व्यवसायातील अस्थिरता विरळ होत जाईल. कर्तृत्व दाखवायला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. स्वतत्र धदा करण्यासाठी योजना आखू शकाल. शुक्रवार उत्तम आहे. तुमचा शुभवार आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे. महिलानी मन कोणत्यातरी छदात गुतवावे.

### मकर : कोंडी होण्याची शक्यता

आठवडयात शनिवार व रविवार या दोन दिवसात तुम्ही कोणत्याही कामात जपून पावले टाका. लेखी करार व जामिनकी या पासून दूर राहावे. कोणताच धोका पत्करू नका. राजकारणात व सत्तास्थानात विरोधकाकडून तुमची कोंडी होणार आहे. पण सोमवारी तुम्ही ती कोंडी फोडण्यात यशस्वी व्हाल. सोमवार तुमचा शुभवार आहे. नोकरीत वरिष्ठाकडून बोलणी खावी लागतील. पण आठवडयाच्या शेवटी यश मिळेल. विद्यार्थ्यांनी अभ्यासात काळजी घ्यायला हवी. महिलाना मनावर ताबा ठेवायला हवा

### कुंभ : उत्साहवर्धक आठवडा

हा आठवडा तुम्हाला फार छान आहे. राजकारणात अगर नोकरीत जे अनुकूल घडणार नाही असे तुम्ही समजत होता त्याचा निर्णय यावेळी तुमच्या मनासारखा होईल व तुम्ही चकित व्हाल शनिवार व बुधवार हे तुमचे शुभवार असून तूळ ही या आठवडयातील शुभराशी आहे. प्रोफेसर लेखक व सपादक याना महत्त्व प्राप्त होईल. विज्ञान व शेती पदवीधराना उद्योगासाठी पैसे मिळतील. नोकरीत स्थलातराची शक्यता. श्रीमत व्यक्तीना नवे वाहन खरेदी करता येईल. एखाद्या भाग्यवताला लॉटरी लागेल. महिलांनी एखादा लघुउद्योग सुरू करावा.

### मीन : नोकरीत अनुकूलता

या आठवडयात तुमच्या आशाआकांक्षा नव्या युगाची चाहूल अनुभवणार आहेत. अनेक दिवस मनात साकारत असलेले स्वप्न मूर्त स्वरूप धारण करील. सशोधक व उच्च पदवीधर यांना परदेशात कर्तृत्व दाखवण्याची सधी चालून येणार आहे. रविवार हा तुमचा शुभवार आहे व कुभ ही तुमची शुभराशी आहे. बगलेवाले, व्यापारी बागायतदार व इजिनियरिंग कारखानदार सरकारी कृपेचे भागीदार ठरतील. कागदाचा व्यापारी मदीच्या लाटेत सापडण्याची शक्यता महिलाना वाङ्मयात कीर्ती व यश मिळेल. □ □

---

राजहस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. **श्री. ग. माजगावकर**